साप्ताहिक

# माणूस

५ जून १९८२

दीड रुपया

वर्षारंभ



# सप्रेम नमस्कार

## पूजेतील शंकराचार्य : दुसरी बाजू

¤ साप्ताहिक माणूसच्या '२२ मे' च्या अंकातला 'शंकराचार्य पूजेतले ......' हा श्री विनय गुणे यांचा लेख वाचला. वाचता क्षणीच लेख विकृत भावनेने लिहिला असल्याचे आढळून आले.

प्रस्तुत लेखात लेखकाने शंकराचार्य हे लोकांना हाताच्या अंतरावर राखणारे आहेत, असा आरोप केला आहे. आता समजा, जर विनय गुणेच शंकराचार्यांच्या जागी असते तर त्यांनी काय लोकांना ठराविक अंतरावर न राखता, त्यांना मिठ्या मारून इतक्या प्रचंड गर्दीतील चेंगराचेंगरीत स्वतःचा हात-पाय मोडून घेतला असता ? विनय गुणे ज्या निधर्मी भारताचा उल्लेख करतात त्याच निधर्मी भारताचा पुरस्कार करणाऱ्या म. गांधींचेच उदाहरण द्यायचे तर, महात्मा गांधींच्याभोवतीसुद्धा गर्दीत ते चेंगरून जाऊ नयेत म्हणून काही लोकांचे कडे असे. संत गाडगेमहाराजसुद्धा स्वतःच्या पाया पडायला बघणाऱ्या लोकांना आपल्या झाडूचा प्रसाद देत, हा खुद्द गो. नी. दां. चा अनुभव आहे. मग स्पृश्यास्पृश्यता न मानणाऱ्या गाडगे महाराजांना किंवा म. गांधी या समाजसुधारकांना काय लोकांना हाताच्या अंतरावर राखणारे म्हणावयाचे ? त्यातूनही जर ही विशेषणे गुणे यांना या महान समाजसुधारकांनाही लावावीशी वाटली तर त्यातून त्यांची स्वतःची लायकीच सिद्ध होते. इतर काही नाही !

विनय गुणे यांनी 'निधर्मी' भारत सरकारने शंकराचार्यांना 'स्टेट ऑनर' दिल्याबाबत आश्चर्य व्यक्त केले. सरकारच्या या बाबतीतल्या 'निधर्मी'पणाबद्दल त्यांनी शंका व्यक्त केली आहे एक तर गुणे यांची 'निधर्मी' पणाबद्दलची समजूतच चुकीची असावी. निधर्मी भारताचा पुरस्कार करणाऱ्या सर्व महान नेत्यांनी निधर्मी भारत म्हणजे, धर्मविरहित भारत नसून सर्व धर्मांना समान वागणूक देणारा भारत, हे वेळोवेळी स्पष्ट केले आहे. म्हणूनच निधर्मीपणा हा शंकराचार्यांना 'स्टेट ऑनर' देण्याच्या आड येत नाही.

गुणे यांना भगव्या झेंड्याबद्दल अनासक्ती असल्याचे लेखातून सूचित होते. ते वाचून फारसे आश्चर्य वाटले नाही. कारण अनेक सद्गुणांचे प्रतीक असलेल्या या झेंड्याबद्दलचे अनाकर्षण, हे गुणे यांना या सद्गुणांची चाड नसल्याचेच सूचित करते.

या लेखात गुणे यांनी पुढे लिहिले आहे की, कार्यक्रमाच्या संयोजकांनी विदेशी विचारवाल्यांना ठोकावयाचेच ठरवले असल्यासारखे दिसते. (काय हे विदेशी विचारांवर प्रेम !) जर हे विदेशी विचारवाले सत्याचा अत्यंत विपर्यास करून हिंदू धर्माची समाजात अत्यंत खोटी प्रतिमा निर्माण करीत असतील तर हिंदू धर्माचे खरे राष्ट्रीय स्वरूप जाणणाऱ्यांनी या दिवशी विचारवाल्यांवर टीका करण्यात वावगे ते काय ?

तसेच सदर लेखकाने भटक्या विमुक्त संघटनेच्या अध्यक्षास मुद्दाम शंकराचार्यांना हार घालावयास आणल्याचा आरोप केला आहे. मी अनेक जणांकडे चौकशी केली असता त्या संघटनेचे अध्यक्ष स्वतःहून शंकराचार्यांना हार घालण्यास आल्याचे कळले.

विनय गुणे यांच्या लेखातून स्पृश्यास्पृश्यतेला जणू काही शंकराचार्य, त्यांचे शिष्य व हिंदुत्ववादी जबाबदार असल्याचा सूर निघतो. खरे पाहता, हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या सावरकरांनी जातिनिर्मूलनात फार मोठी भरीव कामगिरी केल्याचे वाचकांना ठाऊक असेलच. सदर लेखक म्हणतात की, शंकराचार्य हे हिंदू धर्मातील उच्च-नीचतेबद्दल काहीच ठोस बोलले नाहीत. एक तर लेखकाची भाषण ऐकण्यात चूक झाली असावी. शंकराचार्यांनी आपल्या भाषणात म्हटले की, मी उच्च-नीचता मानत नाही. इतरांनाही स्पृश्यास्पृश्यता न पाळण्याचे नेहमीच सांगत आलो आहे. त्यात भर म्हणून जर सरकारनेच जात विचारणे बंद केले तर जातिव्यवस्था दूर होण्यास मदत होईल. सरकारच जात विचारते, त्यामुळे जातिव्यवस्था टिकण्यास मदत होते ( ज्यांना सत्यता पडताळून पहावयाची आहे त्यांनी लोकप्रभेचा 'धर्मांतर' या विषयावरील ९ मे ८२ च्या विशेषांकातील पान क्रमांक ८ वरील शंकराचार्यांची मुलाखत वाचावी.) यात कुठे स्वतःवरची जबाबदारी टाळून सरकारवर विनाकारण आरोप करणे आले ? ही शंकराचार्यांनी सरकारला केलेली सूचना स्पृश्यास्पृश्यता प्रामाणिक हेतूने मिटवायच्या कामी कशी काय चुकीची आहे ?

याहूनही,गुणे यांना शंकराचार्यांनी आणखी जोरात, जोशात भाषण करावे असे वाटत असेल तर ते चुकीचे आहे. शंकराचार्य हे काही जोशात भाषण करायला पट्टीचे राजकीय वक्ते नव्हेत किंवा खोमिनींसारखे धर्मांध धर्मगुरूही नव्हेत.

शंकराचार्यांनी 'मी भारतीय आहे' हे वाक्य टाळ्या मिळवण्यासाठी म्हटले,हे लेखकाचे म्हणणे हास्यापद आहे. शंकराचार्यांना जर टाळ्याच मिळवायच्या असत्या तर ते समाजवादी पुरोगामी नेते बनले असते, संन्याशी नव्हे !

विनय गुणे लिहितात की, पूजा दर लावून केल्या जातात; परंतु श्रीमंतांकडून काढलेल्या या पैशाचा उपयोग पीठातर्फे हॉस्पिटल्स चालवणे, वनवासींसाठी आश्रम चालवणे, अन्नछत्र चालवणे इत्यादि मानवतावादी कृत्यांसाठीही होतो हे एक तर लेखकास माहीत नसावे, नाही तर लिखाणातून हे हेतुपुरस्सर गाळले तरी असावे.

शंकराचार्य यांच्याबरोबर वाद करण्यासाठी ठेवलेल्या अटी गुणे यांना विशेष झोंबलेल्या दिसतात.परंतु कोर्टात हुशार वकिलाबरोबर वादविवाद करण्यासाठी जसा त्याच्या एवढाच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त बुद्धीमान काळ्या कोटातला वकीलच पाहिजे, तिथे पहिली दुसरीतले शेंबडे मूल चालणार नाही, असाच वरील अटींचा प्रकार आहे.

शंकराचार्यांनी संगमनेर येथील वास्तव्यात हरीजनवाड्याला भेट दिली व तेथेही हिंदू समाजाने जातीभेद पाळू नये, असे आवाहन केले. यासारख्या अनेक चांगल्या गोष्टी लेखकाने शंकराचार्यांच्या 'पॅक' दिनचर्येचे वर्णन करताना खास समाजवादी स्टाइलने गाळलेल्या आढळून येतात.

हा खटाटोप कशासाठी ?

गुणे यांच्या लेखात फक्त एकच बाजू मांडण्यात आली आहे. म्हणून त्याची दुसरी बाजू मी मांडून, या बाबतीत वाचकांस दोन्ही बाजू कळून निःपक्षपातीपणाने विचार करता यावा, या हेतूनेच हे पत्र लिहित आहे. यातून मला कोणाच्याही विचारांवर वृथा टीका करावयाची नाही.

सद्यःपरिस्थिती—

विनय गुणे यांनी त्यांच्या लेखात शंकराचार्यांच्या विचारांना हिंदू धर्मात फार महत्त्वाचे स्थान असल्याचे दाखविण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. परंतु आज हिंदू धर्म परिवर्तनशील असून शंकराचार्यांनी जर जातिभेद पाळण्याचे आवाहन केले तर आजचे हिंदू हिंदू धर्मीय'शंकराचार्य'हे पदच नष्ट करण्यास कमी करणार नाहीत. तेव्हा उगीचच शंकराचार्यांना जातिभेदाबद्दल जबाबदार धरणे योग्य नव्हे.

माझ्या विचारांमध्ये कुठे दोष आढळल्यास ते दोषदिग्दर्शनाचे कार्य वाचकांनी करावे, ही माफक अपेक्षा. तसेच गुणे यांनीही 'हिंदूधर्म—मानवधर्म' अशा घोषणा देणाऱ्या लोकांना देवाने क्षमा करावी, यासाठी योग्य देव शोधण्यात वेळ घालवण्यापेक्षा, समाजकार्य करणेच अधिक स्पृश्य होईल. (तसे ते करीत असतील तर प्रश्नच नाही !)

२४ मे १९८२ — विवेक कुलकर्णी, संगमनेर

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : पहिला

५ जून १९८२

किंमत : दीड रुपया

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

चाळीस रुपये

¤



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही



¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९


## निशाण

बाविसाव्या वर्षाचा हा प्रथमांक. गेली बावीस वर्षे 'माणूस' नियमितपणे प्रसिद्ध होत आहे. प्रथम मासिक म्हणून, नंतर काही महिने पाक्षिक आणि १९६६ पासून साप्ताहिक. सुरुवातीला आकार सध्याचा होता. मध्यंतरी काही काळ तो निम्म्या पुस्तकाकारात निघत होता. एक दिवाळी अंक तर मोठ्या दुप्पट आकारातही निघाला.

छोट्या आकारात असताना 'माणूस' मध्यंतरी काही काळ आठवड्यातून दोनदाही निघत होता.

आकारात किंवा प्रकाशन-कालात असे बदल झाले तरी सतत नवे आणि दर्जेदार साहित्य देण्याचे उद्दिष्ट आणि वैशिष्ट्य कायम राखण्यात 'माणूस'ला बऱ्याच प्रमाणात यश लाभले.

किती तरी नवे विषय, नवे लेखक, नव्या उपक्रमांची–चळवळींची माहिती 'माणूस'द्वाराच प्रथम मराठी वाचकासमोर आलेली आहे.

असे नवे आणि नूतन देताना जुने संपूर्णपणे टाकून देण्याची 'माणूस'ची भूमिका मात्र कधीही नव्हती.

एक तर असे करणे शक्यही नसते आणि अगदी नवे, अपूर्व असे मानवी जीवनात काय असते ?

ती तीच पदे<br>
नित्य फिरुनी येती।<br>
त्या त्याच अर्थाप्रती<br>
दाविताती ।।

कौशल्य असते ते सारे रचनेत.

म्हणून नवीन स्वीकारताना जुन्याशी त्याचा कालमानाप्रमाणे अचूक मेळ साधण्याची दृष्टी हवी.

¤

आपल्याकडचे जुने चांगले काय आहे ?

जीवनाची मांडणी करताना आपण भौतिक आणि आध्यात्मिक या दोन्ही अंगाचा विचार केला, हे येथील संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

जोवर हा देश अभ्युदय आणि निःश्रेयस् या दोन्ही अंगांनी जीवनसत्याचा शोध घेत होता, तोवर येथे काही कमी नव्हते, कशाचीही उणीव नव्हती.

हा समग्रपणा पुढे संपला. कधी ऐहिकाचा, कधी पारमार्थिकाचा बडेजाव माजला आणि अधोगती सुरू झाली.

अजूनही ती थांबलेली नाही. आजही एकतर्फी बडेजावाच्याच गोष्टी बोलल्या–लिहिल्या जात आहेत. कुणी निधार्मिकता मिरवतो, इहवाद आणू पहातो, कुणी कुराणाकडे–पुराणाकडे डोळे लावून बसलेला आहे. विज्ञान आणि अध्यात्म परस्परांचे शत्रू आहेत अशीच आपली धारणा होऊन बसलेली आहे.

अशा एकांगी धारणेने काय होते ?

प्राचीन ग्रीसचे जे झाले ते.

ग्रीक संस्कृती इहवाद मानणारी. बुद्धिनिष्ठतेने व्यवहार करणारी. त्यामुळे विज्ञानात ग्रीसची खूपच प्रगती; पण ग्रीक साहित्य मात्र शोकांतिकांनी भरलेले. असे का ? कारण जीवन केवळ इहवादी ठरवले गेल्यामुळे भोगवाद माजला. सत्ता आणि संपत्ती यांचे पूजन सुरू झाल्यावर दुसरे काय होणार ? यामुळे उथळपणा, फुटकळपणा, बजबजपुरी वाढत गेली. व्यक्तीव्यक्तीमधले विश्वासाचे नाते संपले. सामाजिक बंधने शिथिल झाली. माणूस एकाकी, अगतिक आणि निराशाग्रस्त झाला. ही व्यक्तीव्यक्तीच्या अंतःकरणातील खोल निराशा, वैफल्य ग्रीक साहित्यात शोकांतिकाच्या रूपाने प्रकटले. असा शोकांतिकात बुडालेला समाज टिकणार कसा ?

टॉयन्बी या थोर इतिहासकाराने लिहिले आहे–

'State–worship was the spiritual disease that Hellenism died of–' (ईश्वराच्या जागी ग्रीकांनी राजसत्तेची स्थापना केली. या आत्मिक क्षयामुळे

शेवटी ग्रीक संस्कृती मरण पावली )

आपल्याकडच्या राधाकृष्णन् यांनीही ग्रीक संस्कृतीच्या अस्ताला आध्यात्मिक उपासमार हेच कारण म्हणून सांगितलेले आहे.

आणि ऐहिकाची उपेक्षा करणाऱ्या समाजाचे काय होते हे पाहायला लांब कशाला जायला हवे ? मध्ययुगीन भारताचा इतिहास यासाठी पाहणे पुरेसे आहे.

¤

एकवीस वर्षांपूर्वी 'माणूस'ने आपली ओळख करून देताना लिहिले होते—

'शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. पंचायतीकडे जादा अधिकार देऊन सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. नवा महाराष्ट्र खेड्यापाड्यांतून आकारास येत आहे.

खूप ज्ञान मिळवावे, पुष्कळ विद्या शिकावी अशी भूक सध्या येथील जनतेत निर्माण झालेली आहे. ही नैसर्गिक गरज पुरी करावी या उद्देशाने 'माणूस' सर्वांसमोर येत आहे.

जबाबदार वृत्तीने कारभार करणारा एक सुसंस्कृत नागरिक या विद्येतून व शिक्षणातून तयार झाला तरच तो नव्या काळाचे नेतृत्व योग्य तऱ्हेने करू शकणार आहे. 'अभिराष्ट्रेण वर्धताम्' हे वेदवचन यासाठीच 'माणूस'ने आपले ध्येयवाक्य म्हणून निवडले आहे. 'समाजासहित आपली उन्नती साधा' असा या वचनाचा अर्थ आहे. व्यक्तिहिताबरोबरच सामाजिक जबाबदारीची प्रेरणाही यात अंतर्भूत आहे.

अशा तऱ्हेच्या विचारसरणीतूनच एक समन्वयी, सुसंवादी व स्वाभिमानी जीवन जगणारा मनुष्य तयार होत असतो. असा मनुष्यच एका सहिष्णु, उदार, मानवी संस्कृतीची निर्मिती करू शकतो. फार पूर्वीपासून या देशाने हे आदर्श आपल्यासमोर ठेवलेले आहेत. नवभारताच्या उभारणीच्या काळात या आदर्शांचा विसर पडू नये, यासाठीच 'माणूस' हे नामकरण.

¤

पहिल्याच अंकावरचे मुखपृष्ठचित्र विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय सूचित करणारे होते.

¤

असा 'माणूस' एकांगी, टोकाची भूमिका मांडणारा कसा होऊ शकेल ?

त्यामुळे कुठल्याच घोळक्याशी वा पक्षाशी 'माणूस'ने स्वतःला बांधून घेतलेले नाही. मग तो घोळका शंकराचार्यांमागे जाणारा असो वा राष्ट्रीय एकात्मतेची पोकळ चर्चा करणाऱ्यांचा असो.

आपल्यासमोरील महत्त्वाचा प्रश्न 'राष्ट्रीय एकात्मता' हा नसून 'राष्ट्रीय पुरुषार्थ' हा आहे. एक हजार वर्षांच्या पारतंत्र्याने, पराभवाने खचलेल्या समाजाला कार्यप्रवृत्त आणि पुरुषार्थप्रवण कसे करायचे, हा प्रश्न 'माणूस'ला अधिक निकटचा वाटतो. इथल्या राष्ट्रवादाने प्रथम या प्रश्नाला भिडले पाहिजे. पुरुषार्थाकडे वाटचाल सुरू झाली की, एकात्मता साधली जाऊ शकते. स्वातंत्र्य-आंदोलनात ती अशीच साधली गेलेली होती. मरगळलेल्या, स्वार्थाने बुजबुजाटलेल्या समाजात एकात्मता साधली गेली काय, न गेली काय, फरक कोणता पडतो ? डबकी अलग राहिली किंवा एकत्र झाली तरी डबकी ती डबकीच ! उलट पुरुषार्थ म्हणजे वाहता प्रवाह. तो पुढे जात राहतो आणि लहान – मोठे ओढे, नदीनाले आपल्यात सामावून घेऊन सागराला मिळत असतो. समाजानेही असे प्रवाही स्वरूप घेतले पाहिजे. 'माणूस' मधून जे साहित्य गेल्या २१ वर्षांत आवर्जून देण्यात आले त्यामागे हा पुरुषार्थप्रवणतेचा मुख्य दृष्टिकोन होता. हा पुरुषार्थ मुख्यतः ग्रामीण भागातून प्रकट व्हायला हवा कारण अजूनही सत्तर टक्के भारत खेड्यापाड्यातच आहे. खेडी बदलली, पुढारली, समृद्ध बनली, तरच नवभारतही पुढारणार, समृद्ध होणार आहे. पण शेवटी ही समृद्धी, हे पुढारलेपण, ही प्रगती कशासाठी ? विज्ञान आणि आत्मज्ञान यांच्या समन्वयावर आधारलेल्या एका प्रगल्भ भारतीय जीवनशैलीच्या आविष्कारासाठी. आधुनिक भारतीय राष्ट्रवादाचा हा आशय आहे. समतावादी आंदोलनांचेही हेच उद्दिष्ट असले पाहिजे. बलसागर भारत हवा; पण कशासाठी ? बलसागर मानव उभा राहावा म्हणून. राष्ट्रवाद, समाजवाद या मानववादाच्या अगोदरच्या पायऱ्या आहेत. या पायऱ्यांचा आधार घ्यावा लागतो, नाही तर मानववाद हा पोकळ ठरतो, निष्क्रियतेला, निराशावादाला जन्म देतो.

¤

माणसाला पशुत्वाकडून देवत्वाकडे वाटचाल करायला प्रवृत्त करणारा मानवधर्म...

पूर्वी भारताने, हिंदू संस्कृतीने ही शिकवण दिली, आचरणात आणून दाखवली.

पुन्हा हे मानवयुग या भूमीत निर्माण व्हावे.

यासाठी भारतीय कोलंबसांनी म्हटले पाहिजे– कुसुमाग्रजांप्रमाणे–

मानवतेचे निशाण मिरवू
महासागरात ...

— संपादक

---

# तेरा वर्षांपूर्वी....

नरहर कुरुंदकर
२३–१–६९

प्रिय संपादक माणूस,
स. न.

महाराष्ट्रात दर्जेदार आणि वाचकप्रिय अशी दोन्ही विशेषणे एकदम लागू पडणारे तुमचे एकमेव साप्ताहिक आहे.

मी 'माणूस'चा नियमित वाचक आहे हे सांगणे नकोच.

जे 'माणूस'चे जन्मदाते, प्रतिपालकर्ते आहेत तेच तेव्हढे 'माणूस'चे चाहते आहेत असे मानण्याची चूक जर आपण केली नसेल तर या हजारो चाहत्यात एक नाव माझेही आहे, याची नोंद घ्यावी.

आपल्या यशात मला आनंद आहे. ते असेच वाढत राहो.

प्रिय माझगावकर
स. न.

जेव्हा सर्व साप्ताहिके कोसळली होती
तेव्हा

आणि जेव्हा टिकलेल्या साप्ताहिकांना वाचकवर्ग नव्हता तेव्हा आपण 'माणूस'द्वारे एक नवे पर्व उघडले, याविषयी मराठी साहित्याचा एक चाहता म्हणून मी कृतज्ञ आहे.

व्यक्तिशः तुमच्या कर्तृत्वाला स्वतंत्र शुभेच्छा.

आ.
नरहर कुरुंदकर

## मुक्काम मुंबई

# त्यांचा सरळपणा हैराण करणारा...!

'इस्कॉन तथा 'इन्टरनॅशनल सोसायटी फॉर कृष्ण कॉन्शसनेस' नावाच्या मंडळींचा परिचय झाला, तो त्यांनी आयोजित केलेल्या एका वार्ताहर परिषदेचं आमंत्रण आलं तेव्हा.'इस्कॉन'चं जाळं जगभर पसरलेलं आहे आणि लेबॅनॉनवासी महमद याह्या युनुस म्हणजे आताचे रावणारी दास कृष्ण कॉन्शसनेसबद्दलचे आपले विचार आणि आपण केलेला त्याचा स्वीकार, याविषयी बोलायला येणार होते. धर्माच्या बाबतीत, धार्मिक वृत्तीची माणसं एवढी फॅनॅटिक असतात की, एका धर्माच्या कट्टर अनुयायानं दुसऱ्या धर्माच्या काही तत्त्वांचा पुरस्कार करावा आणि त्यातही आपल्या धर्मापेक्षा तीच तत्त्वं कशी उजवी आहेत, असं हिरीरीनं मांडावं हा जरा विस्मयकारकच प्रकार आहे. तशात मीनाक्षीपुरम्चं धर्मान्तराचं प्रकरण तेव्हा अगदी ताजं होतं. बरोबरचे वार्ताहरही झकास होते, तेव्हा आडवे–तिडवे प्रश्न विचारून जरा धमाल येईल, हा वार्ताहर परिषदेला जाण्यातला उद्देश होता.

अपेक्षेप्रमाणेच या महमद याह्या युनुस तथा रावणारी दासांचं भाषण हे जवळजवळ सर्व ॲकॅडेमिक इंटरेस्टचं होतं. गीता, इतर हिंदु धार्मिक वाङ्मय आणि कुराण वगैरे इस्लाम धार्मिक वाङ्मयाचा चांगला परिचय असणारांना त्यांच्या विवेचनाचा अभ्यासू पाठपुरावा करता आला असता. मला या रावणारींची वैयक्तिक 'दास्तां' आणि मतंच 'अजीब' आणि अधिक इंटरेस्टिंग वाटली. पॅलेस्टाइनमध्ये जन्मलेल्या या रावणारींच्या घराण्यात सहाशे वर्षांच्या मुल्लापदाची परंपरा चालत आली होती. अस्सल धार्मिक आणि त्यातही इस्लामप्रेमी श्रद्धाळू वातावरणात त्यांचं संपूर्ण आयुष्य गेलं; पण अधिक प्रौढपणे विचार करताना त्यांना जाणवू लागलं की, आपल्या सर्व मानसिक गरजांना पुरं पडेल असं इस्लामी तत्त्वज्ञान नाही. जीवनविषयक सर्व प्रश्नांना उत्तरं देईल आणि सर्वच क्षेत्रांना स्पर्श करेल इतके ते परिपूर्ण नाही.कुराणाचा अभ्यास करून त्यांचं असं मत बनलं की, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनं पहायला गेलं तर कुराण हे अशा एका मुद्द्यावर किंवा बिंदूपाशी येऊन संपलं आहे की, जिथून पुढे व्यावहारिक नीति–नियम, 'डूज' आणि 'डोण्टस्' चा प्रांत संपतो आणि केवळ तात्त्विक, बुद्धिनिष्ठ चर्चेचा, विश्वविषयक ज्ञानाचा, विश्लेषणाचा प्रांत सुरू होतो. बोलून–चालून कुराण हे वाळवंटातल्या रानटी, भटक्या आणि भांडखोर टोळ्यांना वळण लागावं म्हणून घालून दिलेल्या नीतिनियमांची जंत्री आहे. त्यात तात्त्विक चर्चा नाहीत. कारण ज्या लोकांसाठी कुराण लिहिलं गेलं त्यांची ते समजण्याची पात्रता नव्हती. (हे मत माझं नसून व्याख्यातेमहोदयांचं आहे, गैरसमज नसावा.) कुराण ही प्राथमिक पायरी आहे आणि गीता ही त्याच्यावरची पायरी आहे–प्युअर तसंच अप्लाइड, असं ते तत्त्वज्ञान आहे. विशेष म्हणजे, ज्या मुद्द्यावर कुराण संपतं, तिथपासून गीता सुरू झाली आहे. कुराणाच्या शेवटी मुल्लानं अल्ला म्हणजे काय, आत्मा म्हणजे काय, त्याचं स्वरूप काय असा प्रश्न विचारला आहे; परंतु 'हे समजण्याची तुझी पात्रता नाही', असं म्हणून ते उत्तर दिलं गेलेलं नाही; परंतु ईश्वर म्हणजे काय, या स्पष्टीकरणानंच गीता सुरू होते. कुराणानं केवळ उल्लेखलेल्या अनेक मुद्द्यांचं स्पष्टीकरण गीतेत आहे आणि म्हणूनच गीता समजावून घेतल्याशिवाय मी खरा मुसलमान होऊ शकणार नाही.

**मीनाक्षीपुरम्च्या दलित धर्मांतराबद्दल काय ?**

धर्म तर कुठलाच वाईट नाही. तेव्हा इस्लाममध्ये येण्यात चूक काही नाही. मात्र अखेर गीता आणि कृष्ण कॉन्शसनेस याच्याकडे सगळ्या धर्म, पंथ, तत्त्वज्ञानांनी वळणं अपरिहार्य आहे.

पृष्ठ २९ वर

## कामगारवृत्त

**१९** मे च्या पोटनिवडणुकीनंतर आपला संप मिटेल आणि आपण कामावर जाऊ या आशेवर २॥ लाख गिरणीकामगार आपले जीवन कंठत होते; परंतु निवडणुकीचा निकाल लागून आज दहा दिवस उलटून गेले तरी संप मिटण्याच्या बाबतीत अद्याप कोणतीच प्रगती नसल्याने २॥ लाख गिरणीकामगार अतिशय हवालदिल झाले आहेत !

खरं पाहिलं तर हा प्रश्न इतका जटिल होईल असे कोणासही वाटले नव्हते. आपल्या नेहमीच्या स्टाइलने डॉ. सामंतांनी कामगारांना सहा महिने घरी बसण्याची तयारी ठेवा असे प्रारंभीच सांगितले असले तरी हा काळ खरोखरच आपणास काढावयास लागेल असे डॉ. सामंतांना तरी वाटले होते की नाही कोणास ठाऊक ! पण एवढा कालावधी लागला असे आज खरोखरच वाटू लागलंय.

डॉ. सामंतांचे नेतृत्व लढाऊ असल्याने एका फार मोठ्या उत्साहाने कामगारांनी या लढ्यात उडी घेतली. डॉ. सामंतांच्या सर्व सभा, सर्व लाँग मार्च प्रारंभी गाजून गेले. तो विराट लाँग मार्च पाहून कामगारांना वाटले की, आता तरी सरकारचे डोळे उघडतील ! पण सरकार ठप्पच !

सरकारच्या या ठप्पपणातून आणि वाढत असलेल्या आपल्या लोकप्रियतेतून डॉ. सामतांना राजकारणात उतरण्याची बुद्धी सुचली. गिरणीकामगारांच्या प्रश्नांसाठी बोलावलेल्या सभेत डॉ. सामंत जेव्हा निवडणुकीची घोषणा करू लागले तेव्हा मात्र जाणकार कामगार थोडा सावध झाला. तो विचार करू लागला आणि आता या प्रश्नात राजकारण शिरल्याचे त्यांच्या ध्यानी येताच तो मग चार पावले लांबच राहू लागला !

म्हणूनच नंतरच्या सभेत पहिला उत्साह राहिला नाही. कामगारांची उपस्थिती कमी राहू लागली. इतकेच नव्हे तर आम जनतेच्या मनात गिरणी कामगारांच्याबद्दल जो एक आपलेपणा तयार झाला होता तोही मग कमी होऊ लागला.

याचं कारण इतकंच की, डॉ. सामंतांनी निवडणूक लढवावी ही गोष्ट अनेक जाण-

# सामंत संप शेवटचे पर्व

कारांप्रमाणे कामगारांनाही मंजूर नव्हती. निवडणुकीचा आणि गिरणीकामगारांच्या प्रश्नाचा संबंधच अलग होता. डॉ. सामंत निवडून येताच गिरणीकामगारांचा प्रश्न लागलीच मिटेल, असंही नव्हत; पण निवडणूक होईतोपर्यंत काहीही होऊ शकत नाही याचीही जाण कामगारांना होती. म्हणूनच ते निवडणूक होण्याची प्रतीक्षा करत होते.

मुंबईतील सर्व कार्यकर्ते ठाणे मतदार संघात प्रचारासाठी पाठवूनही डॉ. सामंत दुर्दैवाने या निवडणुकीत विजयी होऊ शकले नाहीत; पण इंदिरा काँग्रेसला शह देण्याच्या बाबतीत ते दोनदा यशस्वी झाले. १९८० च्या लोकसभा निवडणुकीमध्ये डॉ. सामंतांच्या अपक्ष उमेदवारीमुळेच इंदिरा काँग्रेसची सीट गेली आणि आज १९८२ साली पुन्हा त्याच गोष्टीची पुनरावृत्ती झाली. आपल्या उमेदवारीमुळे इंदिरा काँग्रेसचा पराभव होतो हे डॉ. सामंतानी दोनदा दाखवून दिले आहे. आता तरी सरकारने सुधारावे आणि कामगाराच्या प्रश्नात लक्ष घालावे अशी प्रतिक्रिया निवडणुकीनंतर डॉ. सामंतानी खाजगीत व्यक्त केली आहे.

निवडणुकीच्या धामधूमीत युनियन कार्यालयाकडे लक्ष देण्यास डॉ. सामंतांना शक्य झाले नाही. सकाळी ७ पासून रात्री १ पर्यंत ते ठाणा मतदारसंघातच असल्याने शेवटचे पंधरा–वीस दिवस तर युनियन कार्यालयात अतिशय शुकशुकाट होता. युनियन कार्यालयाप्रमाणेच कामगारही अतिशय स्तब्ध होते. त्यांच्यातील उत्साह मावळला होता. संध्याकाळी युनियन कार्यालयाला चक्कर टाकण्याचेही त्यांनी सोडून दिले होते.

पण निवडणुकीतील पराभवानतर खचून न जाता डॉ. सामंत दुसऱ्याच दिवसापासून कामाला लागले. कामगारातील उत्साह कमी होत आहे हे त्यानी जाणले होते. सरकार याच गोष्टीची आतुरतेने वाट पहात आहे हे त्यानी हेरल्यामुळे कोणता तरी आक्रमक कार्यक्रम पुढे ठेवण्यावाचून डॉ. सामंतापुढे गत्यंतर नव्हते. निवडणुकीनंतर डॉ. सामंतांचा नेहमीचा कार्यक्रम पुन्हा सुरू झाला. रात्री १२ पर्यंत युनियन कार्यालयात बसणे हा त्यांचा नित्याचाच कार्यक्रम! या वेळात त्यांनी कामगाराच्या भावना जाणून घेतल्या. याच आधारावर २३ मे रोजी त्यांनी माटुंग्याच्या पाच–बगीचामध्ये एक जाहीर सभा घेतली. या सभेत गिरणीकामगारांच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी डॉ. सामंतांनी जेल भरो आंदोलनाची घोषणा केली.

गेल्या काही वर्षांपासून डॉ. सामंत जेल भरो आंदोलनाची घोषणा करीत आहेत; पण हे काम अद्याप त्यांच्या हातून झालं नाही. त्यानी विराट लॉंग मार्च काढला, शिवाजी पार्कवर जाहीर सभा घेतली, महाराष्ट्र बंदची घोषणा केली; पण आता फक्त जेल भरो आंदोलनच बाकी राहिले आहे. म्हणूनच माटुंग्याच्या जाहीर सभेत डॉ. सामंतानी ही घोषणा केली!

घोषणेप्रमाणे युनियन कार्यालयात कामगाराची नावे घेण्याचे काम वेगाने सुरू झाले आहे. ज्याना या आंदोलनात भाग घ्यावयाचा आहे त्यांनी आपली नावे युनियन कार्यालयात द्यावीत असे सांगितल्याने आतापर्यंत चार हजार कामगारानी आपली नावे नोंदवली आहेत. हा आकडा वीस तीस हजारांच्या घरात जाईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. असे जर झाले तर डॉ. सामंत जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात हे आंदोलन सुरू करतील असे वाटते.

डॉ. सामंत जेल भरो आंदोलनात गुतले आहेत तर तिकडे राष्ट्रीय मिल मजदूर संघ होशिगना ठेवावयाचे की, खा. वसंतदादा पाटील याना आणावयाचे या प्रश्नात गुतला आहे. रा. मि. म. संघाची सूत्रे वसंतदादांच्याकडे द्यावीत अशी अनेकाची इच्छा आहे.

पण असे जरी झाले तरी मूळ प्रश्न बाजूसच राहतो. डॉ. सामंतांनी जेल भरो आंदोलन सुरू केल्याने गिरणीप्रश्न जसा लगेच सुटणार नाही तसा वसंतदादा आल्यानेही तो सुटणार नाही. खरा प्रश्न कामगारांच्या आर्थिक मागण्याचा आहे आणि मागण्यांबाबत सरकारची भूमिका अद्यापही ताठर आहे. 'आधी कामावर या' 'प्रातिनिधिक युनियनशीच आम्ही बोलणी करू' ही सरकारची भूमिका अद्यापही जशीच्या तशीच आहे. डॉ. सामंतानी जेल भरो आंदोलन सुरू केल्याने सरकारच्या या भूमिकेत फरक पडेल का? रा. मि. म. संघाचे नेतृत्व वसंतदादा पाटील याच्याकडे आल्याने सरकारच्या भूमिकेत फरक पडेल का? असे जर असेल तर डॉ. सामंतानी आंदोलन सुरू करावे आणि वसंतदादांनीही अध्यक्षपदाची सूत्रे हाती घ्यावीत.

पण हे होणे अशक्यच दिसते आहे. होळीनंतर कामगार कामावर परततील हा अदाज सरकारने प्रथम व्यक्त केला; पण तो फोल ठरला. पाडव्यानंतरचाही अंदाज फोल ठरला. निवडणुकीच्या निकालानंतर तरी कामगार कामावर परततील असे सरकारला वाटले होते; पण हाही भ्रम ठरला! कामगारांनी असे अपमानाने खाली मान घालून कामावर परतावे असे जे सरकारला वाटत आहे ती खरोखरच दुर्दैवाची घटना आहे! कामगारांच्या मनोवृत्तीचा सरकारने मनापासून विचार करावा. हा विचार करून सरकारने काही ना काही रक्कम कामगारांना वाढीव स्वरूपात दिली तरच गिरणीसंपाची कोंडी फुटेल. रिकाम्या हाताने वसंतदादा जर अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेणार असतील तर त्यातून काही निष्पन्न होईल असे वाटत नाही. अध्यक्षपदाची सूत्रे घेतल्यानंतर वसंतदादानी जर काही कामगारांच्या भल्याच्या घोषणा करून खरोखरच त्याना काही वाढीव रक्कम दिली तरच गिरणीकामगार कामावर परतेल. नाही तर होशिंग राहिले काय आणि दादा आले काय कामगारांना सारखेच आहे! कामगारांचा खरा प्रश्न आर्थिक मागण्यांचा आहे. तो जो मिळवून देईल त्याला होकार देऊन कामगार कामावर परततील, अन्यथा हा संप असाच चालायची जास्त शक्यता दिसते आहे. असे जर झाले तर २॥ लाख कामगाराच्या मुलांच्या शिक्षणाबाबतचे भवितव्य काय? आता जूनच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत शाळा-कॉलेजे सुरू होत आहेत. पावसाळाही याच सुमारास असल्याने त्याच्याअगोदर कामगाराना मुंबईत परतून आपली घरे ठाकठीक करून घ्यावयास हवीत. मुलांच्या ॲडमिशनसाठी या कामगार-पालकाना हातपाय हालवावे लागतील. असे जर नाही झाले तर दोघाच्या भांडणात बिचाऱ्या युवकाचे आयुष्यातील एक मोलाचे वर्ष फुकट जाईल! म्हणूनच सरकारने व डॉ. सामतानीही आता हा प्रश्न जास्त लोबकळत ठेवू नये अशीच सर्वसामान्य कामगाराची मनापासूनची इच्छा आहे. त्याच दृष्टीने आता प्रयत्न व्हावयास हवेत व संपाचे हे शेवटचे पर्व संपुष्टात आणावयास हवे!

—मोहन शं. कुलकर्णी
घाटकोपर

# रशिया
## शेतीआघाडीवरील अपयश
वा. दा. रानडे

सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाची खास बैठक गेल्या आठवड्यात मॉस्को येथे झाली. उत्पादन कसे वाढवायचे, हा बैठकीपुढे मुख्य प्रश्न होता. क्रांतीनंतर गेल्या ६५ वर्षांत रशियाने मोठी प्रगती करून जगातील दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र, हे स्थान मिळविले, पण शेती आघाडीवर काही रशियाला समाधानकारक यश आलेले नाही. या बैठकीचे निर्णय हा लेख लिहीपर्यंत तरी अधिकृतपणे जाहीर झालेले नव्हते आणि धोरणात मोठा बदल असेल तर तो एकदम जाहीर करण्याची रशियन नेत्याची प्रथाही नाही. स्टालिन यानी सामुदायिक शेतीचा कार्यक्रम धडाक्याने अंमलात आणला, तीच व्यवस्था काही किरकोळ बदलांसह अजूनही चालू आहे; पण आता त्यामध्ये आमूलाग्र बदल करावेत काय, याचा विचार रशियन नेते करीत आहेत. 'सध्याची धान्यटंचाई हा देशापुढील सर्वांत गंभीर राजकीय व आर्थिक प्रश्न आहे,' अशा शब्दात ब्रेझनेव्ह यानीच याचे वर्णन केलेले आहे. शेती उत्पादनवाढीसाठी १९९० पर्यंतचे धोरण ठरविणे,हा या बैठकीपुढील मुख्य प्रश्न होता.

निर्णय जाहीर झालेले नसले तरी तात्त्विक, सैद्धांतिक भूमिकेचा आग्रह न धरता खाजगी व सहकारी शेतीला उत्तेजन देण्याकडे रशियन नेत्यांचा कल होऊ लागला आहे, असे तेथील वृत्तपत्रात आलेल्या लेखांवरून सूचित होते. लेनिनच्या निधनानंतर प्रथमच मोठे बदल केले जाण्याची शक्यता असून शेतमालाच्या किंमती ठरविणे, कोणती पिके काढावयाची हे ठरविणे आणि आलेले पीक बाजारपेठेत विकणे याबाबतीत आतापर्यंत कधी दिले नव्हते असे व्यापक अधिकार शेतकऱ्यांना द्यावेत, अशा सूचनावर सध्या विचार चालू आहे.

धान्यटंचाई, धान्याची नासाडी, अधिकाऱ्याची अकार्यक्षमता, गैरकारभार आणि शेतीउत्पादनात–विशेषत: दूध, मास, धान्य, भाजीपाला–यांच्या उत्पादनात घट झाल्याचे आकडे यावर स्पष्टपणाने सार्वजनिक चर्चा होत आहे. यावरून रशियाची शेतीआघाडीवरील परिस्थिती किती बिकट आहे, याची कल्पना येते, असे 'लंडन टाइम्स'चे मॉस्कोतील वार्ताहर मायकेल बिन्यान यांनी आपल्या वार्तापत्रात म्हटले आहे. हा वार्ताहर लिहितो, 'गेल्या वर्षी धान्यउत्पादनात एवढी घट झाली की, उत्पादनाचे आकडे सरकारने अजून जाहीर केलेले नाहीत ! गेल्या वर्षी १७ कोटी टन धान्यउत्पादन झाले असावे, असा अंदाज आहे. ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा ते ६ कोटी ६० लाख टनानी कमी आहे आणि १९७६ पासून गेल्या सहा वर्षांतील धान्यउत्पादनाची ही सर्वांत खालची पातळी आहे, हे पुढील आकड्यावरून स्पष्ट होईल.

**रशियातील धान्य उत्पादन**

| | | |
|---|---|---|
| १९७६ | २२.३७ | कोटी टन |
| १९७७ | १९.५७ | ,, |
| १९७८ | २३.७४ | ,, |
| १९७९ | १७.९२ | ,, |
| १९८० | १८.९० | ,, |
| १९८१ | १७.०० | अंदाज |

त्यामुळे रशियाला या वर्षी ४ कोटी २० लाख टन धान्य आयात करावे लागेल.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात धान्याची जेवढी तीव्र टंचाई जाणवत होती तेवढी आता जाणवत आहे. बहुतेक प्रांतिक शहरांमधून धान्य व मास याचे रेशनिंग करण्यात आले आहे. धान्यपुरवठ्याबद्दल तक्रारी करणाऱ्या पत्राचा अधिकाऱ्यांकडे पाऊस पडत आहे. आम्हाला अधिक व चांगले धान्य पुरवा अशी मागणी करण्यासाठी संतप्त कामगारांनी काही ठिकाणी काम थांबविल्याचीही उदाहरणे आहेत !

धान्याप्रमाणेच दूधउत्पादनातही कशी घट झाली आहे हे सहा वर्षांतील आकड्यावरून दिसून येते.

रशियातील एकूण गुंतवणुकीपैकी एकतृतीयांश गुंतवणूक शेतीक्षेत्रात केली जाते.

**रशियातील दूधउत्पादन**

| | |
|---|---|
| १९७६ | ८–९७ कोटी टन |
| १९७७ | ९–४९ ,, |
| १९७८ | ९–४५ ,, |
| १९७९ | ९–३३ ,, |
| १९८० | ९–०७ ,, |
| १९८१ | ८–८५ ,, |

हे प्रमाण वाढवले जाण्याचा संभव आहे. तसेच शेतीसाठी अधिक व चांगली यंत्रसामग्री, अधिक खत, ग्रामीण भागात रस्ते, शेतकामगाराना शिक्षण व अधिक बोनस या कार्यक्रमास प्राधान्य देण्याचा अधिकाऱ्यांचा विचार आहे

स्टालिनची सामुदायिक शेतीपद्धती रद्द करण्यात येईल असे सूचित करण्याचे कम्युनिस्ट नेत्यानी आतापर्यंत तरी टाळले आहे; पण पावले त्याच दिशेने पडण्याची शक्यता दिसते. शेतीव्यवस्था कशी असावी याबाबत हंगेरीचा आदर्श शेतीतज्ज्ञ आणि शेतकरी याच्यापुढे ठेवण्यात येत आहे आणि खासगी शेती पुन्हा सुरू करण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यात येत आहे.

पण शेतीपद्धतीत मोठ्या सुधारणा करण्याचे रशियन नेत्यानी ठरविले तरी त्यांच्यापुढे मुख्य प्रश्न आहे तो जड, निष्क्रिय नोकरशाहीला कार्यप्रवण कसे करावयाचे ? भांडवलशाहीतील नोकरशाहीवर कम्युनिस्ट नेहमी टीका करीत असतात. नोकरशाहीवर विसबून राहून योजना यशस्वी होत नसतात. त्यासाठी पक्षकार्यकर्त्यांची संघटना हवी, असे त्याचे प्रतिपादन असते; पण नोकरशाही मनोवृत्ती बदलण्यात रशियन नेत्यानाही यश आलेले नाही आणि भांडवलशाही देशातल्या नोकरशाहीचे दोष तेथील नोकरशाहीतही आलेले आहेत. बदलायला तयार नसलेल्या स्थानिक नोकरशाहीवर नव्या सुधारणा लादून त्या यशस्वी होणे कठीण आहे. □

# खोटी मने ! खोटे समारंभ !

'महापालिकेच्या शतकमहोत्सवासाठी अव्वाच्या सव्वा खर्च झालेला नाही. झाला तो खर्च कमी व मर्यादित झाला.' असे उद्गार पुणे महापालिकेचे आयुक्त श्री. हाटे यानी काढल्याचे प्रसिद्ध झाले आहे.

हा वृत्तांत जर बरोबर असेल तर स्पष्ट बोलण्यासाठी आयुक्त श्री. हाटे यांचे अभिनंदन करावयास हवे माणूस म्हटला की त्याला समारंभ आवडतो आणि समारंभ म्हटला की त्यासाठी नेहमीपेक्षा जास्त खर्च आलाच. असा प्रसंगोपात्त होणारा खर्च योग्यच म्हणावयास हवा. तो मर्यादेबाहेर जाऊ नये, हे उघडच आहे. पण काहीना हा योग्य खर्चही वारेमाप व अनावश्यक वाटतो. त्याचे म्हणणे असे की, असे खर्च आणि असे समारंभ पूर्णपणे टाळावेत.

आपणा सर्वांना आठवेल की, असे एक आंदोलन बालगंधर्व रंगमंदिराची योजना पुणे महापालिकेने हाती घेतली, त्या वेळी झाले होते. पुणे शहराचे तातडीचे प्रश्न सुटले नसताना रंगमंदिरासारख्या करमणुकीच्या आणि चैनीच्या योजनांवर पालिकेने पैसे उधळू नयेत, अशी आंदोलकाची मागणी होती. महापालिकेनेच नव्हे, तर सर्वसाधारण नागरिकांनीदेखील या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. बालगंधर्वासारखे नमुनेदार रंगमंदिर तयार झाले. ज्यांच्यासाठी हे रंगमंदिर नसावे म्हणून आंदोलन झाले, त्यांच्यापैकी अनेकजण या रंगमंदिरात बसून नाटकाचे किंवा इतर करमणुकीचे कार्यक्रम आनंदाने ऐकत आहेत, असे आज दिसते.

असे अनेकदा होते. आरंभीचे आंदोलन म्हणून, वा पोरवयातील उद्रेक म्हणून, आदोलक टोकाची तीव्र भूमिका घेतात. एखाद्या सामाजिक दुखण्याकडे लक्ष वेधतात. त्यांचा विरोध बहुधा प्रतीकात्मक असतो. या विरोधाकडे दुर्लक्ष करणेच इष्ट असते.

कालांतराने आंदोलक प्रौढ होतात. गृहस्थ होतात. नेते होतात. वेगळ्या वाटेची, त्यांची स्वतःची म्हणून, एक प्रस्थापितता तयार झालेली असते या स्वतःच्या प्रस्थापिततेच्या रक्षणासाठी मग हे नवप्रौढ समाजातील इतर प्रस्थापितताच्या अस्तित्वाशी, कधी अविरोधाने तर कधी सहकार्याने, वागू लागतात. त्यांचा सूर सौम्य होतो. भाषा सामंजस्याची होते. ते सुहास्याने पारंपारिक पारितोषिके, सत्कार स्वीकारतात. ज्यांची त्यांनी पूर्वी थट्टा-चेष्टा-कुचेष्टा केलेली असते त्याच्याकडून पाठीवर शाबासकीची थाप मारून घेण्यात खूष होतात आणि हे सारे स्वीकारताना, आपली मूळ क्रांतिकारक भूमिका कायम आहे, अशी त्यांची समजूतही कायम असते. अशा लोकाना माझा एक मित्र 'गुलाबी क्रांतिकारक' म्हणतो.

पुणे पालिकेचे आयुक्त श्री. हाटे यांनी सध्याच्या अशा 'गुलाबी क्रांतिकारकां' कडे लक्ष दिले नाही हे ठीकच झाले. मात्र, समारंभ करुच नयेत, ही भूमिका जरी अवास्तव असली, तरी समारंभ सध्या होतात तसे होऊ नयेत ही भूमिका मात्र कोणासही पटावी अशी आहे.

□

सध्या जे समारंभ होतात व जसे होतात ते पाहिले तर ते मारुन मुटकून करायचे म्हणून केले जातात आणि परिणामी, सर्व संबंधिताच्या असमाधानाला किंवा संतापाला कारण होतात, असेच चित्र दिसते.

आज-काल लग्नसराई जोरात आहे. वैशाख संपून ज्येष्ठ सुरु झाला तरी लग्नसराई ओसरण्याचे काही चिन्ह नाही. हे जे लग्नसमारंभ होतात, त्यात काय दिसते? तर कंटाळा, उरकेपणा, अंदाधुंदी, गोंधळ नि सरतेशेवटी शिव्या.

लग्नात खरे तर वधू-वरांना महत्त्वाचे स्थान हवे. त्या दोघाना सुख होईल, समारंभातले सुखाचे व आनंदाचे क्षण नंतर बराच काळ आठवावेसे वाटतील, त्यांना महत्त्व मिळेल, साऱ्यांचे लक्ष त्यांच्यावर खिळेल— अशी लग्न-समारंभाची आखणी हवी. कारण लग्न त्याचे असते. अनुभव मात्र असा येतो, की लग्न हा समारंभ इतर कोणाचाही असो, पण तो ज्याचे लग्न असते त्या वधू-वरांचा मात्र नसतो. गणपतिउत्सवातील श्रीच्या मूर्तीप्रमाणे, ती दोघे केवळ 'प्राणप्रतिष्ठा' होऊन साक्षीभावाने 'असतात.' समारंभ खरा इतरांचाच असतो.

ह्या इतरातही समारंभ वरपक्षाचाच जास्त प्रमाणात असतो. वधू आणि वर या दोन पक्षात अजूनही वरपक्ष हाच अधिकारारूढ पक्ष असतो. राजकारणात राज्य हे नावाला साऱ्या जनतेचे असते; पण वापरायला सारी कारभारयंत्रणा अधिकारारूढ पक्षाची असते. तसेच लग्नसमारंभात वरपक्षाचे असते. सर्व हक्क त्यांच्या स्वाधीन असतात. वरपक्षाचे दर्शनी नेतृत्व वराकडे, म्हणजे लेकाकडे असते. खऱ्या नियंत्रणाचा अधिकार माताजीकडे, म्हणजे वरमाईकडे असतो.

साधारणपणे वरमाईची दोन उद्दिष्टे असतात. वधूपक्षाकडून शक्य ते सारे उकळणे हे एक. वधूपक्षाला जास्तीत जास्त अपमानित करून छळणे हे दुसरे.

सामाजिक परंपरा ह्या ही दोन उद्दिष्टे पुरी करून घेण्याचा लोकमान्य आधार असतो. 'रीतच तशी आहे. आपण तरी काय करणार?' असा उद्गार कष्टावलेल्या आवाजात मधूनमधून काढायचा. 'हूं ऽऽऽ' असे विषादाचे लेपन त्या वाक्यांना नंतर करायचे. काही वेळा, 'आमच्या नलीच्या वेळेला नाही का? अमुक एक केलं नाही असं नाही. जे मागितलं ते दिलं. जे सांगितलं ते केलं. काय

करणार? आपली बाजूच डावी पडली.' अशी स्वानुभवाची जोड आपल्या लांबवलेल्या 'हूं'ला द्यायची.

यावर वधूमातेला, 'खरं हो.' यापलीकडे वेगळे आक्रमक उत्तर देताच येत नाही.

'लग्न करायचं ते जुन्या पद्धतीनं. रजिस्ट्रारच्या अध्यक्षतेखाली नुसती तुमची सभा नको आणि नव्या पद्धतीत काय, रजिस्ट्रारला बोलावून दक्षणा देताच ना? मग आमच्या वासुभटजीवर तुमचा राग का? अहो, तो म्हणजे जुन्या काळचा रजिस्ट्रारच.'–असे विश्वासात घेऊन, काहीसा नेहमीचा विनोद करीत जुन्या पद्धतीचा प्रस्ताव केला म्हणजे तो साधारणतः कोणाला फेटाळता येत नाही. एखाद्या वधूपित्याने आपल्या स्वत:च्या घरी, विरोध केलाच तर वधूमाताच तो विरोध मोडून काढते. 'तुम्हाला काय त्रास आहे जुन्या पद्धतीत? मलाच सारं करावं लागणार आहे. माझी मी खंबीर आहे, सगळं करायला!' अशा सणसणीत आत्मविश्वासाखाली वधूपिता साहजिकच सपशेल दडपला जातो.

गंमत अशी की, 'जुनी पद्धत' म्हणजे नेमकी कोणती, हे नेमके कुणालाच माहिती नसते, अन् माहिती नसते हेच नेमके सोयीचे ठरते. खरे म्हणजे, जुन्या पद्धतीत वर व वधू या उभय पक्षांनी आळीपाळीने व बरोबरीने करावयाचे विधी आहेत. मांडव परतण्याच्या पूर्णविरामाला समतोल म्हणून व्याहीभोजनाचा आरंभबिंदू आहे. सीमान्तपूजनासाठी वाङ्निश्चय आहे, तर रुखवतासाठी तेलफळ आहे. वरघोड्यासाठी वरात आहे.

पण यातले वरपक्षातर्फे व्हावयाचे विधी सरळ गाळले जातात. 'तुम्हाला हौस असली तर तुमच्या खर्चाने करा' असे कोरडे, बेफिकीर उत्तर येते. वधूपक्षाने करण्याचे सारे उपचार मात्र ठोकून घेतले जातात. अगदी प्रेमोत्तर विवाह असला आणि वधू-वर अरेतुरेत असली तरी ऐनवेळी वर आजीच्या किंवा थोरल्या बहिणीच्या सबबीमागे लपतो आणि या लुटालुटीला साथ देतो.

मला नेहमी कोडे पडते ते हे की, या साऱ्यातून वरपक्षाला समारंभाचा म्हणून आनंद असा कोणता मिळतो? वधूपक्ष वरून लाचार झालेला आणि आतून चिडलेला आहे. वधूच्या डोळ्यांना धार लागली आहे अन् मनाला कायमची अढी बसली आहे. आई धुसफुसते आहे. वडिलांनी बगळ्यासारखा शांतपणा धारण केला आहे. जिकडे-तिकडे वरून स्तब्धता अन् आतून कुजबुजी चालू आहेत. या साऱ्या वातावरणात वराला काय किंवा इतर कुणालाच काय, आनंद कसा मिळत असेल? समारंभ तर आनंदासाठी असतो ना? मग प्रत्येक वरपक्ष, आनंदाची साधी, सरळ वाट सोडून, हेवादावा, सूड, मत्सर, चीड, कुजकेपणा या आडवाटेला का लागतो? की या मंडळींना, म्हणजे आपणासाऱ्यांना, साधा, सरळ आनंद नकोच असतो? ¤

अलीकडे निरनिराळे समारंभ पाहताना हेच मला जास्त जास्त पटत चालले आहे.

साध्या, निरागस आनंदापेक्षा कुजकी उत्तेजित अवस्था – pervert excitement – माणसाला जास्त आवडत असावी. माणसातला न मावळलेला रानटीपणा, न विरघळलेला पशूपणा या प्रवृत्तींना शांततेपेक्षा युद्ध अधिक प्रिय असावे. तथापि, माणसात अतिविकसित बुद्धिमत्तादेखील आहे, म्हणून तो रानटी पद्धतीने, किंवा पशूच्या पद्धतीने, सरळ युद्ध करीत नाही. 'आमचे शस्त्र म्हणजे विचार' या फाल्गुनरावी कृतिशून्य वृत्तीने तो डावपेच आखतो, पाठीत खंजीर खुपसतो, वर मैत्रीचे नाटक करून आत वेगळेच बेत आखतो.

या साऱ्या पद्धतीला सभ्य भाषेत माणसाने 'मुत्सद्देगिरी' हे नाव दिले आहे. राष्ट्राराष्ट्रांच्या संबंधात या विकृत पद्धतीचे अनिर्बंध कौतुक होते. ही पद्धती कौशल्याने राबविणाऱ्याचे श्रेष्ठ देशभक्त म्हणून कौतुक होते.

देशातल्या देशात, सत्ताकारणात व संस्थाकारणात धूर्तपणा, चातुर्य म्हणून हा गुण गौरविला जातो. व्यापारात, मग तो नंबर एकचा असो की नंबर दोनचा, या गुणाला व्यापारकौशल्य, व्यवहारनैपुण्य असे गौरविण्यात येते.

व्यक्तिगत जीवनातही यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले गुणवैभव असे याचे महत्त्व मान्य झाले आहे. One-up-manship चे skill असे याचे जुने नाव होते. man-management असे याचे नवे नाव आहे.

एकूण काय, फसवेगिरी किंवा फसवता येण्याची क्षमता हा आजच्या जीवनात, कोणत्याही पातळीवर आवश्यक असा गुण मानला जातो. हा गुण, म्हणजे खरे तर दोष, ज्याच्याजवळ नसतो त्याला कमी लेखले जाते. 'यू सी. दॅट ईज द सोसायटी वुई हॅव टुडे. इट् ईज् अ फिअर्सली कॉंपिटिटिव्ह सोसायटी. यू हॅव टु हॅव 'सम् स्किल्' टु सर्व्हाइव्ह". असा उपदेश साध्या सरळ माणसाला वरिष्ठ पातळीवरून, गंभीरपणे करण्यात येत असतो. 'सम् स्किल' म्हणताना, 'सम्' वर असा काही बारीक, दुमडलेला आघात असतो की, त्यातून 'सम्'चा सारा लपलेपणा, वाकडेपणा अलगद स्पष्ट व्हावा.

सरळपणा हा अक्षम्य दोष ठरावा आणि लबाडी हा गुण ठरावा यापेक्षा अधिक विकृती ती कोणती? ही विकृती आज सर्वत्र पसरली आहे. आपले सारे समारंभ या विकृतीच्या आविष्कारासाठी उत्तम 'प्रयोग-प्रसंग' म्हणून वापरले जातात.

लग्नसमारंभाचेच पहा. वरपक्ष–वधूपक्ष हे अंतर्गत युद्ध सोडून द्या. ते चालू असतेच; पण आपले व्यावसायिक हित साधण्यासाठी वापरण्याची एक संधी म्हणून लग्नाच्या समारंभाचा वापर करण्यात दोन्ही पक्षांचे एकमत असते.

निमंत्रणे कोणाला पाठवायची, खास अक्षत– किंवा अलीकडे 'पर्सनल इन्व्हिटेशन' – कोणास द्यावयाची, जेवायला कोणास बोलवायचे, स्वागतसमारंभात खास उठून कोणाचे स्वागत करायचे व कोणाला दारापर्यंत पोचवायला जायचे – हे निर्णय दोन्ही पक्षांचे एकाच निकषावर घेतले जातात. व्यावहारिक फायदा व त्यासाठी व्यावहारिक हांजी हांजी हा तो निकष असतो.

अशा वेळी मग वर-वधू हे युद्ध काही वेळा समजूतदारपणाने स्थगित ठेवण्यात येते. उदाहरणार्थ, वधूचे बॉस जेव्हा स्वागतसमारंभास उपस्थित होतात तेव्हा प्रत्यक्ष वराचे वडील हातातले काम टाकून बॉसचे आतिथ्य करायला धावतात. कारण, 'मुलीने लग्नानंतरही नोकरी केली पाहिजे', अशी अट लग्न ठरवतानाच घातलेली असते. एरवी मानपानासाठी हटून बसणारा वरपक्ष बॉस व त्याची बायको ह्या दोघांसाठी खास पंक्तीतले आपल्या पक्षाचे दोन मानकरी पानावरून उठवायला तयार असतात.

बाहेरच्याशी अशी हांजी हांजी करावी

लागते याचा माणसाला मनातून मोठाच राग येत असतो. या हांजी हांजीची अपरिहार्यता समजल्याने तर अंगाची आग होत असते. वरपक्ष व वधूपक्ष ही आग शांत करण्यासाठी आपसातले युद्ध त्वेषाने, सर्वशक्तीनिशी लढतात. वरपक्ष जास्तीत जास्त पिळण्याची शिकस्त करतो. वधूपक्ष जास्तीत जास्त निसटण्याचा प्रयत्न करतो. एकमेकांना शाब्दिक चावे घेण्याची संधी कोणताही पक्ष सोडीत नाही. समारंभ आटोपल्यानंतर झालेल्या जखमा चाटत, पुन्हा गाठ पडलीच तर अधिक तीव्र वचपा काढण्याच्या प्रतिज्ञा मनोमन व उघडपणेही करीत, उभय सैन्ये रणक्षेत्रावरून आपापल्या घरी वा गावी परततात !

¤

लग्नसमारंभाचीच नव्हे, तर आपल्या कोणत्याही सामाजिक समारंभाची आज हीच परवड झाली आहे.

मनापासूनची हौस कोणालाही नसते. उत्साह नसतो. आपुलकी नि आपलेपणाचा कैवार नसतो. म्हणूनच स्वतः झिजण्याची किंवा खपण्याची जिद्द नसते. विचारपूर्वक चांगले नियोजन करावे, मनापासून खपून चांगले दमावे, कार्य दणदणीत पार पाडल्याचे बळकट समाधान अनुभवावे, अशी उभारी कुठेच दिसत नाही.

एखाद्या राजकीय पक्षाचे अधिवेशन असो, त्या पक्षाच्या युवाशाखेचा मेळावा असो, सत्कारसमारंभ असो, की निरोपसमारंभ असो. मंडळी समारंभासाठी जमण्याचीच वानवा. जमतील ती उशीरा. तुरळक. सभागृहाच्या किंवा मंडपाच्या कडेकडेने दोघादोघा–तिघातिघांच्या गटाने तरळणारी. समारंभाच्या कार्यक्रमाचा तपशील नसतोच. कोणी कोणी काय काय करायचे ते ठरलेले नसते. जबाबदारी कोणावरच नसते. त्यामुळे तातडीही कोणाला नसते. दोन-तीन तासांचा उशीर करून का होईना, शेवटी समारंभ पार पडतो, हे एक आश्चर्यच !

बहुतेकांचे चेहरे जसे सुरुवातीस तसे समारंभभर कंटाळलेले, बुरसलेले असतात. समारंभ संपल्यानंतरही ते तसेच राहतात. समारंभाने काय साधलेले असते ? कोण जाणे ! दुसरीकडेही कंटाळाच अनुभवायला येणार. तो कंटाळा इथे अनुभवला, इतकेच.

कॉलेजांची संमेलने, विद्यार्थ्यांच्या सहली, निरोपसमारंभ हे सामूहिक प्रसंग तरी उत्साहाने रसरसलेले असतील असे बाहेरच्यांना वाटते; पण गेल्या दहा वर्षांत येथेही रखरखाटच वाढतो आहे.

संमेलनसमितीची सभा भरते. ‘काय काय कार्यक्रम करू या ?’ या प्रश्नाला विद्यार्थ्यांचे ठराविक उत्तर म्हणजे : आनंदमेळा. म्हणजे फनफेअर. तेथे आनंदही नसतो, मेळाही नसतो. खेळांच्या नावाखाली जुगाराचे निरनिराळे प्रकार असतात. कोळपून गेलेल्या नैसर्गिक उत्साहाच्या जागी आलेल्या विकृत उत्तेजनप्रियतेला वाव देणारे. आनंदमेळा नसेल तर एखादा धंदेवाईक जाझ बॅण्ड. तिथेही फक्त श्रवण. स्वतःचा स्वतंत्र, नवा आविष्कार ? —नाव नको ! जे संमेलनाचे, तेच सहलींचे. नाविन्य ? नको. कष्ट ? नको. साहस ? नको.

उरतात ते वर सांगितलेले कुजके हेवेदावे किंवा भ्याड अतिरेक. मनातील दुर्गंधांना वाट देणारे.


¤

महापालिकेच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवाची सांगता वेगळ्या प्रकाराने झाली; याने या पार्श्वभूमीवर, वेगळाच आनंद झाला. पूर्वीचे कामगार व आताचे प्रतिनिधी अशा मोजक्या लोकांचा खास सत्कार मुख्य पाहुणे ना. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. विषमता घालवण्याचे एक छोटे पण महत्त्वाचे पाऊल, असे या सत्काराचे महत्त्व आहे. काहींनी यातही कोती कृती दाखवली. ते अपेक्षितच होते. ते जमेस धरूनही, योजकतेसाठी आयुक्त श्री. हाटे यांचे अभिनंदन करावयास हवे.

□


# तिसरी आवृत्ती

## संपत आली



# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

अवती भवती

शरद कृष्णन्

# हरियाना तमाशा मंडळ

निवडणूक-निकालासंबंधी मी जो मजकूर गेल्या सप्ताहामध्ये लिहिला होता त्यामध्ये राज्यपाल श्री. तपासे देवीलाल यांना प्रथम संधी देण्याची शक्यता व्यक्त केली होती, परंतु तपासे यांनी घिसाडघाईने भजनलाल यांच्या हाती पुन्हा सत्ता सुपूर्द केली असून ३० जूनपूर्वी त्यांना विधानसभेमध्ये आपले बहुमत सिद्ध करण्यास सांगितले आहे. सर्व संकेत धाब्यावर बसवून राज्यपालांनी हा जो निर्णय घेतला त्याच्या विरुद्ध तीव्र प्रतिक्रिया उमटली असून देवीलाल आणि त्यांचे सहकारी यांनी हे सारे प्रकरण राष्ट्रपतींसमोर रुजू करण्यात यश मिळवले आहे. त्याचा झाला तर उपयोग इतकाच होईल की, आमदारांचा पाठिंबा मिळवण्यासाठी भजनलाल यांना जी महिनाभराची मुदत मिळाली आहे ती थोडी-फार कमी होईल. भजनलाल काय किंवा देवीलाल काय, दोघेही वाटेल ती किंमत देऊन आपल्या पाठीमागे बहुमत असल्याचे सिद्ध करण्यासाठी अक्षरशः जिवाच्या आकांताने प्रयत्न करत आहेत.आपल्यावर अन्याय झाल्याची देवीलाल यांची भावना इतकी तीव्र आहे की, त्यांनी आणि त्यांच्या समर्थकांनी राज्यपालांशी हुडेलहप्पी वर्तन केले. त्यांच्या या वर्तनाचा संताप येऊन म्हणे त्यांच्या एका समर्थकाने आपला पाठिंबा काढून घेतला. अर्थात देवीलाल संतप्त झाले, यात थोडे-फार तथ्य जरूर आहे. तुम्हाला पाठिंबा देणाऱ्या सर्व आमदारांसह तुम्ही हजर रहा, असे देवीलाल यांना राज्यपालांनी सांगितले होते. त्यासाठी वेळही निश्चित केली होती आणि अकल्पितपणे राज्यपालांनी आपला विचार बदलला व भजनलाल यांनी सादर केलेली ४४ नावांची यादी प्रमाण मानून त्यांनी भजनलाल यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ देववली. असे का केले, या प्रश्नाला त्यांचे साधे उत्तर असे की, विधानसभेमधील सगळ्यात मोठ्या पक्षाचा नेता म्हणून मी भजनलाल यांना प्रथम संधी दिली. वास्तविक लोकदल + भाजप आघाडी ही विधानसभेमध्ये अग्रस्थानी; परंतु निवडणूकपूर्व समझोत्याप्रमाणे तयार झालेली ही आघाडी प्रमाण मानण्यास राज्यपाल तयार नाहीत. हरियानाच्या संदर्भात चूक ठरवण्यात आलेले आघाडीचे गणित केरळमध्ये मात्र मानण्यात आले आहे. असे का, असा प्रश्न त्या संदर्भात विचारला तर तसे करणे इंदिरा काँग्रेसला सोयीचे आहे, अशाच उत्तराप्रत यावे लागते. हरियानामध्ये आघाडी नाकारून भजनलाल यांना सरकार बनवण्यास पाचारण करता, तर त्याच तत्त्वाप्रमाणे केरळमध्ये सर्वाधिक जागा जिंकणाऱ्या मार्क्सवाद्यांना प्रथम संधी द्यायला हवी; पण ते तर झाले नाही आणि त्यामुळेच इंदिरा काँग्रेसची सत्तालोलुपता व राज्यपालांची अगतिकता या दोन्ही गोष्टी सिद्ध झाल्या!

इंदिरा काँग्रेसच्या नेतेपदी भजनलाल यांची फेरनिवड होताच त्यांना लगोलग मुख्यमंत्रिपदाची शपथ देऊन, वर बहुमत गोळा करण्यास पुरेसा अवधी देणे, या दोन्ही गोष्टी निलाजरेपणाच्या आहेत. भजनलाल यांच्याबरोबर पक्षांतर करून हरियानामध्ये ज्यांच्यामुळे इंदिरा काँग्रेसचे सरकार स्थापन होऊ शकेल अशा २१ आमदारांना इंदिरा काँग्रेसचे तिकीट मिळाले; या २१ आमदारांपैकी सोळा आमदारांना पराभव पत्करावा लागला. भजनलाल यांच्या सहकाऱ्यांपैकी डझनभर मंत्री पराभूत झाले. इंदिरा काँग्रेसचे बहुमत गेले. अशा परिस्थितीमध्ये समजा, देवीलाल यांचे सरकार आले असते तर असे काय आकाश कोसळणार होते ? बरे, आपल्यामागे बहुमत आहे, असा जर इंदिरा काँग्रेसला विश्वास होता तर देवीलाल यांच्या सरकारचा विधानसभेत पराभव करणे सहज शक्य होते; पण त्यातली मेख अशी आहे की, अपक्ष आमदार सत्ता ज्याच्या हाती प्रथम सुपूर्त करण्यात येणार आहे त्याच्यामागे प्रथम धावणार आणि आपल्या पाठिंब्याची पुरेपूर किंमत वसूल करणार. भजनलाल यांना पहिली संधी मिळताच सत्तेमध्ये वाटेकरी होऊ पहाणाऱ्या १२ अपक्षांपैकी ८ अपक्ष त्यांच्या मागे गेले. आता या १२ अपक्षांमध्ये पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करून यशस्वी झालेले ८ आमदार आहेत. अशा बंडखोरांविरुद्ध कडक कारवाई करण्याची घोषणा खुद्द इंदिराजींनी केली होती; पण आज बहुमत अशा दोलायमान अवस्थेमध्ये येऊन पोचले की, ज्यांना पक्षातून सहा वर्षांसाठी काढून टाकण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या अशा मंडळींचा अनुनय करून त्यांना 'पावन'करून घेण्यात आले. भजनलाल यांच्या मंत्रिमंडळामध्ये आताच १८ मंडळी आहेत. पाठिंबा देणाऱ्या प्रत्येक आमदाराला संतुष्ट ठेवण्यासाठी भजनलाल सत्तेची आणि संपत्तीची खिरापत करत आहेत. काल–परवापर्यंत देवीलाल यांच्याबरोबर असलेले आणि जगजीवनराम यांच्या पाठिंब्यावर निवडून आलेले रामसिंग यांना सभापतिपद देण्यात येणार आहे. हे रामसिंग राज्यपालांना असे म्हणाले होते की, भजनलाल यांना मंत्रिमंडळ बनवण्यास सांगून त्यांनी एवढी घोडचूक केली आहे की, त्यांनी विहिरीत जाऊन जीव द्यावा आणि हेच महोदय आज भजनलाल मंत्रिमंडळामध्ये मंत्री आहेत. अपक्ष मंडळींसाठी चाललेल्या रस्सीखेचीचे एक मजेशीर उदाहरण देण्यासारखे आहे. इंदिरा काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करून निवडून आलेले एक आमदार मानसराम हे आपल्या एका मित्राच्या दुकानामध्ये गेले होते. अपक्ष आमदारांचा शोध घेत सर्वत्र फिरणारे भजनलाल आणि देवीलाल यांचे हस्तक त्या दुकानापर्यंत येऊन पोचले. श्री. मानसराम यांनी आपल्याबरोबर यावे, असा आग्रह दोन्ही बाजूंनी सुरू झाला. दोन्ही बाजूंच्या समर्थकांची गर्दी वाढल्यावर दुकानदाराने दुकान बंद करून घेतले. अखेरीस पोलीस बोलावून दुकानासमोरील गर्दी हटवावी लागली. संबंधित

आमदाराला पत्रकार भेटले असताना त्याने प्राजलपणे सांगितले की, कोणता पक्ष माझ्या पाठिंब्याची पुरेपूर किंमत देतो, यावर माझे धोरण अवलंबून राहील. संध्याकाळपर्यंत हे आमदार इंदिरा काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. *अर्थात त्यांना अपेक्षित असलेली किंमत चुकती केली गेली*, म्हणूनच त्यांनी हा निर्णय घेतला, हे वेगळे सांगायला नकोच आपल्याला पाठिंबा देणारे आमदार किती काळ आपल्या-बरोबर राहतील याचा नेत्याना विश्वास नसल्यामुळेच या आम-दारांना सतत बरोबर घेऊनच नेतेमंडळी फिरत आहेत. श्री. तपासे यांच्यावर पुरेपूर दबाव टाकल्यावर देवीलाल यांनी आपल्या साऱ्या समर्थकांना दिल्ली येथे एका खास बसने नेले. या सर्व आमदारांना एकत्र ठेवण्यात आले होते आणि एवढा कडेकोड बंदोबस्त असूनही रामसिंग यांनी पळ काढलाच. अर्थात देवीलाल यांनी राष्ट्रपतीची भेट घेऊन *त्यांना आपली भूमिका समजावून* सांगितली. राष्ट्रपतीनी या प्रकरणी लक्ष घातल्यामुळेच हरियानाच्या नवीन विधानसभेचे अधिवेशन शक्य तितक्या लवकर बोलावले जाईल. दरम्यान दोन्ही बाजू आपल्या मागे पुरेसे बहुमत उभे करण्याचा झटून प्रयत्न करत आहेत.

भजनलाल मंत्रिमंडळ बनवण्यात आज यशस्वी झाले असले तरी त्यांना दीर्घ काळ सत्ता राबवता येणे अशक्य आहे. लालूच दाखवून त्यांनी आपल्यामागे खेचून आणलेले आमदार त्यांना दुसऱ्या बाजू-कडून जास्त *आमिष* दाखवले गेले तर टुणकन उडी मारून त्या बाजूला जाऊन बसतील. आज जरी ८० सदस्यांच्या सभागृहात आपल्या पाठिराख्यांची संख्या ४६ ते ४७ पर्यंत नेण्यात भजनलाल यशस्वी झाले असले तरी नाममात्र बहुमताच्या आधारावर उभे अस-लेले हे सरकार केव्हाही कोसळून पडू शकेल.

हरियाना निवडणूक-निकालाचा अधिक तपशील आता हाती आला आहे. त्यावर नजर टाकली तर लोकदल, भाजप युतीला अपे-क्षित होते तेवढे यश मात्र मिळू शकलेले नाही भजनलाल मंत्रिमंडळा-मधील अनेक मंत्री पडले हे खरे, पण लोकदल आणि भाजप यानाही काही कमी दणके बसले नाहीत. विसर्जित विधानसभेमधील लोक-दलाचे नेते मुळचद जैन यांना पराभव पत्करावा लागला. भाजपच्या हरियाना राज्यशाखेचे अध्यक्ष सौ. कमल वर्मा यांना निवडणुकी-मध्ये यश मिळू शकले नाही. पक्षांतर्गत बंडखोरीचे प्रमाण इंदिरा काँग्रेसमध्ये अधिक होते हे खरे, परंतु भाजप आणि लोकदल या पक्षानाही अशा बंडखोरीचा उपद्रव झालाच. अंबाला कॅन्टोन्मेंट मतदारसंघाचा, तसेच कर्नाटक मतदारसंघामधील अंतर्गत धुस-फुसीचा या दृष्टीने उल्लेख करता येईल. बंडखोरांविरुद्ध कडक कारवाई करण्याच्या धमक्या सर्वच पक्षांनी दिल्या होत्या. बंडखोरीला आळा बसावा म्हणून त्यापैकी काहीजणांची सहा वर्षांसाठी हकाल-पट्टीही करण्यात आली होती. महिनाभरापूर्वी हाकललेल्या याच सभासदांना निवडणुकीमध्ये यश मिळताच कडक शिस्तीचा सारा बाडबिस्तारा गुडाळून ठेवून गालीचावरून पुन्हा पक्षात आणले गेले आहे. केवळ सत्ता राबवता यावी यासाठी स्वीकारले गेलेले नरमाईचे धोरण शहाणपणाचे मानता येनार नाही. जोपर्यंत बंडखोर पक्षाशी एकनिष्ठ आहे तोपर्यंत त्याला पुन्हा सामावून घेण्यास हरकत नसावी, अशा उपरोधिक विरोधाभासाचा बोचरा चिमटा घेऊन 'टाइम्स'च्या आर. के लक्ष्मण यानी एक सुरेख कार्टून सादर करून बंडखोरांना सामावून घेण्याच्या धोरणाची टिंगलटवाळी केली होती. हरियाना-मध्ये निवडणुकीनंतर निर्माण झालेली परिस्थिती गंभीर असली तरी आमदाराना आपल्या बाजूला खेचण्याचे पहिले पर्व तूर्तास तरी थंडावले आहे. भजनलाल याना पहिली संधी मिळाली. तिचा त्यांनी लाभ घेतला. त्यांनी ८ आयारामना सत्तास्थाने बहाल केली. आता काल-परवा सत्तेवर आलेले हे मंत्रिमंडळ कोसळून पडावे यासाठी देवीलाल आणि मंडळी कंबर कसून कामाला लागले. भजनलाल यांच्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीबरोबरच दुसऱ्या बाजूने फाटाफुटी-च्या राजकारणाची चाल सुरू झाली असल्याने आज सत्तेवर आलेले हे 'भजनी मडळ' सत्तेची खिरापत वाटत किती काळ सत्तेवर राहू शकते, ते आपण पहायचे !


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.


## □ इंग्लिश संघाचा कर्णधार—बॉब विलिस

इंग्लंडच्या दौऱ्यावर असलेला भारतीय संघ सर्वसाधारणपणे समा-धानकारक कामगिरी बजावत आहे. पहिला कसोटी सामना नजरेच्या टप्प्यात आला असतानाच इंग्लिश संघाचा कर्णधार म्हणून बॉब विलिस या द्रुतगती गोलंदाजाची निवड करण्यात आली आहे. निवड समितीचे अध्यक्ष पीटर मे यानी त्याच्या झुंजार वृत्तीचे आणि सामना निकाली करण्याच्या जिद्दीचे कौतुक केले आहे. तसेच बॉबच्या पदरी असलेला अनुभव व सहकाऱ्याबरोबरील चागले संबंध यामु-ळेही त्याची निवड करणे सोपे झाल्याचे म्हटले आहे. खेरीज; जानेवारी ७८ पासून तो इंग्लिश संघाचा उपकर्णधार असल्याने त्याची निवड स्वाभाविकही मानली पाहिजे. ३३ वर्षांच्या बॉब विलीसने आजवर कसोटी सामन्यात २४२ खेळाडू बाद केले आहेत. द्रुतगती गोलंदाज फारसे चांगले कर्णधार होऊ शकत नाहीत, असा एक समज असल्याने राष्ट्रीय पातळीवर आपल्या संघाचे नेतृत्व कर-

ण्याची संधी फार थोडया द्रुतगती गोलंदाजाना आजपर्यंत मिळाली आहे. भारतामध्ये दौऱ्यावर आलेल्या इंग्लिश संघाचे नेतृत्व करणाऱ्या कीथ फ्लेचरकडून विलिस कर्णधारपदाची सूत्रे स्वीकारत आहे. फ्लेचरची हकालपट्टी करण्यात आली. फलंदाज म्हणून तो संघास फारसा उपयोगी पडू शकणार नाही, अशी निवडसमीतीची खात्री पटली.खेरीज, प्रसंगी जो आक्रमक पवित्रा कर्णधाराने घेणे जरूर असते तो घेण्याची क्षमता फ्लेचरमध्ये नाही,असेही निवडसमितीला वाटते. नवीन कर्णधार विलिस आजपर्यंत ६४ कसोटी सामने खेळला असल्याने कसोटी सामन्यामध्ये आवश्यक असलेल्या डावपेचांची त्याला उत्तम जाणीव आहे. कर्णधाराला आपल्या सर्व सहकाऱ्यामध्ये विश्वास निर्माण करावा लागतो. प्रत्येक खेळाडूचा उत्तम उपयोग करून घ्यावा लागतो. विलिसला सर्व खेळाडूंच्या ताकदीची पूर्ण कल्पना असल्याने आणि सर्व संभाव्य खेळाडूचे त्याच्याबद्दल अनुकूल मत असल्याने त्याला कर्णधार म्हणून काम करणे सुलभ जाणार आहे. तो कर्णधार झाल्याने त्याच्या जागी आता उपकर्णधार म्हणून डेव्हिड गॉव्हर याची निवड होण्याची दाट शक्यता आहे. त्याने भारताविरुद्ध सामना खेळलेल्या एम. सी. सी. संघाचे नेतृत्वही केले होते. गोव्हरच्या या सामन्यामधील कामगिरीबद्दल आपण समाधानी असल्याचे निवड समितीचे अध्यक्ष पीटर मे यानी बोलून दाखवले आहे. फ्लेचरने भारत व श्रीलंका दौऱ्यात आपल्या परीने समाधानकारक कामगिरी बजावली असली तरी फ्लेचरची वृत्ती सर्वसाधारणपणे बचावात्मक असल्याचेच या दौऱ्यामधील त्याच्या खेळण्यावरून दिसून आले. फ्लेचरची निवड त्या वेळचे निवड समितीचे अध्यक्ष अॅलेक बेडसर यांनी केली होती. परंतु विद्यमान निवड समितीचे अध्यक्ष पीटर मे व त्यांचे सहकारी यांनी एकमताने फ्लेचरला दूर केले असून बॉब विलिसची निवड केली आहे. या मालिकेमध्ये त्याची कामगिरी यशस्वी ठरली तर आगामी हिवाळयामधील ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी इंग्लिश संघाचा कर्णधार म्हणून त्याचीच निवड होण्याची शक्यता आहे.अर्थात कर्णधार म्हणून विलिसला फार मोठी कारकीर्द लाभणे शक्य नाही. एक तर आत्ताच त्याचे वय ३३ असल्याने द्रुतगती गोलंदाज म्हणून त्याला फार मोठे भवितव्य नाही आणि एकदा गोलंदाजीच्या संदर्भात त्याचा विचार बाजूला केल्यावर स्वाभाविकपणेच कर्णधारपदाच्या बाबतीतही त्याचे नाव आपोआपच मागे पडते. त्यामुळेच गॉवर कर्णधारपदाची जबाबदारी पेलण्यास सिद्ध होईपर्यंत विलिस कर्णधारपदी कायम राहील. माईक ब्रेअर्ली कर्णधार असताना विलिस त्याच्याबरोबर सतत खेळला आहे आणि नेतृत्व कसे करावे याबाबतचा बारिक-सारिक तपशील त्याने शिकून घेतला आहे. कसोटी सामन्यात ज्या विविध क्लृप्त्या योजाव्या लागतात त्याबाबत तो कितपत यशस्वी होईल याबाबत मात्र शंका वाटते. याच मालीकेमधील पहिल्याच सामन्याचे वेळी वॉरविकशायरकडून संघाचे नेतृत्व करताना विलिसने तिसऱ्या दिवशीही फलंदाजी चालू ठेऊन सामन्यामधील औत्सुक्य घालवले आणि कटाळवाण्या अनिर्णित अवस्थेत सामना संपला. तिसऱ्या दिवशी फलंदाजी चालू ठेवण्याऐवजी त्याने डाव घोषित केला असता तर या सामन्यामधील चुरस वाढून कदाचित् तो नाटयपूर्णरित्या निकाली झाला असता. निकाल अनुकूल लागतो की प्रतिकूल लागतो, याचा विचार न करता खेळामधील स्वारस्य टिकून रहावे यासाठी काही

## राज्यपाल पाहिजे !

मंत्रिमंडळ बनवण्याच्या संदर्भात हरियानामधील राज्यपालांवर जो प्रसंग गुदरला तो लक्षात घेता राज्यपालपद स्वीकारण्यास मंडळी सहजी पुढे येणे अवघड आहे. अशा परिस्थितीमध्ये राज्यपालपदासाठी राष्ट्रपतिभवनातून जाहिरात वितरित करावी लागली तर तिचे स्वरूप कसे असेल त्याचा हा नमुना.

राज्यपाल पाहिजे.

*काही महत्त्वपूर्ण राज्यामधील राज्यपालपदाच्या जागा खाली* असून ज्याना विचारणा करण्यात आली त्यानी नकार दिल्याने आणि अपेक्षित पात्रता असलेले उमेदवार सहजी उपलब्ध नसल्याने योग्य निवडीस वाव मिळावा या दृष्टीने ही जाहिरात देण्यात येत आहे.

**पात्रता :** भारतीय नागरिकत्व.

**वय :** किमान ४५ पेक्षा जास्त असावे. वयाच्या संदर्भात कमाल मर्यादा नाही.

**अनुभव :** क्रियाशील,राजकारणाचा थोडा-फार अनुभव असावा, परंतु असा अनुभव असलाच पाहिजे असा आग्रह नाही. केंद्र सरकारच्या मनात काय आहे हे जाणण्याची क्षमता आवश्यक. स्वतंत्र निर्णयशक्ती असली पाहिजे असे नाही; परंतु पुरेसे राजकीय चातुर्य अवश्य हवे. घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचे तात्त्विक समर्थन करण्याची क्षमता हवी.

**आरोग्य :** राजभवनामध्ये पुरेसे संरक्षण असते. तथापी स्वसंरक्षण *करण्याची क्षमता आणि आमदारांच्या कितीही मोठ्या जमावावर* प्रभाव पाडू शकेल असे व्यक्तिमत्त्व आवश्यक.

**कामाचे स्वरूप :** सर्वसाधारण परिस्थितीमध्ये राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने आणि विशेष परिस्थितीमध्ये केंद्र शासनाच्या सल्ल्याने संबंधित राज्याचा कारभार चालवणे.

**वेतन :** काम जबाबदारीचे असल्याने वेतन द. म. पाच हजार रुपये. खेरीज अन्य अनेक सुविधा. गरजूनी आपले अर्ज राजकीय पक्षाच्या शिफारशीसह त्वरित पाठवावेत. *

¤

## FOR HIRE

हरियानाचे विद्यमान राज्यपाल गणपतराव तपासे जुन्या मुंबई राज्यामध्ये मच्छमारीमंत्री असतानाचा एक किस्सा सांगितला जातो.

कै. भाऊसाहेब हिरे हेही त्या वेळी मंत्रिमंडळामध्ये होते. श्री. तपासे मुंबईमध्ये तसे नवीन. प्रत्येक गोष्टीवर शासनाचे नियंत्रण, असा त्याचा समज. मुंबईच्या वाहत्या रस्त्यावर घसरणाऱ्या टॅक्सीजचे मीटर त्यांनी काळजीपूर्वक न्याहाळले. पाच–सात टॅक्सीज समोरून गेल्या. प्रत्येक टॅक्सीच्या मीटरवर 'फॉर हिरे' (FOR HIRE) असे लिहिले आहे, असे त्यांच्या लक्षात आले. काहीसे चिडूनच त्यांनी *आपल्याबरोबर असलेल्या सहाय्यकाजवळ प्रतिक्रिया व्यक्त केली.* ते म्हणाले. 'व्हॉट इज धिस, मी ऑल्सो मिनिस्टर, ॲन्ड ऑल फॉर हिरे ओन्ली ?' संगती असलेल्या सहाय्यकाने फक्त एक लाचार हास्य केले ! *

वेळा निर्णय घ्यावेच लागतात. कदाचित् दान प्रतिकूल पडण्याचीही शक्यता असते; परंतु तसे ते पडले तरी कर्णधाराच्या साहसाचे कौतुक होते आणि हे साहस अगदीच अवाजवी नसले तर अपयश आले तरी कर्णधारावर सहसा टीका होत नाही; उलट सामना जिंकू किंवा हारू, अशा वृत्तीने खेळ केल्याबद्दल त्याचे कौतुकच होते. यशस्वी कर्णधार म्हणून नाव मिळवायचे असले तर विलिसलाही सामना हरण्याचा धोका पत्करून प्रतिपक्षाला आव्हान द्यावे लागेल. फ्लेचर आणि विलिस यांच्या तुलनेत विलिस नक्कीच उजवा वाटतो. भारत-श्रीलंका मालिका फ्लेचरने खेचून आणली असती तरीसुद्धा त्याची निवड झाली असती असे नव्हे. कर्णधाराला जो एक बेडरपणा लागतो तो त्याने कधीच दाखवला नाही. त्यामुळेच कर्णधारपदी त्याची फेरनिवड होणे फारसे संभवनीय नव्हतेच. विलिसच्या कारकीर्दीच्या दृष्टीने विचार केला तरी आज इंग्लिश संघाच्या कर्णधारपदी झालेली त्याची निवड हा त्याच्या कारकीर्दीचा उत्कर्षबिंदू मानला पाहिजे. १९८१ च्या जानेवारीमध्ये गुडघ्याबाबतची तक्रार घेऊन तो वेस्ट इंडिजचा दौरा अर्धा टाकून परत आला. त्याच्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. द्रुतगती गोलंदाज आणि गुडघ्याची तक्रार म्हटल्यावर निदान कसोटी सामन्यांसाठी तो पुन्हा उपलब्ध होऊ शकणार नाही, असे वाटत होते; परंतु या दुखण्यावर मात करून विलिस कसोटी सामन्यामधील आपले स्थान कायम ठेवण्यात यशस्वी झाला, इतकेच नाही तर आपल्या संघासाठी त्याने उत्तम कामगिरीही बजावली. गेल्याच उन्हाळ्यामध्ये त्याने लीडस् येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात केवळ ४३ धावांत ८ गडी बाद करून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. आपल्या संघासाठी खेळण्याची संधी गमवावी लागू नये म्हणून विलिस १९७७ साली कॅरी पॅकर मालिकेमध्ये खेळला नाही. तसेच भारताच्या दौऱ्यावरून परतल्यानंतर दक्षिण आफ्रिकेमध्ये गेलेल्या ग्रॅहम गुच आणि बायकॉट यासारख्या खेळाडूंच्या नादीही तो लागला नाही. क्रिकेटमधील नीतिमत्ता ढासळत असताना आणि पैसा व वैयक्तिक सोय यासाठी काहीही केले जात असताना, विलिस काही नीती तत्त्वांना जपत राहिल्याने त्याला आज इंग्लिश संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. भारतीय संघ पूर्ण सामर्थ्यानिशी ही मालिका खेळत असून गावस्करसारखा अनुभवी कर्णधार या संघाचे नेतृत्व करत आहे. साउथ आफ्रिकेमध्ये खेळलेले खेळाडू वगळले गेल्याने इंग्लिश संघ थोडा-फार दुबळा झाला आहे. खेरीज, भारतामध्ये खेळली गेलेली मागली मालिका गमवावी लागल्याने या संघावर दडपण आहे. अशा काहीशा अडचणीच्या वेळीच विलिसवर नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कसोटी मालिकेमध्ये तसेच एका दिवसाचे दोन आंतरराष्ट्रीय सामने यामध्ये विलिस कशी कामगिरी बजावतो यावरच त्याला या मालिकेनंतर असलेल्या पाकिस्तान व ऑस्ट्रेलियाबरोबरील मालिकेसाठी नेतृत्व करण्याची संधी मिळते की नाही, हे अवलंबून राहील. □



श्यामचा संसार
कथा ३८

# श्याम दलित समजला गेला त्याची कथा

फिरोझ रानडे

आजची कथा ही दैनंदिनीच्या साच्यात लिहिली आहे. खरं म्हणजे हा साचा फार जुना झाला आहे व फारसा वापरातला नाही; पण परवाच कोणा दिवाळी अंकात ह्या साच्याबरहुकूम एक उत्तम कथा वाचनात आली. आपल्या कथेचा विषयही त्या साच्यातल्या गोष्टीसारखा आहे व तो वापरला तर आपली पण वाहावा होईल, ही मनात आशा !

लग्नापूर्वी श्याम पुष्कळच नियमितपणे दैनदिनी लिहित असे. लग्न झाल्यावर त्याला कोणी जुन्या व जाणत्या गृहस्थानी ' संसार सुखाचा व्हावयाचा असेल तर नवरा–बायकोने आपलं थोडं थोडं सोडायला पाहिजे ', असा सल्ला दिला होता. त्या सल्ल्यानुसार व त्याच्या घरातच दैनदिनीवरून एक घटना घडली. त्यामुळे त्याने लग्नानंतर, बऱ्याच गोष्टी सोडल्या, त्यातली एक म्हणजे दैनंदिनी लिहिण्याची गोष्ट !

त्या वेळी श्याम व राधा लग्न होऊन कलकत्त्याला आले होते. राजा–राणीचा संसार म्हणून जो ससार प्रसिद्ध आहे तसा त्यांचा संसार होता. अजूनी कोणी मंत्री वा सल्लागार, म्हणजे श्यामची सासू वा राधाची सासू त्या ससारात आली नव्हती.

श्याम सकाळी ९-९॥ ला जाई तो संध्याकाळी ५॥–६ वाजता येत असे. दोन माणसाचे घरात काम काय असणार ! तेव्हा ९॥ ते ६ पर्यंतचा वेळ राधा झोपण्यात व त्यातूनही वेळ उरल्यास जुनी पत्रे, फोटो, मासिके व श्यामच्या दैनंदिन्या वाचण्यात घालवत असे.

एके संध्याकाळी श्याम परतून आला तर राधाचे डोळे रडून रडून लाल आणि गाल व नाकाचा शेंडा त्याहूनही लाल, असे सगळे लालेलाल वातावरण झाले होते. बाकीच्या वेळी लाल हा शब्द किती मनोहारी व आनंद सूचक वाटतो बरे ? जसे नंदलाल, प्यारेलाल जवाहरलाल, मोतीलाल; पण बायकोलाल वा राधालाल हा शब्दप्रयोगच अयोग्य वाटतो. आता शब्दप्रयोगच इतका अयोग्य वाटतो तर त्या प्रत्यक्ष लाल होतात ते मनोहारी व आनंददायक कसे वाटावे ?

' कोण सटवी आली होती सत्यनारायणाला ?' राधाने अगदी मुलाहिजा न ठेवता केलेला प्रश्न. श्यामला सटवीचा बॉय फ्रेंड हा म्हसोबा आहे,हे ऐकून माहीत होते.सटवी सत्यनारायणाला का आली असेल ? असा त्याला प्रश्न पडला; पण तशी ती आली असल्यास त्याचे उत्तर देण्याची जबाबदारी त्याच्या खात्याची नव्हे, हे त्याच्या सरकारी मनास ताबडतोब जाणवले. त्याचे उत्तर त्याने काय म्हणून द्यावे ?तेव्हा लोकसभेत एखादा मंत्री ' ह्या प्रश्नाचा आमच्या खात्याशी काही संबध नाही ', म्हणून हात झटकून मोकळा होतो तसा हात झटकण्याचा श्यामचा विचार होता.

पण त्याने नीट पाहिले तेव्हा चारपायीवर त्याची जुनी दैनदिनी त्या सत्यनारायणाच्या पानावर उघडी करून राधाने उघडी करून ठेवली होती. म्हणजे सटवी सत्यनारायणाला आली असल्याचा श्यामच्या हाताचाच पुरावा राधाकडे होता. आता श्याम कसला हात झटकून मोकळा होतो ?

शाळेत म्हणा, महाविद्यालयात असताना म्हणा, सगळ्यांची प्रेम–प्रकरणे सुरू होतात ती बहुधा मित्रांच्या बहिणीबरोबर ! खरं म्हणजे त्या प्रकरणाना प्रेम-प्रकरणं म्हणणेही योग्य नाही; पण त्याला दुसरा योग्य शब्द आठवत नाही. ती सटवी म्हणजे मित्राची बहीण. श्याम ज्या बहिणीकडे रहात होता तिने सत्यनारायण केला होता व ती सटवी त्या सत्यानारायणाला आल्याचा श्यामच्या दैनंदिनीत उल्लेख होता. त्या सटवीचे दुसरे प्रेम-प्रकरण होते व तिने त्याच्या तो जातीचा नव्हता तरी त्याच्याशी लग्न केले होते. हे सगळे राधाला सांगितल्यावर राधाचा लालपणा कमी झाला. त्यातल्या त्यात त्या सटवीचे दुसरे प्रेम–प्रकरण होते, हा मुद्दा लालपणा कमी करण्यास फार उपयोगी आला.

त्यानतर श्यामने कानाला अगदी खडा लावला की, आता दैनंदिनी म्हणून लिहावयाची नाही. असे वेळोवेळी कानाला खडे लावून तर नवऱ्याचे कान जाड होत नसतील? व म्हणूनच बायकाचे बोलणे लग्नानंतर त्याना ऐकू येण्यास जड जात असेल ?

पण आताची दैनंदिनी छापण्याकरता लिहिली आहे, त्यामुळे आधीच सेन्सार केलेली आहे व आज लेखिकासुद्धा ज्या मोकळेपणाने दैनदिनी लिहितात त्यावरून त्यात विशेष धोका नसावा असा श्यामचा आपला होरा !

– – ८०

आता जवळ जवळ पंचवीस-सव्वीस वर्षांनी परत मुंबईत आलो आहे. महाविद्यालयात बरोबर असलेले मित्र देशी व परदेशी पांगले आहेत. जे मुंबईत आहेत ते फार मोठ्या हुद्यावर आहेत असे नाही; पण आपल्या नातेवाइकांना व मित्र–मंडळींना आपण फार ' बिझी ' असतो, असे सागण्यात मुंबईच्या लोकांना फार अभिमान वाटतो, असे माझ्या लक्षात आले आहे.

आमच्या खात्याचे मुंबईचे ऑफीस फारच लहान व आता पंचवीस-सव्वीस वर्षांचा अनुभव गाठीशी असल्यामुळे कामाचा ताणही जाणवत नाही. त्यातून येथे मुळातच काम कमी. तेव्हा आता कचेरीतला वेळ कसा जाणार, हा प्रश्नच आहे.

— — ८०

कचेरीतला वेळ जाता जात नाही. काय करावे ? बरं कचेरीत फिल्मफेअर, फेमिना वाचणे बरे दिसत नाही. बाहेर तरी कुणाकडे जाणार ? किती वेळा ?

— — ८०

आज श्री. माडगांवकर म्हणून आयकर खात्यातले एक अधिकारी आले होते. त्यांच्याशी बोलता बोलता ही कल्पना सुचली.

त्यांचा मुलगा काही तरी विषय घेऊन डॉक्टर होण्याकरता प्रबंध लिहितो आहे म्हणे! त्यांच्या बोलण्यावरून व म. टा. मध्ये आलेल्या लेखांवरून डॉक्टरकी मिळवणे फार सोपे आहे असे दिसते.

तेव्हा आपणही डॉक्टर का होऊ नये, असा विचार मनात उचंबळून आला. कचेरीच्या वेळात व सरकारी कागदाचा व टंकलेखकाचा उपयोग करून ही डॉक्टरकी अक्षरशः फुकटात पदरात पाडता येईल !

ह्या कल्पनेने मोठा हुरुप आला व कचेरीतून लवकर घरी आलो.

त्या दिवशी घरी येताच राधाला फुकट डॉक्टरची कल्पना सांगितली. बायकांना काय, फुकट गोष्टींची चटकच लागलेली असते. काही फुकट मिळते आहे म्हटले की, त्यांना फुकटचा जोर चढतो. राधाने माझी कल्पना मन लावून ऐकली. पण जाता जाता, 'हे प्रकरण तुमच्याच्याने निभणार आहे का ?' असा मर्मभेदी प्रश्नही केला.

ओठापर्यंत आलेला राग तेथेच राहू दिला. तिला आता डॉक्टरकी मिळवूनच उत्तर द्यायला पाहिजे !

— — ८०

डॉक्टरकीचा विचार मनात येवून आता महिना झाला; पण विश्वविद्यालयात काही जाणे जमले नाही. राधाचे म्हणणे नेहमीप्रमाणे खरे होणार काय ? नाही, मी ते खरे होऊ देणार नाही !

— — ८०

आज विश्व-विद्यालयात गेलो. संबंधित अधिकारी श्रावणी सोमवार होता म्हणून लवकर घरी गेले होते. जग इतके पुढे गेले आहे तरी हे लोक अजून श्रावण्या करतात? आश्चर्यच आहे; पण चिडून उपयोग नव्हता. ज्या अर्थी श्रावणी करण्याकरता घरी गेले आहेत त्या अर्थी ते आपल्या पोटजातीचे नसले तरी जातीचे तरी आहेत, ह्या कल्पनेने खूप दिलासा आला.

आता ते खरंच आपल्या जातीचे आहेत की सुट्टी मिळते म्हणून गेले आहेत ? सुट्टी मिळत असेल तर मुसलमानसुद्धा श्रावण्या करण्याच्या निमित्ताने घरी जातील ! मनात एक विचार आला.

विश्वविद्यालयातून येताना P. W. D. बिल्डिंगजवळ विकायला ठेवलेली जुनी पुस्तके बघितली व त्यातली काही प्रबंधाकरता उपयोगी पडतील का, बघत होतो. पण किंमती फार वाटल्या. डॉक्टरी मिळवेन व तीही फुकटात, असा राधाकडे विडा उचलला आहे.

आता विश्वविद्यालयात येताना नुसते इंग्रजी कॅलेंडर बघून उपयोग नाही. पंचांग पाहून, सोळा सोमवार कधी येतात, कार्तिकी एकादशी कधी येते ही पहावयास पाहिजे.

पण विश्वविद्यालयाचे लोक दात्यांचे पंचांग वापरतात की टिळकांचे ? ते प्रथम कोणाकडून तरी काढून घेतले पाहिजे.

— — ८०

आज श्रावणी सोमवार नव्हता तरी संबंधित अधिकारी नव्हते. शेजारच्या खुर्चीवर चौकशी करता ते 'मंथली' मिटिंगला गेले आहेत, असे कळले. कधी येतील ? ह्याचे उत्तर, 'माहीत नाही.' पुढली मीटिंग कधी आहे ? ह्याचे उत्तर, 'पुढल्या महिन्यात—मंथली मीटिंगच ती !' असे हृयें हृयें ह्या हास्यरसात बुचकळून काढलेले उत्तर मिळाले. आता इंग्रजी, दाते–टिळक व विश्वविद्यालय ह्या सगळ्यांची कॅलेन्डरे बघून यावे लागणार, असा मनाशी विचार आला.

घरी आल्यावर राधाने 'डॉक्टरकीचे कुठपर्यंत आले ?' असे विचारले. त्यात कुजकटपणा किती होता ते कळले नाही. पण द्यावयास उत्तर नव्हते म्हणून 'चालले आहे', असे मोघम उत्तर दिले.

तिने शेजार-पाजाऱ्यात व मैत्रिणीत डॉक्टरकीबद्दल सांगितलेले दिसते आहे. ह्या बायकांच्या तोंडात तीळ भिजत नाही म्हणतात तेथे डॉक्टर काय भिजावा ?

आता उद्याच विश्व-विद्यालयात जावे. कारण मंथली-मिटिंग लगेच दुसऱ्या दिवशी नसणार.

— — ८०

काल ठरल्याप्रमाणे लगेच आज झालो. टेबलाशी एक 'भुगोघा' गृहस्थ म्हणजे भुरे-गोरे व घारे गृहस्थ बसले होते. त्यांच्या भुगोघापणावरून ते नुसते आपल्या जातीतले नसून चक्क आपल्यासारखे 'स्थ' आहेत ह्या कल्पनेने मोठा दिलासा आला.

आगगाडीच्या लांबच्या प्रवासात कसे आपल्याजवळ प्रवास-पत्रे असली, जागा आरक्षित केल्याचा दाखला असला, तरी कंडक्टर जर मराठी असला तर जास्त बरे वाटते. भुगोघांना बघून माझेही मत तसेच झाले.

मी स्वतः भुगोघा म्हणजे भुरा, गोरा व घारा नसलो तरी माझे आडनाव इतके स्पष्ट भुगोघा आहे की मला त्यांची मदत मिळणार, ह्याची खात्री होती.

मी त्यांच्याजवळ जाऊन बसायला व ते उठून उभे रहायला एकच गाठ पडली. मी स्वतः विद्यार्थी होतो तरी पालकासारखा दिसत होतो. त्यामुळे मला भुगोघांनी 'माफ करा हं. मला तातडीने छापखान्यात जावयाचे आहे.' असे अजीजीच्या स्वरात सांगितले व 'उद्या या', असा सल्ला दिला.

उद्या केव्हा येऊ, विचारता 'केव्हाही या. मी अगदी लंचलासुद्धा बाहेर जात नाही. खुर्चीवर चिटकून असतो. कामच इतके असते,' असे उत्तर मिळाले.

'काय गृहस्थ आहे!' मी मनाशी म्हणालो. आतापर्यंत मी दहा वेळा येऊन गेलो. एकदाही हा खुर्चीला चिटकून नव्हता व आता खुशाल म्हणतो आहे, केव्हाही या म्हणून !

मग माझी मलाच आठवण झाली. मी पण कचेरीत कोणी भेटायला कधी येऊ, असे विचारले तर असंच 'केव्हाही या' असे उत्तर देतो व आता विश्वविद्यालयातच दहा वेळा आपली खुर्ची सोडून आलो आहे! जो आपल्यात दोष आहे तोच भुगोघामध्ये

पण असताना त्यांच्यावर टिका करून कसे चालेल ?

चला, उद्या तर उद्या !

— — ८०

भुगोघाना उद्या येतो म्हटले, पण ते जमले नाही. साहेबानी गेले सहा महिने त्यांच्या मेजावर पडले होते ते काम आताच तातडीचे म्हणून माझ्याकडे पाठवले.

मी डॉक्टरकी करण्याच्या विचारात आहे, हे साहेबांच्या कानावर कोणा चुगलखोरानी घातलेले दिसते आहे. ह्या साल्याला कोणाचाही, त्यातल्या त्यात आपल्या हाताखाली काम करणाऱ्या माणसाचा उत्कर्ष झालेला पहावतच नाही. मराठी वृत्तीच ती. नाही तर त्या पंजाबी, मद्रासी वा बंगाल्यांकडे पहा. कसे हाताखालच्या लोकाना वर यायला मदत करतात ते !

तरी बरं, हेसुद्धा भुगोघा आहेत. अगदी माझ्यासारखे 'ए'कारान्त 'स्थ' आहेत. पण हे कोणाच्या कापल्या करगळीवर मुतणार नाहीत. असो, अशी एखाद्या विशिष्ट जातीवर वा पोट–जातीवर दैनंदिनीत टीका करणे योग्य नाही.

शेवटी आज भुरे, गोरे व घारे साहेबांची भेट झाली. व त्याच वेळी एक घोटाळा झाला. मी अर्जात नाव, वय, पत्ता, विषय वगैरे सर्व माहिती दिली होती, पण ती परत एकदा तोंडी विचारण्याची पद्धत आहे.म्हणून भुगोघानी मला ती विचारली.

मी पोटजातीने अगदी 'ए'कारन्त 'स्थ' असलो तरी रंगात व दिसायला अगदी दुसऱ्या पोटजातीतल्या 'ई' कारान्त 'स्थ' सारखा आहे, हे ज्यानी ज्यानी मला पाहिले आहे त्याच्या लक्षात आले आहे. त्यामुळे माझ्या मनात कोणा भुगोघाची भेट झाली की एक न्यूनगंड निर्माण होत असतो. पण आपण जरी भुगोघा नसलो तरी आपले आडनाव इतके भक्कम भुगोघा आहे की, त्यामुळे आपल्या रंग–रूपाकडे दुर्लक्ष होईल असा माझा कयास होता.

गेल्या पचवीस-सव्वीस वर्षांत महाराष्ट्रात काही बदल झाला की नाही, मला माहित नाही, पण आडनावाबाबत खूप मोठा बदल झाल्याचे मला माहित होते. पूर्वी नुसते 'ता' वरूव ताक-भात तर ओळखतच, पण आडनावावरून एखादा माणूस कोणता 'स्थ' आहे, त्याचे गोत्र काय वगैरे सगळे सूर्यप्रकाशासारखे स्पष्ट दिसत असे. पण आता दलितानी वरच्या वर्गाची आडनावे घ्यावयास सुरवात केली होती. त्यामुळे घोटाळे उद्भवत.

भुगोघानी मला नाव विचारताच मी श्याम फळाणे म्हणजे श्याम महादेव फळाणे असे सागावयाच्याऐवजी श्याम फलाने असे म्हटले. जसा 'ध'चा 'मा' झाल्यामुळे नारायणराव पेशवा आपल्या प्राणास मुकला त्याचप्रमाणे 'णे'चा 'ने' झाल्याबरोबर मी आपल्या जातीस, पोटजातीस तर मुकलोच, पण अ-दलिताचा अगदी दलित होऊन गेलो !

मी 'णे'चा 'ने' करण्यामागे थोडे कारण होते. इंग्रज लोक सगळेच दलित असल्याकारणाने त्याच्या भाषेत 'ण' हा शब्द नाही. त्यामुळे माझ्या नावाचे स्पेलिंग Phalane असे होते. दिल्लीला सगळे फलाने ह्या नावानेच हाका मारत. दिल्लीला 'णे' ला 'ने' वरून जात–पोटजात पडत नाही. तेथे class–I, class II वरून पडते. त्यामुळे 'णे'चा उच्चार 'ने' झाला तरी मोठेसे बिघडत नसे.

पण महाराष्ट्राची वा मुबईची गोष्ट तशी नव्हती. मी 'ण'चा उच्चार 'न' करताच भुगोघांनी माझ्याकडे एका विशिष्ट नजरेने पाहिले. त्या नजरेची मला सवय होती, कारण कचेरीत कोणी नवा कर्मचारी 'राखीव' जागी आला की, मी त्याच्याकडे त्याच विशिष्ट नजरेने पहात असे.

ह्या नजरेची फोड केली असता त्यात, हे अस्पृश्य, वा अस्पृष्ट वा हरिजन वा दलित लोक आहेत. नाही म्हटले तरी मागासलेले, कमी प्रतीचे आहेत. आपण त्याना चागले वागवणार नाही तर कोण ? असे भाव त्या फोडीत दिसले असते.

भुगोघानी माझ्याकडे 'त्या' दृष्टीने पहायला व माझ्या मनात एक विचार चमकून जायला एकच गाठ पडली. काही दिवसापूर्वी मी आपल्या देवआनंदसारख्या दिसणाऱ्या ग्रेगरी पेक नावाच्या अमेरिकन नटाचा एक सिनेमा पाहिला होता. त्यात ह्या देवआनंदसारख्या दिसणाऱ्या ग्रेगरीने वार्ताहराचे काम केले होते. एकदा त्याला ज्यू लोकावर–त्याना मिळणाऱ्या वागणुकीवर लेख लिहावयाला सागतात. तेव्हा तो आपण स्वत.च ज्यू आहोत, असे भासवतो व त्या अनुभवावर लिहितो.

तेव्हा आपण त्या देवआनंदसारख्या दिसणाऱ्या ग्रेगरीसारखे का करू नये, असा विचार मनात आला व त्या विचारावरून मी भुगोघांचा 'णे' ऐवजी 'ने' ने झालेला गैरसमज तसाच ठेवला.

"मी वाचतो तुमचे कागद. आणखी एक आठ दिवसाने या." भुगोघा अगदी मोठ्या भावाच्या आवाजात म्हणाले.

देवआनंदसारख्या दिसणाऱ्या ग्रेगरीची ऐट आणायला गेलो, पण कालपासून मनाला एक गोष्ट फार खाते आहे. आपण दलित असल्याची नक्कल करायला गेलो तर लोक आपल्याला खरेच दलित समजू लागले की ! म्हणजे आपण खरेच दिसायला व वागायला वगैरे इतके 'इन्फिरियर' आहोत की, आपण 'ए'कारान्त 'स्थ' असू असा कोणाला संशयही आला नाही ?

ह्या सगळ्या विचारानी आरशात पहात होतो तर राधाने पकडले. "खूप तरुण दिसता हो अजून. विश्व–विद्यालयात जाता आहात हल्ली, कोणीही भाळायची तुमच्यावर !" वाचकांची सुरी दोन्ही बाजूने पातेदार असते. जोपर्यंत डॉक्टरकीचे काही करत नव्हतो तोपर्यंत तसं बोलायची व आता काही करतो आहे तर असं बोलते !

राधाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले तरी आपण दलित दिसतो, ह्या विचाराकडे दुर्लक्ष करून मनाला चालण्यासारखे नव्हते.

— — ८०

'तो' विचार अजून टोचतच राहिला आहे. तुम्ही आहात त्या जातीच्यापेक्षा खालच्या जातीचे आहात, असे समजले जाणे ही सगळ्यात मोठी अपमानकारक गोष्ट आहे, ह्याची जाणीव आज झाली. आपण खालच्या जातीचे दिसतो म्हणजे आपल्यात खरच काही तरी कमी असणार.

म्हणून कोणा कोकणस्थाला दलित वगैरे तर राहू द्या, पण साधे देशस्थासारखे दिसता वा वाटता म्हटले तरी फार अपमानास्पद वाटते. तेच एखाद्या देशस्थाला तुम्ही कोकणस्थासारखे दिसता म्हटल्यावर पुत्र-जन्मा-इतका आनंद होईल !

पूर्वी तर कोणा देशस्थाला कोकणस्थ मुलगी सागून आली तर अगदी धन्य धन्य होत असे.

पण आता हा 'दलिता'चा पार्ट रंगवायचाच. त्याने डॉक्टरकी पदरात पडण्यात फार फायदा होण्याचा संभव आहे.

८०

आज परत विश्वविद्यालयात गेलो. मला बघताच भुगोघा चक्क उठून उभे राहिले व त्यांनी मोठया प्रेमाने हात हातात घेतला. ते इतके प्रेमळपणे वागू लागले की, मला त्याचाच राग येऊ लागला. मी माझ्या कॉलेजात जाणाऱ्या मुलाला संभाळून जा, काळजी घे वगैरे प्रेमळपणे सांगताच तो असाच चिडत असे.

'खरं म्हणजे साहेब म्हणत होते की, विषयात काही दम नाही आहे म्हणून' भुगोघा सांगू लागले; 'पण मी म्हटले साहेब आपण जर ह्यांना मदत केली नाही तर कोण करणार?'

'नाही; पण जर विषयातच जर दम नसेल तर मी दुसरा विषय निवडेन...'

'नाही, नाही असं कसं म्हणता? बाकी लोकांकडून जी अपेक्षा असते तशी तुमच्याकडून नाही. तुमच्या अजूबाजूचे वातावरण तसे अभ्यासाला पोषक नसते...'

आता मात्र अगदी रहावेना. दलितांचा खरा अपमान त्यांना वाईट वागवतात वा विरोध करतात त्या वेळी होत नाही तर त्याना कमी प्रतीचे समजून त्याच्याशी दया बुद्धीने वागतात त्या वेळीच होतो, असे मला दलितपणाच्या एका दिवसाच्या अनुभवावरून लक्षात आले. आता रागावूनही फायदा नव्हता. कारण मी दलित असल्याकारणाने त्याचा काही वेगळाच अर्थ लावला जाण्याची भीती. म्हणून चूप राहिलो.

'पुढल्या आठवड्यात श्रीमती डॉ. गोडबोले ह्यांना भेटा, त्या तुम्हाला करतील.' भुगोघा अत्यंत प्रेमळ आवाजात म्हणाले. मी त्याचे आभार मानले व घरी आलो.

— — ८०

गेले ७–८ दिवस डॉ. गोडबोल्यांकडे जावे किंवा जाऊ नये ह्याचा विचार करत आहे. कारण मी दलित आहे. ह्याची बातमी त्यांनाही लागली असणार; पण शेवटी धीर केला व गेलो.

दलितांनी वरच्या वर्गाच्या लोकांची पुष्कळशी आडनावे घेतली असली तरी गोडबोले हे नाव काही कोणी घेतल्याचे आढळत नाही. खरं म्हणजे कोकणस्थ ब्राह्मणातसुद्धा हे गोड नाव मुळात आलेच कसे? ते असो. त्यामुळे त्याही भुगोघा असाव्यात, असा अंदाज केला होता व तो बरोबर निघाला.

त्या माझ्यापेक्षा वयाने ७–८ वर्षांनी लहान दिसत होत्या. आज-काल आडनावावरून दलित आहे की अ-दलित आहे, ह्याचा उलगडा होत नाही, त्याचप्रमाणे श्रीमतीवरून कोणी कु. आहे की सौ. आहे ह्याचा पण उलगडा होत नाही. मध्यंतरी फॅशन म्हणून व आता चोऱ्या होतात म्हणून मंगळसूत्र गायब झाले आहे ते गायबच आहे. बरं मंगळसूत्र कोठे लपवले आहे की काय, हे जास्त निरखूनही पहाता येत नाही. म्हणजे, कोणी कु. वा सौ. समजण्याचा मार्ग बदच आहे.

'या, या, फलाणेसाहेब या. मी तुमचीच वाट पहात होते. मला त्या आपल्या साहेबांनी फोन केला होता.' श्रीमती डॉ. गोडबोले उभ्या राहून माझे स्वागत करण्या झाल्या. मी एकदम त्यांच्याशी हस्तांदोलनाकरता हात पुढे केला. मराठी बायकांना हस्तांदोलन करावयाची सवय नसते वा हौस पण नसते. दुसरा कोणी, म्हणजे कोणी अदलित असता तर त्यांनी त्याला झटकूनच टाकले असते; पण 'ह्या' लोकांशी वागताना थोडे मार्जिन ठेवावयास पाहिजे, म्हणून त्यांनी हात पुढे केला. असा माझा अंदाज.

आज त्यांच्याशी जुजबी बोलणे झाले. 'ण' चा 'न' करताना व 'न' चा 'ण' करताना माझी त्रेधा होत होती. गोडबोलेबाई ते सगळे कौतुकाने पहात होत्या.

— — ८०

आज परत श्रीमती डॉ. गोडबोल्यांकडे गेलो होतो. तेथे दोन-चार श्रीयुत डॉक्टर व दोन-चार श्रीमती डॉक्टर गप्पा मारत बसले होते. डॉ. गोडबोल्यांनी माझी ओळख करून देताच त्यांच्या तोंडावर 'तो' भाव दिसला. ह्याचा अर्थ गोडबोलेबाईंनी माझ्याबद्दल त्या सगळ्यांना सांगितले असणार. सगळ्यात दुःखाची गोष्ट अशी की, मी दलित असावा ह्यावर सगळ्यांचा चटकन विश्वास बसत होता!

ती मंडळी गेल्यावर श्रीमती डॉ. गोडबोले मला म्हणाल्या, 'खरंच तुमच्या जातीतल्या इतक्या वयस्क माणसाने प्रबंध लिहिण्याचे मनात आणावे हेही कौतुकाचे आहे!'

'का? त्यात कौतुक कसले?' मी जरा दलित–रागातच विचारले.

डॉ. गोडबोले एकदम चपापल्या. आपण बोलता बोलता ह्या दलिताच्या कोणत्या मृदू भागाला तर स्पर्श नाही ना केला, असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर होता. मग थोडी चर्चा वगैरे झाली व मी कॉफी प्यायला चला, म्हणून त्यांना विनवले. त्यांनी ह्या लोकांना कॉफी वगैरे पिण्याकरता नाकारणे योग्य नाही, असा एका क्षणात विचार केला व त्या कॉफी पिण्यास आल्या.

— — ८०

आता डॉ. गोडबोल्याबरोबर कॉफी पिण्याची, व मोकळेपणाने गप्पा मारण्याची व त्या प्रसंगी थोडे 'जवळ' येण्याची चटकच लागली आहे; पण प्रत्येक वेळी मनात विचार येतो की, त्या माझ्या बोलण्यावर वा व्यक्तिमत्वावर खूष आहेत की, एक दलित म्हणून सरकार जसे काही जास्त सुविधा देते तशा त्या मला 'सुविधा' देत आहेत? असो.

— — ८०

डॉ. गोडबोल्यांच्या मित्र–मैत्रिणीत मला अगदी 'सानेगुरुजींच्या गोड गोष्टी–भाग पहिला' पासून तो भाग दहाव्यापर्यंत प्रमाणे गोड गोड वागवले जाते. आता मला दलित म्हणून वागवून घेण्याची सवय लागली आहे.

— — ८०

आज भुगोघाकडे गेलो होतो. ते नेहमीप्रमाणे मोकळेपणे बोलले नाहीतच. उलट नाराज दिसले. मी मनाशी म्हटले, चला, आता हे मला दलितासारखे वागवणार असे दिसते. मला त्याचा आनंद झाला.

दोन-चार मिनिटानंतर तेच एकदम रागाने म्हणाले, 'तुम्ही शनिवारातल्या विश्वंभर भिड्यांचे मेव्हणे?'

'होय, त्याची मोठी बहीण ती माझी बायको.' मी जितक्या शांतपणे बोलता येईल तितका बोललो.

'पण मग आधी कधी बोलला नाहीत ते?'

'त्यात काय बोलायचे? त्यांची मोठी बहीण माझी बायको की लहान बहीण, ह्याने काय फरक पडणार होता?' फिरकी मीच घ्यावी.

'मोठी वा धाकटीचा प्रश्न नाही. ह्याचा अर्थ तुम्ही पक्के चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण आहात म्हणावयाचे.' भुगोघांचा राग वाढतच होता.

'पण मी कधी म्हटले की मी कोकणस्थ ब्राह्मण नाही म्हणून?'

'आमचेच चुकले. तुम्हाला दलित म्हणून इतके दिवस चांगले वागवले.' एवढे म्हणून ते उठले व निघून गेले आज बहुधा श्रावणी सोमवार वा 'मंथली' असावी. ◻

## पुस्तके

# समन्दे तलाश

## इतिहासाचा चौखुर उधळलेला घोडा

'समन्दे तलाश' म्हणजे तर्काचा-शोधाचा घोडा.' शिवाजीने औरंगजेबास पाठविलेल्या एका फारशी पत्रात हा शब्दप्रयोग आला आहे. ऐतिहासिक स्थळे, कागदपत्रे आणि व्यक्तिरेखा पाहून द. ग. गोडशांच्या मनात उठलेली ही वादळे ! त्यांच्या मनात चौखुर उधळलेल्या ह्या तर्काच्या घोड्याचे तितकेच वेगवान चित्रण ! रूढ अर्थाने हा ऐतिहासिक लेखसंग्रह नाही; तर एका रसिक, विदग्ध आणि कलासक्त मनाने ऐतिहासिक वस्तु, वास्तु व व्यक्ती पाहून केलेली ही प्रकट चिंतने आहेत. प्रस्तुतच्या लेखसंग्रहात संशोधकाची ऐट आणून गोडसे काही काही मांडत मांडत नाहीत, तसा त्यांचा अभिनिवेश कुठेही जाणवत नाही.

'शिल्पी महाराष्ट्र' लेखात पूर्वसूरींनी महाराष्ट्रीयांच्या कला-परंपरांविषयी काढलेल्या अनुदार टीकेला त्यांनी उत्तर दिले आहे. श्री. म. माटे व शिल्पकार श्री. करमरकरांनी मराठी माणूस शिल्प व खोदकामांत तरबेज नाही असे लिहिले होते. त्या टीकेला उत्तर देतांना लेखक स्पष्ट विचारतो की, देशातील ९० टक्के लेणी मग महाराष्ट्रातच का ? गोडसे पुढे ठासून लिहितात की, केवळ शिल्पकलाच नव्हे, तर इतर कलांमध्येही महाराष्ट्राला उत्तम गती होती व आहे.

'कान्होजी जेधे' ह्या लेखात जेधे करीन्याच्या निधर्मी परंपरेवर व बोली भाषा वापरण्याचा कटाक्ष ठेवणाऱ्या तिच्या महतीवृत्तीवर त्यांनी उत्तम प्रकाश टाकला आहे. महाराष्ट्र शब्दाची उपपत्ती शोधताना मुऱ्हे खोऱ्यातील पहाडांची रचना, तेथील झपाटून टाकणारा निसर्ग, विशेष म्हणजे तेथील धुके ह्यांचे मोठे लोभसवाणे वर्णन गोडसे करतात. इतिहास संशोधकाची रुक्ष दृष्टि सोडून ललित लेखनाच्या माध्यमात त्यांनी हा इतिहास मांडला म्हणून 'समन्दे तलाश' अतिशय वाचनीय झाला आहे. बारा मावळ, मुऱ्हे खोरे हा मूळ महाराष्ट्र लेखकांना कसा आवाहन आहे. 'वार अँड पीस' सारख्या शेकडो महान कादंबऱ्या त्या परिसरावर निर्माण करता येतील; पण तेथे टॉलस्टॉयच्या लेखनाची ताकद असलेला प्रतिभासंपन्न लेखक पाहिजे. हे लेखकाचे मत महाराष्ट्रीय साहित्यिकांना आवाहन समजायचे का ?

'शब्दावरचा शेंदूर' ही एक गोडसेकथित 'चित्त चक्षुचमत्कारिक' घटना आहे. मराठवाड्यातील एक जागृत गणपतिस्थान, नवसाला हमखास पावणारा देव म्हणून ख्याती असलेल्या मूर्तीवरची शेंदराची जाड 'खोल' अचानक कोसळून पडते आणि उघड्या पडलेल्या मूर्तीला पुजारी रातोरात पुन्हा लिंपून काढतो आणि सुटकेचा निःश्वासही सोडतो. कारण जागृत गणपती म्हणून प्रसिद्ध असलेली ही मूर्ती चक्क ध्यानस्थ बुद्धाची होती !

'लिहून भिंतीवर भुंजग भरला रंग चितार्‍याकडून' असे लांबलचक शाहिरी शीर्षक असलेल्या लेखात त्यांनी मिथुन शिल्पांची चर्चा केली आहे. देवळे, मंदिरे आणि लेण्यांमध्ये आढळणाऱ्या ह्या मैथुनाकृती विद्वानांमधील एक 'चिरतरुण' विषय आहे. संभोगाच्या असंख्य प्रकारांचे करण्यात आलेले चित्रण यांत्रिक असले तरी ते प्रामाणिक आहे, असे त्यांचे मत आहे. मात्र लेखकाने अशा आकृती कोरण्यामागील हेतू, औचित्य लेखात स्पष्ट केले असते, तर जास्त बरे झाले असते !

भारतातील मध्ययुगीन चित्रकला साचेबंद आणि पारंपारिक होती, युरोपच्या तुलनेने ही चित्रकला फिकट दिसते, हे त्यांनी 'एक दरबार-चित्र आणि चरित्र' मध्ये मान्य केले आहे.

'मस्तानी' हा प्रस्तुतच्या पुस्तकातील एक नितांतसुंदर लेख ! हा ऐतिहासिक लेख असला तरी त्या व्यक्तिरेखेचे त्यानी जे पुनर्मूल्यांकन आणि उदात्तीकरण केले आहे, ते जितके आवेशपूर्ण आणि ओजस्वी आहे, तितकेच रमणीयही आहे. मस्तानी ही मराठ्यांच्या इतिहासातील एक दुर्दैवी व्यक्तिरेखा आहे. तिला इतिहासकारांनी कमालीचे वादग्रस्त करून ठेवले आहे ! पेशवे दप्तरांचा उपसा करून आणि संशोधनाची प्रचंड उठाठेव करूनही इतिहासकार ह्या तेजस्वी स्त्रीला न्याय देऊ शकले नाहीत, अशी लेखकाची तक्रार आहे. मस्तानी ही कलावंतीण होती, रखेली होती ही मराठी माणसाची कल्पना अशी चुकीची आहे, हे गोडश्यांनी मोठ्या तळमळीने पटवून दिले आहे. ती निजामाच्या नाटकशाळेतून पळाली आणि बाजीरावाकडे आली हे संशोधनही लेखकाने खोटे पाडले आहे. मध्यप्रदेशात असलेल्या मस्तानीच्या वंशजाचा शोध घेत लेखक इंदूरपर्यंत पोहोचतो. त्यासाठी छत्रसालकालीन लाल कवीच्या काव्यग्रंथाचेही त्यानी अवलोकन केले. ऐतिहासिक दस्तऐवजांचा धुंडाळा केल्यानंतर मग लेखक ग्वाही देतो की, मस्तानी ही छत्रसालची मुलगी असली पाहिजे. छत्रसालच्या एका मुस्लिम उपपत्नीपासून झालेली ही सुंदर राजकन्या भारताच्या निधर्मी वृत्तीचे द्योतक आहे.

मध्ययुगात हिंदु–मुस्लिम सांस्कृतिक धार्मिक देवाणघेवाणातून एक 'प्रणामी' पंथ निर्माण झाला होता. त्यात महमद पैगंबर व कृष्ण ह्या दोन्हीही दैवतांची सारख्याच भक्तीभावनेने उपासना होत असे. ह्या प्रणामी पंथाची दीक्षा छत्रसाल तसेच मस्तानीने घेतली होती. एका कुलीन, कर्तबगार राजकन्येला जे काही शिक्षण दिले जाते ते सर्व मस्तानीला देण्यात आले होते. केवळ सौंदर्य ह्या एकमेव भांडवलावर मस्तानीने बाजीरावावर अधिराज्य गाजवले नाही, तर सुविद्य, सुसंस्कृत आणि निधर्मी दृष्टिकोन असलेल्या ह्या स्त्रीने आपले तेजस्वी गुणही दाखवले. पण तिला पेशव्यांचे कुटुंब जसे समजून घेऊ शकले नाही, तशीच आजपर्यंतची मराठी माणसेही समजू शकली नाहीत. ह्या लोकविलक्षण सुंदर युवतीला जाधव, होळकर, पवार, शिंदे, कवडे ह्या मराठा सरदारांनी विरोध केला नाही, तर तो विरोध एका विशिष्ट जमातीकडून झाला,

असा लेखकाचा स्पष्ट आरोप आहे. तिच्या गुणाचे नामसंकीर्तन करण्याऐवजी तिच्या सौंदर्याची तारीफ व कधी कधी उपहासगर्भ चेष्टा करण्यातच मराठी इतिहासकारांनी धन्यता मानली. लेखक म्हणतो, 'गेल्या शंभर वर्षांत मराठी इतिहासाची अनेक अ-मराठी साधने प्रसिद्ध झाली. इतिहास-संशोधनाची क्षितिजे वाढली, व्यापक झाली, तसा संशोधनाच्या शास्त्रीय दृष्टीचा आवाकाही वाढला. पण मस्तानीकडे बघण्याचा मराठी दृष्टिकोन मात्र तोच आहे.' राधाबाई (आई) चिमाजी (भाऊ) आणि नानासाहेब (मुलगा) ह्या बाजीरावाच्या जिव्हाळ्याच्या आप्त मंडळीनीच कारस्थाने करून शेवटी मस्तानी व बाजीराव ह्या दोघाचीही जीवनयात्रा संपविली; ह्या दोघाच्या मृत्यूला आप्तजनानी केलेला छळ कारणीभूत आहे. मस्तानीचे आरस्पानी सौंदर्य आणि बाजीरावाचे अलौकिक शौर्य ह्याचा बळी संकुचित धर्माभिमान्यानी घेतला. ग्रीक ट्रॅजेडीसमान झालेल्या मस्तानीच्या मृत्यूने थोडेसे विव्हळ होऊन गोडसे विचारतात, 'मस्तानीचा वशही पेशव्याच्या गादीवर हक्क सांगेल ही भीती तर मस्तानी-द्वेषाच्या मुळाशी नव्हती? निर्वंश झालेल्या पेशव्याचा वंश आजमितीस फक्त इंदुरास असलेल्या मस्तानीच्या वंशातच चालू आहे, ही कोणाची पुण्याई?'

'फडणीस असलेल्या नानाचे आत्मवृत्त' ह्या लेखात नाना फडणीसानी आपल्या विशीपर्यंतच्याच आयुष्याचा जो नि.संकोचपणे आढावा घेतला आहे, त्याची चर्चा आहे. त्याच्या कृश शरीराने अनेक राजनैतिक विजय संपादन केले, तसेच नित्य-नूतन असे भोगविलास घेतले. हे नानाचे एतिहासिक आत्मवृत्त समाजशास्त्र, युद्धशास्त्र, मानसविज्ञानशास्त्र आणि लिंगविज्ञानशास्त्र ह्या सर्वच दृष्टिकोनांतून अभ्यसनीय आहे. नाना फडणिसानी जेव्हा हे आत्मचरित्र लिहिले तेव्हा त्यांची राजकीय कामगिरी शून्य होती. अत्यंत वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून त्यांनी आपल्या श्रद्धा-निष्ठा, शारीरिक विचार-विकार स्पष्ट केले आहेत. एका मुरब्बी, राजकारणधुरंधर व्यक्तीने आपल्या तारुण्यातील गोष्टींची प्राजळ कबुली दिली आहे! त्याचा योग्य तो बोध 'घाशीराम कोतवाल' विरोधी निदर्शने करणाऱ्या लोकानी आजही घ्यावा. कामवासनेने पिडलेल्या देहाला शांती मिळावी म्हणून नाना ईश्वरपूजेकडे वळले. असत्समागम, व्यर्थ रेतस्खलन, स्वप्नावस्था ह्यांची स्पष्ट कबुली नाना नावाच्या एका सामान्य मराठी तरुण माणसाने दिली आहे. 'स्वतःच्या पत्नीशी संबंध येऊनही परस्त्रीबद्दलची पापबुद्धी निःशेष सुटेना' ही कबुलीवजा वाक्ये नाना फडणीस नावाच्या प्रख्यात मुत्सद्द्याची नाहीत; तर बाळाजी जनार्दन भानू,जो पुढे नाना फडणीस म्हणून नावारूपास आला, त्या विशीतल्या कोवळ्या तरुणाची आहेत. ह्या आत्मचरित्रातील दोनतृतियांश भाग नानांच्या तारुण्यसुलभ शारीरपीडांनीच खाल्ला आहे.

'दप्तनी' मध्ये कारस्थानी राघोबा आणि विषयलंपट नानानी पोथ्या, हस्तलिखिते आणि चित्रे कशी जमविली, संग्रह कसे वाढविले, ह्याची माहिती आहे छंदीफंदी आणि कारस्थानी राघोबाना पोथ्या, चित्रे जमविण्याचा चांगला छंद होता. त्याच्या काळात कॅमेरे, फोटो ह्याचे आगमन झाले, ही माहिती स्तंभित करणारी आहे.

असे हे ऐतिहासिक विषयावरचे लेख! म्हटले तर संशोधन, म्हटले तर प्रगट चिंतन! रुक्ष इतिहास आणि ललित लेखन ह्याच्या सीमारेषेवर रेंगाळणारे! इतिहासातील मृत व्यक्ती, वस्तु व स्थळे ह्याचा सहृदय मनाने घेतलेला हा आढावा मराठी साहित्यात नाविन्यपूर्ण ठरावा. संशोधन-कम्-ललित लेखन जातीचे ऐतिहासिक लिखाण मराठीमध्ये सहसा होत नाही. 'समन्दे तलाश' हा इतिहास आहे की काव्य आहे, असा गोड संभ्रम पडावा, अशा शैलीत केलेले हे लेखन दोन्हीही क्षेत्रात तसे अपूर्व मानले पाहिजे. वर्ण्य विषयाशी तादात्म्य पावल्याची कृति, त्या सगळ्याशी असलेला निष्ठायुक्त संबंध पानोपानी व्यक्त होतो. 'लोकधाटी', 'मातावळ' ही त्याची अनोख्या विषयावर लिहिलेली पुस्तके खूप गाजली. त्या कीर्तीत 'समन्दे तलाश'चे दैदिप्यमान यश आणखी जास्त उठावदार आणि दिमाखदार दिसेल.

—प्रा. ह. म. घोडके

समन्दे तलाश
दत्तात्रय गणेश गोडसे
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे : २४५, मूल्य : रु. तीस

# ओळख

□ स्वप्न खुळी : हा सौ. विजया शेवडे यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला काव्यसंग्रह वाचला. सर्वत्र वावरताना जाणवते ते एक घरेलू मन. घरातले स्त्री-जीवनाच्या संदर्भातील अनुभव येथे काव्यरूप बनतात. विषयाला निश्चित बंधन पडते; पण त्याच मर्यादेत आनंद मानून ही कविता रमताना दिसते. स्त्री म्हटल्यावर आपला पती, आपली सासू, विहीण, माहेर-सासर, नातवंडे, नाती घरातल्या विविध व्यक्तींचे स्वभाव, त्याचा कवयित्रीच्या मनावर होणारा परिणाम कवितेतून स्त्री-सुलभतेने टिपला जातो. संसारातली सुख-दु:खे शब्दरूप होतात. कवितेतून व्यक्त होणारे स्त्री-मन केवळ घरापुरते मर्यादित नाही, तर स्त्री जातीचे दु:ख ही कविता सांगू लागते. एखाद्या म्हातारीचे दु:ख ही कविता सांगू लागते. स्त्री मनातल्या भावभावना, त्यांची होणारी पूर्तता आणि कधी त्यांची अपूर्णता, यामुळे निर्माण झालेले द्वंद्व व्यक्त होऊ लागते. स्वप्नाना वेगळा संदर्भ प्राप्त होतो, केवळ धुमसणं शिल्लक राहते. दुबळेपणा जाणवतो. पती-पत्नीत पडत जाणारे अंतर जाणवते. आपणच आपल्यावर काही मर्यादा घालून घेतल्या पाहिजेत. सासुरवाशीण म्हणून काही मर्यादा आहेत, त्या पाळल्या पाहिजेत. हे सर्व करताना सहन कराव्या लागणाऱ्या वेदना कवितेतून व्यक्त होतात. संसारात जळणे आहे. अशा वेळी ती परमेश्वराचा धावा करते. प्रेमासाठी ती व्याकुळलेली आहे. पतीच्या चाहुलीने ती सुखावते. त्याच्या स्वागतासाठी आतुरते. जसा दु:खाचा सूर या कवितेत आहे, तसा सुखाचा सूरही ही कविता व्यक्त करते. या सर्व कविता म्हणजे एका गृहस्थाश्रमातल्या भाऊक स्त्रीची मनोगते म्हणता येतील.

□ 'कविता तायाच्या वाटेच्या' हा अरविंद वामन कुलकर्णी याचा काव्यसंग्रह. या संग्रहात 'ताया', 'वाट' आणि 'दादा, खंडाचा मळा, ताया, वाट मी वगैरे...' अशा

तीन कविता आहेत ताया हे व्यक्तिचित्र आहे. जवळ जवळ तीस छोटचा कविता या दीर्घ कवितेत समाविष्ट झालेल्या आहेत. पहिल्यांदा तायाचे वय कळत नाही,पण तिच्या चित्रणातून हळूहळू तायाचे मन व्यक्त होते. 'कविता' आणि 'ताया' याचा निकटचा संबंध आहे. तायाच्या वृत्तीने ह्याच्या मनात कविता जन्मते. तो पुस्तक-पाटी झाला तर तायाने अक्षर व्हावे, तो मळचातली माती झाला तर तायाने पिके होऊन फुटावे, असे त्याला वाटते. त्याला वाटते तायाने फक्त आपल्यासाठी गाणी म्हणावी. ताया त्याचे मन बनते. ताया एक जाणीव बनते. तिच्यात सर्वकाही एकवटून जाते ताया कलावंताचे मन आहे. ताया मोठी होत जाते. ताया त्याला जगायला शिकवते आहे. ताया आणि कविता एकच होतात. दोघींचे एकदम येणे आणि एकदम दूर जाणे. ताया त्याच्या सहनशील-तेची प्रेरणा आहे, सर्जनशीलताच आहे. समुद्राला मारणे नि त्याचा नदीवर वळ उमटणे, तसं तायाला तडाखा देणे म्हणजे त्याच्या कवितेवर वळ उठण्यासारखे. तिच्याने तो नवा होतो. या व्यक्तिचित्रात अंतर्मुखता आहे एकरुपता आहे. आपल्या सर्जनशीलतेचा शोध आहे. या संग्रहातील तीनही दीर्घकवितांचा विशेष असा की, प्रत्येक दीर्घ कवितेला लेखनकाल आहे. 'वाट' ही दीर्घ-कविता जीवनाचा आलेख बनून जाते. वाट सापडणे, वाटेने पाथर होणे, वाटच हरवणे, दिशाहीन होणे, अशा अनेक दिशा ही कविता व्यक्त करते.त्याचबरोबर जगण्याच्या जाणीवा स्पष्ट होऊ लागतात. स्वत ला निर्माण करणे, स्वत.ला घडविणे, स्वतःला अर्पण करणे ह्या जीवनातल्या घटना वाटेवर घडतात. हे घडत असतानाचा जगण्यातला पोरकेपणा, एकटेपणा, नागवेपणा, उध्वस्तपणा व्यक्त होतो. 'ताया' आणि 'वाटा' या विशेष उल्लेखनीय म्हणता येतील अशा दीर्घ कविता आहेत.

◻ 'अश्रूंची दरी' : हा काव्यसंग्रह म्हणजे श्री. सुधाकर रामटेके यांच्या Sandesh या इंग्रजी काव्यसंग्रहाचे मराठीत श्री अनिल दहिवाडकर यांनी केलेले रुपांतर आहे.सामाजिक जाणीवा ह्या या कवितांचा मूळ विषय. समाजातल्या दैन्याने व्याकुळ होणारा हा कवी समाजातले दु.ख पाहून होरपळतांना दिसतो समाजनिरक्षणाची प्रचीती येते. सर्व सामाजिक प्रश्न कवितांचे विषय बनतात आता अश्रू हे दुबळेपणाचे प्रतीक रहात नाहीत निर्बलता बनत नाहीत तर या अश्रूतूनही काही तरी घडवायची प्रेरणा आहे. दारिद्र्याने तो संतापतो. सर्वत्र दारिद्र्याने घातलेल्या थैमानाने शब्द प्रखर बनतात. मात्र त्यात अंतर्मुखतेपेक्षा, सूक्ष्मतेपेक्षा, निरीक्षणाचा भाग अधिक येतो.'मानवी अस्तित्व' ही कविताही सामाजिक आशय मांडायला लागते पण त्यात भाषणबाजी अधिक येते. वास्तव व्यक्त होते, पण त्यात निर्जीवता अधिक जाणवते, काव्यात्मकता नष्ट झाल्यासारखी वाटते. परमेश्वरावर कवी विश्वास ठेवू लागतो. जीवनाचा शोध घेताना नवीनतेचा शोध घेतो. 'अजून एक मूल जन्माला आलं' सारख्या कवितेतून नवा आशावाद जन्म घेताना दिसतो. कवितांमधून विद्रोह व्यक्त होऊ लागतो. कवी वाट बघू लागतो अशा दिवसाची, ज्या दिवशी अश्रू अर्थपूर्ण होतील, अश्रूच मानवतेचे पाईक–पुढारी बनतील. सर्वांच्या आक्रोशाच्या हलकल्लोळाने स्वर्ग-पृथ्वी हादरली पाहिजे, असे त्याला वाटू लागते. या कवितांत विचार आहे, पण काव्यात्मकता नाही, असे वाटते.

श्री. अशोक इरगे यांचा 'रक्तफुले' काव्यसग्रह वाचला. मानवी जीवनातल्या वेगळचा अनुभवातून ही कविता साकार होताना दिसते. त्यामुळे स्वतःच्या अनुभवाशी प्रामाणिक राहून कवीने असे एक काव्यविश्व उभे केले आहे जे वास्तव आहे आणि हळुवारपणाला धक्का देणारेही आहे. रक्त हे चैतन्याचे प्रतीक; पण तेही दोन प्रकारचे. एक सळसळणारे रक्त आणि दुसरे थंड रक्त. कवीला येणारा अनुभव असा की, अनुभवातील ही चैतन्य-फुले कुणाला अर्पण करावी, तर असा कुणी नाही ! सर्व आहेत ते रक्त नसलेल्या समाधिस्थासारखे. कवी झोपडीतले नग्न दु ख पाहतो. जीवनातली विदारकता, त्याच्या यातना याकडे पहाण्यासाठी त्याला शिकवावे लागत नाही. भवतीभवतीच्या जगातली लाचारी, दैवाचा वेगळेपणा पाहून शेवटी त्याला प्रचलिताविषयी इतका तिरस्कार वाटायला लागतो की, तो म्हणतो, 'संभोगातून निर्माण होणाऱ्या किडयाची ही वळवळ आता थांबवा !'

कवीची अशी अवस्था होते की, प्रेमीजीवनातला अनुभव असो, एक दुःखच त्याच्या वाटयाला येते तिच्या डोळयात त्याची आसवे असणं, त्या सरीत तो उभा राहणं, दोघांच्यात धुकेदार प्रदेश निर्माण होणं, त्याने रक्तबंबाळ होणं ! त्याच्या प्रेमानुभवात त्याला एक अधुरेपणा जाणवतो, अपेक्षा अपेक्षाच राहातात, त्याचे अश्रू त्याच्याच हातात राहतात. तिच्या आठवणींनी त्याचे आभाळ गच्च भरून येते. अशा काही थोडयाफार प्रेमकविता वगळल्या तर एकूण संग्रहातील जास्त कविता ह्या सामाजिक आशय व्यक्त करणाऱ्या आहेत. सामाजिक आशय व्यक्त करणारी कविता निवेदनात्मक बनते. त्यातले भावरूप हरवते. या भूमिकेतून अशोक इरगे यांची कविता अभ्यासणे आवश्यक आहे.

दु.ख कितीही सर्वव्यापी असले तरी कवीला टाळाच्या संगतीत कुठंतरी तुकाचा अभंग आठवणे ह्याला महत्त्व आहे. सामाजिक चौकट मोडता येत नाही. शेवटी पोटाची खळगी जास्त तीव्रतेने त्याच्या मनाला जाग आणते, ज्या विद्रोहात विलक्षण तळमळ आहे, तडफड आहे. प्रत्येक वेळेचा त्याला दाह जाणवतो. वास्तव जीवनात त्याला भेसूर अनुभव येऊ लागतात. अत्याचार, अन्याय, बलात्कार पाहून डोळे आंधळे होण्याइतक्या आज आपल्या जाणिवा बोथट झाल्यात याचे शल्य या कवितेतून व्यक्त होते. माणूस आणि जनावरे यांच्यातला फरक आज जाणवेनासा झालाय. कवीला जाणवते, आपल्या खिशात पोकळ शब्द जसेच्या तसे आहेत लाळ पडेपर्यंत पोटासाठी धावणे आणि जगण्यासाठी लाळ घोटणे हे आजचे संचित आहे. मृत्यूविषयी वेगळी जाणीव ही कविता व्यक्त करू लागते. माणसाच्या नसानसात मरण खेळतंय. म्हणजे माणसाच्या जगण्यात निर्जीवता आलीय. म्हणूनच कवी सागतो, हे जग असं आहे, जिथे ओलेपणा उपयोगाचा नाही.

जर लवकर मेलोच तर माग
या जन्माच्या सवयीने निश्चतच
कुत्र्या-मांजराचं जीवन चांगलं जगेन
स्वाभिमान ह्या गुळगुळीत शब्द
गर्भाशयातच शिवून टाकायला मिळेल.

मूल्ये, ध्येये सर्व नष्ट होतात अभिव्यक्तित तीव्रता येते. कवीला आपल्या भग्नतेची जाणीव होते.

सामाजिक वास्तव एकच आहे, पण प्रत्येक कवीच्या जाणीवा, अनुभव घेण्याची शक्ती–सामर्थ्य यातील वेगळेपणामुळे त्याची कविता वेगळी ठरते. श्री. अशोक इरगे यांच्या या कवितेबद्दल असेच म्हणता येईल.

—प्रतिमा केसकर

## फिनिक्स निवड

# Maugham A Biography

By Ted Morgan
(A Touchstone Book, Pages 711, 9 95 Bbout Rs. 97/—)

याच पुस्तकावर मी 'माणूस'च्या ४ ऑक्टोबर १९८० च्या अंकात लिहिले होते. परंतु त्यातील कोणत्याही गोष्टीची पुनरावृत्ती न करता आणखी एकदा लिहावेसे वाटते. मागील लेख संक्षिप्त आवृत्तीवरून लिहिलेला होता. आता मात्र 'फिनिक्स'मध्ये संपूर्ण आवृत्ती दाखल झाली आहे.

आमच्या ग्रंथालयात काही वाचक असे असतात की, 'They always Keep us on our toes.' हे असे वाचक अक्षरशः अमके पुस्तक तुमच्याकडे आले का नाही, तमके मासिक तुम्ही घेतले की नाही, असे प्रश्न विचारून भंडावून सोडतात. त्यातले बहुतेक आमची रु. ३१५ वार्षिक एका पुस्तकाची किंवा ४२५ रु. वार्षिक दोन पुस्तकांची वर्गणी भरतात. पण त्यातले काही वाचक त्यांच्या वर्गणीपेक्षा चौपट-पाचपट पुस्तके आम्हाला खरेदी करायला लावतात! बरं, या लोकांसाठी आम्ही मग पुस्तके आणतो आणि नंतर खडा टाकून बघतो. 'तुमच्यासाठीच तर पुस्तक आणलं आहे. जादा डेलीवर घेऊन जा.' पण या प्रकारचा वाचक असल्या महागड्या पुस्तकावर वर्गणीशिवाय पाच रुपये पण खर्च करायला तयार नसतो! या उलट, जो वाचक आम्हाला कोणतीच पुस्तके आणायचा आग्रह धरत नाही तो किती तरी वेळा अशी जादा पुस्तके नेऊन वार्षिक वर्गणीखेरीज जादा बिल करीत असतो!

ग्रंथालय सदा वर्धिष्णू असते, पण भारतातील ग्रंथपाल सदा खंगत असतो. यातले पहिले ब्रीद माझे नाही, पण खंगत असल्याचे ब्रीद मी शोधलेले आहे!

आम्हाला मात्र वरील दोन्ही प्रकारचे वाचक आवडतात. पैशाची फारच कुतरओढ होत असते त्या वेळेला मात्र स्वतःच्या वार्षिक वर्गणीपेक्षा पाचपट पुस्तके विकत घेण्याची सूचना करणाऱ्याचा भलताच आकस वाटतो. नसं पाहिलं तर, हे वाचक स्वतःच्या वर्गणीपेक्षा ४०-५० पट किमतीची पुस्तके वाचतात. त्यांचा आग्रह एवढाच असतो की, त्यांनी सुचवलेलीही पुस्तके आम्ही नेहमी आणतो.

वाचकाच्या मागणीला अग्रक्रम देणे ही 'फिनिक्स'ची पॉलिसी असल्यामुळे व परत परत मनावर बिंबवलं की काम होतं, हे गॉबेल्सचं तंत्र कदाचित त्यांना माहित असल्यामुळे, शिवाय आम्हाला ग्रंथालय वर्धिष्णु व्हावं ही नेहमीचीच इच्छा असल्यामुळे आम्ही असली बहुतेक सर्व पुस्तके ग्रंथालयात आणून टाकतो व खंगत जातो!

स्वतःच्या वर्गणीपेक्षा ४०–५० पट पुस्तके वाचून त्यावर पाचपट पुस्तके आम्हाला विकत घ्यायला लावणारा वाचक आम्हाला आवडतो. कारण, यामुळेच कधीकधी उत्तमोत्तम ग्रंथ आमच्या ग्रंथालयात दाखल होतात. असल्या वाचकांकडून अनेक ग्रंथांबद्दलची माहितीही मिळते आणि आमच्या वाचकांसाठी म्हणजे धंद्यासाठी तर ही पुस्तके घ्यावीच लागतात! 'आपण कुठं स्वतःच्या चैनीसाठी ती घेत आहोत?' अशी आमची पण समजूत काढता येते व अपराधीपणाची भावना मनातून नाहीशी होते!

या महिन्यात मी 'पाचपट' वाल्यांसाठी अशी तीन महागडी पुस्तकं घेतली आहेत. त्यातील वरील टेड मोर्गनचे मॉमचे एक १०० रु. चे, हेन्री किसिंजरचे 'Years of Upheaval' हे २५० रु. चे व हर्बर्ट लॉटमनचे 'कामू' हे तिसरे सुमारे ७५ रु. चे. यातील किसिंजरचे सोडून बाकी दोन्हीही पेपर बॅक्स आहेत. आजच कॅम्पमधील एका प्रख्यात दुकानात गेलो असताना एन्. डी. ए. चा एक अधिकारी त्याच्या बॉसला फोनवर विचारीत होता की, 'साहेब, येथील बहुतेक पुस्तके प्रत्येकी ९०–१०० रुपयांवरील आहेत. अशी सेमी-पेपरबॅक्स मी घेऊ का?'

ज्या लेखकाला शेखचिल्लीच्या मनोराज्याच्या पलीकडे पैसा मिळाला, ज्याला अनेक प्रकाराने सन्मान मिळाले, जो लेखक खुमासदार व खुसखुशीत शैलीसाठी जगभर मशहूर झाला, ज्याची शब्दांकित पात्रे व व्यक्तिचित्रे एखाद्या चित्रापेक्षाही अधिक स्पष्ट वाचकाच्या समोर उभी राहिली, असा लेखक आयुष्यभर अनेक गंडांच्या वजनाखाली वाकलेला आढळला तर सहाजिकच अशा लेखकाबद्दल आपल्याला प्रचंड कुतूहल वाटतं! बोलण्यात तोतरा, चालण्यात लंगडा व समलिंगीसंभोगाच्या तीव्र इच्छेने पछाडलेला विल्यम सॉमरसेट मॉम म्हणजे मानसशास्त्रज्ञांचे लॉस अलॉमॉसच होता. टेड मोर्गनचे मॉमचे हे चरित्र म्हणजे अनेक वर्षांची तपश्चर्या आहे. त्यात सॉमरसेट मॉमविषयी अनेक प्रकारची नवीन माहिती उपलब्ध आहे.

मॉमचा जन्म पॅरीस येथे २५ जानेवारी १८७४ रोजी झाला व मृत्यू १६ डिसेंबर १९६५ रोजी नाइस, फ्रान्स येथे झाला. क्वीन व्हिक्टोरीयापासून थेट अणुयुगापर्यंत असा तो साहित्य क्षेत्रात वावरला. वयाच्या दहाव्या वर्षीच तो अनाथ झाला. पुढे त्याला त्याच्या काकांनी वाढविले. किंग्ज स्कूल, कँटरबरी इथे तो शिकला. त्यानंतर जर्मनीत हाइडलबर्ग येथे तो एक वर्ष होता. तिथे त्याने शॉपेनॉरविषयी व्याख्याने ऐकली व त्यातील निराशेचा सूर त्याच्या आयुष्यात फिट्ट बसला. शॉपेनॉरच्या तत्त्वज्ञानाचा मुख्य गाभा म्हणजे 'negation of will.' माणसाची 'irrational will' हीच खरी वास्तवता असते, असे तो म्हणे. आणि मॉमच्या पात्रातून व कथनकातून हेच पालुपद आपल्याला परत परत जाणवतं. मॉम अलंकारिक भाषा कधीच वापरत नसे. नेहमीच सरळ, स्वच्छ भाषा वापरीत असे. तो माणसाच्या स्वभाव-वैचित्र्याचे (irrationalities) बारकावे इतक्या सफाईदारपणे टिपत असे की, आपल्याला काम सोडून त्यांची पुस्तकेच वाचत बसावे असे वाटते. डीकन्सनंतर क्वचितच एवढा लोकप्रिय लेखक झाला असेल. आम्ही शाळा-कॉलेजात असताना आधी डीकन्स वाचू, की आधी मॉम वाचू असे काही तरी व्हायचे. फार विपरित परिमाण झाला याचा. गरमागरम चहा पिऊन

लगेच आईस्क्रीम खाल्ले की रिॲक्शन यायचीच ! हे दोन्ही लेखक कुणीही बरोबरीने वाचू नय. नाही तर डोळयात अश्रू व कपाळावर आठ्या हे सर्व एकदम व्हायला लागेल ! मॉमच्या कादंबरीच्या कथानकात प्लॉटसुद्धा गाय द् मॉपसासारखा निष्णात रितीने हाताळलेला असे. त्याची नाटके मात्र फारच लवकर कालबाह्य झाली. १९०८ साली लंडनमध्ये एकाच वेळी त्याची चार नाटकं चालायची. तेव्हापासून त्याच्या आर्थिक अडचणी संपल्या.

एखादा लेखक किंवा कलाकार असतो तो काही वेळेला त्याची आर्थिक व्यवस्था नीट 'मॅनेज' करू शकत नाही; परंतु मॉमचा एक डोळा नेहमीच त्याच्या आर्थिक बाजूकडे लक्ष देत असे.

युरोपियन माणसं परदेशी वातावरणात जातात. तिथे त्यांच्या परिस्थितीत गुंतागुत होते व त्यातूनच मानवी स्वभावाच्या oddities बाहेर येतात. अशा मॉमच्या बऱ्याच कथा–कादंबऱ्या आहेत. माणसाच्या चांगुलपणावर व शहाणपणावर मॉमचा विश्वास नव्हता.

मॉमचा पुतण्या पण लेखक होता. (अजून असेलही) त्याचे नाव रॉबिन मॉम. त्याचं एक पुस्तक, 'Somerset and All the Maughams' हे बरंच फेमस आहे. हे पुस्तक म्हणजे त्याच्या कुटुंबातील खळबळजनक आठवणी. याच्या कादंबऱ्या पण समलिंगसंभोगवाद या विषयाने पछाडलेल्या आहेत. त्याने त्यांचे काका सॉमरसेट मॉमवर Conversation with willie' असेही एक पुस्तक लिहिले आहे.

मॉमची प्रकृती नेहमीच नाजूक असे. तरी त्याचे आयुष्य ९१ वर्षांचे होते, हे एक गूढच होतं; पण श्री. टेड मॉर्गन म्हणतात की; मॉम नेहमीच त्याच्या प्रकृतीची उत्तम काळजी घेत असे. धडधाकट माणूस आपल्या प्रकृतीची काळजी घेत नसतो, असे ते या पुस्तकात म्हणतात. प्रकृतीबद्दल तक्रार करणारे आपल्या शरीराची सारखी मशागत करीत असतात म्हणून ते दीर्घायुषी होतात, असे मॉर्गन म्हणतात !

या पुस्तकात डॉ. पॉल नायहन्स यांचा बऱ्याच वेळा उल्लेख आहे. डॉ. नायहन्सकडे अनेक नामांकित वृद्ध मंडळी नवचैतन्यासाठी ट्रीटमेंट घ्यायला यायची. आगाखान, ड्यूक ऑफ विंडसर, कॉनरॅड ॲडनॉवर, १२ वा पोप पायस, थॉमस मॅन, राजा इब्न साऊद, जॉर्जेस ब्रॅक (क्युबीझमवाला ?), वैमानिक चार्लस लिंडबर्ग, ग्लॉरीया स्वॅन्सन वगैरे अनेक जगप्रसिद्ध मंडळी त्याच्याकडे नवचैतन्यासाठी येत असत. मार्टिन बॉरमनही सुद्धा दहा हजार डॉलर फी देऊन डॉ. नायहन्स यांची ट्रीटमेंट घेतली होती, हे मी 'माणूस'च्या ४–९–१९७६ (Aftermath) अंकात लिहिले होतेच. डॉ. नायहन्स त्याच्या ट्रीटमेंटला 'सेल्यूलर थेरपी' असे म्हणत असे. ewe (यू) म्हणजे मेंढीच्या पोटात जे भ्रूण किंवा Foetus असते, त्याच्या अवयवातील पेशी इंजेक्शनद्वारे ते पेशंटना देत असत. मेंढी आणि भ्रूण कापल्यापासून एका तासाच्या आत हे करायचे असते. पेशंटचा जो अवयव कमजोर असेल तोच भ्रूणचा अवयव काढून त्यातील पेशीची इंजेक्शने डॉ. नायहन्स पेशंटला देत. ही 'सेल्यूलर थेरपी' डॉ. नायहन्सबरोबरच मृत्यू पावली की काय ? कारण तिने पुढे पाळे–मुळे धरल्याचे ऐकिवात नाही. त्या वेळी मात्र डॉ. पॉल नायहन्सचे शिष्य लांब–लांब देशात पसरले होते.

स्वित्झर्लंडमधील या डॉक्टरचा दवाखाना म्हणजे विख्यात वृद्ध लोकाची मक्काच ! 'माझ्या ट्रीटमेंटमुळे वृद्धावस्था लांबणीवर टाकता येते व हृदयरोगापासून ते तीव्र समलिंगसंभोगवादाच्या इच्छेपर्यंतचे अनेक रोग नाहीसे होतात', असा त्यांचा दावा होता. त्यांनी सन १९३१ मध्ये 'सेल्यूलर थेरपी'ला जन्म दिला. हे डॉक्टर स्वतः ८८ व्या वर्षी १९७१ मध्ये निवर्तले.

या पुस्तकाचा शेवट मात्र कमालीचा 'मॉमीश' (Maughamish) आहे. हेमिंग्वेचे शेवटच्या दिवसात कसे हाल झाले हे मी 'माणूस'च्या अंकात, 'पपा हेमिंग्वे' (हॉचनर) या सदराखाली लिहिले होतेच; परंतु मॉमचेही शेवटी शेवटी इतके हाल झाले की, याबाबतीत तरी त्याची हेमिंग्वेशी तुलना केल्याशिवाय राहवत नाही. मॉम सारखा पुटपुटत असे, 'I will see it through !' तर हेमिंग्वे स्वतःशी म्हणत असे, 'I will end it all.' आणि दोघांनीही त्याप्रमाणेच केलं.

मॉमच्या इच्छेनुसार त्याच्यावर अग्निसंस्कार करण्यात आले. कार्य पूर्ण झाल्यावर मॉमच्या अस्थी घेऊन एक माणूस त्याच्या माजी सेक्रेटरीला द्यायला आला; परंतु त्यात दोन मोठी हाडं होती, ती कंटेनरमध्ये मावेनात, तेव्हा त्या माणसाने हातोडीने मॉमच्या हाडाची पावडर करून टाकली ! 'The attendant came back with a hammer and pulverized what was left of one of the masters of contemporary fiction !'

ॲलनने मॉमचा पार्थिव देह आणून ठेवला त्या वेळेला अनेक मंडळी मॉमला शेवटचा निरोप द्यायला आली. त्यात बहुतकरून V. I. P. होते. त्यातील एकाने एक तपकिरीची डबी चोरली, तर एक श्रीमंत विधवा मॉमच्या पलंगाजवळील पडद्याला सिल्क–लायनिंग आहे की नाही, हे अती काळजीपूर्वक तपासायला लागली !

A fitting and thoroughly compatible tribute to a great cynical writer !

अशी इन्टरेस्टिंग पुस्तके मला घ्यायला भाग पडल्याबद्दल मी पण 'पाचपट'वाल्यांना सलाम करतो !

–जे. एन्. पोंडा


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**


**सुमती देवस्थळे**

मूल्य बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# माझ्या मते संगीत रंगभूमीचे भवितव्य शून्य आहे.

**यंदाचे नाट्यपरिषदेचे अध्यक्ष वसंतराव देशपांडे यांच्याशी गप्पा**



## सुरेश खरे

माझ्या मते 'कटयार काळजात घुसली' हे संगीत नाटक नाहीच' घिम्या लयीत, शांत आणि घीरगंभीर सुरात हे शब्द उच्चारले गेले आणि अकोला नाट्यसंमेलनात उपस्थित असलेला हजारो रसिकांचा समुदाय क्षणभर स्तिमित झाला. ज्या नाटकाचे पाचशेच्यावर प्रयोग झाले, नाटकातील पदांनी तुफान लोकप्रियता मिळवली,ज्याचं संगीत घरोघर पोचलं ते संगीत नाटकच नव्हे ? आणि त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे विधान त्यात प्रमुख भूमिका करणाऱ्या, लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ झालेल्या कलावंतानं...डॉ. वसंतराव देशपांडे यांनी...संमेलनाच्या अध्यक्षपदावरून करावं ? मीही क्षणभर हादरलो; परंतु वसंतराव म्हणजे स्टंटबाजीची विधानं करून सवंग लोकप्रियता मिळवण्याचा प्रयत्न करणारा कलावंत नव्हे. नंतर संगीत नाटकाचं वसंतरावांनी जे सुंदर आणि मूलगामी विवेचन केलं ते त्यांच्या बुद्धिमत्तेची आणि व्यासंगाची साक्ष देणारं होतं. त्यांनी एक नवीन विचार दिला जो विचार करायला लावणारा होता.

वसंतरावांना आज गेली कित्येक वर्षं मी जवळून पहातोय. तशी त्यांची माझी जवळीक फार उशीरा झाली; परंतु भावनांची दृढता वर्षांच्या संख्येवर थोडीच अवलंबून असते? काही काही गायकांना तासभर ख्याल पिसूनसुद्धा जमत नाही, तर एखादा गायक पाचच मिनिटात मैफल जिंकतो; पण वसंतरावांचं आक्रमक गाणं समजायला सोपं पडतं. कारण ते काळजाला भिडतं; पण माणूस समजायला अवघड आहे. त्याच्या सान्निध्यात आलं की क्षणात समजतं ते त्यांचं दिलदार मन. त्याची व्याप्ति समजते; पण खोली नाही समजत. मुळातली कुशाग्र बुद्धी, तरल मन आणि अनुभवाच्या शाळेत शिक्षण झाल्यामुळं समृद्ध झालेली जीवनाची कक्षा. यामुळं वसंतरावांच्या मनाला सुंदर पैलू पडले आहेत. कडवट अनुभवामुळं माणसं साधारणपणे कडवट बनतात आणि ते अनुभव रंगवून सांगून सहानुभूतीची अपेक्षा करीत मोठं व्हायचा प्रयत्न करतात.

वसंतरावांनी आपल्या कडवट अनुभवांचं भांडवल कधीच केलं नाही. कडवट अनुभवांतूनसुद्धा जीवनातलं सौंदर्य शोधायचा त्यांचा प्रयत्न सतत चालू असतो. जीवननिष्ठा, चिंतन वगैरे वगैरे शब्द फार म्हणजे फारच जड आहेत. सामान्य माणूस पटकन दचकतो. त्याला पुस्तकी कृत्रिमतेचा वास येतो; पण हे शब्द कधीच न वापरता वसंतरावांचं चिंतन नेहमी चालू असतं. एकांगी, एककल्ली असण्यात कलावंत स्वतःला धन्य मानतात. वसंतरावांची बहुश्रुतता, वाचन आणि निरीक्षणशक्ती पाहिली की, थक्क व्हायला होतं. वसंतरावांचं व्यक्तिमत्त्व चहूबाजूंनी फुललंय आणि त्यामुळंच मला वाटतं. त्यांच्यातला कलावंत सतत बहरत राहिला. आमचे सूर जुळले याला दुसरं एक कारण की, सुरांच्या दुनियेत रंगणारा हा सम्राट माणूस म्हणून तितकाच सुरेल आहे. बऱ्याच वेळा अशी माणसं बेसुरी असतात. वाङ्मयात शब्दसौंदर्याची उधळण करणारे भाषाप्रभु खाजगीत ज्या शिव्या देतात त्या ऐकवत नाहीत असं बऱ्याचदा असतं; पण वसंतरावांचं तसं नाही. वसंतरावांचं गाणं जसं भावस्पर्शी असतं, तसंच त्याचं बोलणंही तितकंच भावस्पर्शी असतं.

बोलताना त्यांचा चेहराही बोलतो, डोळेही बोलत असतात. माझ्यासारख्या चाळिशी उलटलेल्या; पण त्यांच्याहून अर्थातच सर्व दृष्टीनं लहान असलेल्या त्यांच्या मित्राला ते 'काय रे बाळा नवीन काय ?' असं विचारतात तेव्हा काय बरं वाटतं म्हणून सांगू ? त्या 'बाळा' या शब्दात मोठेपणाचा अहंकार नसतो तर त्यांना जे काय वाटतं ते ओसंडून जात असतं. त्यांच्यातली स्वाभाविकता काळजाला भिडते ती एक उत्स्फूर्त जागा असते. घोटवलेली तान असते. वसंतरावांनी नुसतं बोलत रहावं आणि आपण ऐकत रहावं म्हणून कधीकधी मी नुसताच गप्पा मारायला जातो. आपण नुसतं ऐकत रहायचं. प्रत्येक वेळी ते नवीन विश्व उलगडून समोर ठेवतात. मी तृप्त होऊन येतो.

नाट्यसंमेलनातल्या त्या विधानानं क्षणभर का होईना मला अस्वस्थ केलं होतंच. कलावंताला जास्तीत जास्त समजून घ्यायचं तर गप्पांसारखं साधन नाही. म्हणून ठरवलं की, वसंतरावांना भेटायचं. तडक उठलो आणि त्यांच्याकडे गेलो.

त्यांच्याशी झालेल्या या मनमोकळ्या गप्पा......

◻

**वसंतराव :** या खरे ! किती दिवसांनी आलात ! बसा. काय म्हणता ?

**खरे :** मी आज काही म्हणायला आलो नाही. ऐकायला आलोय. गप्पा मारायला आलोय. तुमच्या सुरांच्या मैफलीत जसं धुंद व्हायला होतं तसं गप्पांच्या मैफलीत पण धुंद व्हायला होतं. परवा काय झालं, आमचा मित्रमंडळीमध्ये वाद चालला होता. विषय निघाला 'कट्यार' वरून. वसंतराव मुळात गायक ? नट ? की गायक–नट? शेवटी असं ठरलं की, तुम्हाला विचारायचं.

: मी मुळात 'गायक'...

: पण तुमच्यातला नटही तितकाच समर्थ आहे.

: तरीही मी गायकच ! तशी नाटकं केली आहेत. १९३९ मध्ये एक हिंदी नाटक केलं होतं तीन अंकी. त्याचं नाव 'सरदार बा' संगीत नाटक. मी हिरॉइन होतो आणि चाली पण मीच दिल्या होत्या.

: किती प्रयोग झाले ?

: किती प्रयोग ? दोन.

: तेव्हा संगीताची आराधना चालू होती, मग चालीमध्ये यमन वगैरे सुरुवातीचे राग...

: नाही. पंजाबी ढंगाचं संगीत दिलं होतं. नुकताच तेव्हा पंजाबमधून आलो होतो.

: लोकांना आवडलं का ?

: खूप आवडलं, कौतुक पण खूप झालं, करमणूक हा दृष्टिकोन, बस्स ! गंमत आली, नाटकाचं वेड मात्र जबरदस्त.

: वसंतराव, नाटकाचं वेड जबरदस्त. नाटक केलंत, संगीत दिलंत, लोकांना आवडलं. खरं म्हणजे तुम्ही पुढंही नाटकंच करायला हवी होती.

: पण माझ्यातला गायक डॉमिनन्ट होता. संगीत ही माझी नेहमीच पहिली आवड राहिली आणि गायक हा मुळात नट असतो, असावा लागतो, तरच तो गाणं पोचवू शकतो. नटाला जसं भूमिकेत शिरावं लागतं तसं गायकाला चीजेत शिरावं लागतं. अर्थ–भाव, वातावरण हे उभं करायला लागतं; तरच ते गाणं पोचू शकतं, रसिकाला भिडू शकतं.

: वसंतराव, कलात्मक निर्मितीचा आनंद आणि रसिकाची दाद ही गायकाला जास्त मिळते की नटाला ?

: अर्थात गायकाला, असं मला वाटतं. गायक 'सोलो परफॉर्मर' असतो. नाटक ही साधिक कला आहे. गायकाचं नातं रसिकाशी लगेच जुळतं. कम्युनिकेशन जास्त वेगानं होतं. रसिकाची दाद शब्दांनीच वाहवा' म्हणून यावी लागत नाही. ती डोळ्यातूनसुद्धा येते. समोरच्याला आपलं गाणं समजलं, आवडलं, ते रुजलं हे लगेच जाणवतं. गायक जर मुळात नट नसेल तर त्याचं गाणं म्हणजे संगीताचे नियम शिकवणारा धडा म्हणून समोर येतं; ते भिडत नाही. आता तुम्हीच सांगा, गायकाला मिळणारा निर्मितीचा आनंद आणि येणारी दाद ही नटापेक्षा वेगळी नाही ?

: म्हणून तुम्ही प्रथम नाटकाकडे फारसे वळला नाहीत.

: शिवाय रंगभूमीवरची खालावलेली स्थिती. त्यामुळं हौस होती; पण नाटक हे सर्वस्व करावं असं कधी वाटलं नाही.

*: आजच्या पिढीतल्या गायक-नटांविषयी तुम्हाला काय वाटतं ?*

: बसवलेली गाणी. काय आहे खरे, बैठकीचे संकेत वेगळे आणि रंगमंचावरचे संदर्भ वेगळे; पण बैठकीचा गायकच ते सामर्थ्यानं करू शकतो. मुळात जे थोडं गाणं असतं ते संपूर्ण सामर्थ्यानिशी का नाही पेश करीत ? आविष्कार हा तुमच्या ज्ञानावर अवलंबून असतो. तपश्चर्या हा शब्द फारच स्वस्त झालाय, म्हणून तो नाही मी वापरीत. गाण्यात Trial and error मेथड नसते. जे आहे ते सामर्थ्यानं टाका आणि क्षमता असेल तर ते फुलवा; पण मुळात क्षमता हवी ना ? पण त्याला असं एक आर्ग्युमेंट केलं जातं की, आमचे पूर्वज गाणी दळत असत. आम्ही ती आटोपशीर केली.

: कारण आमच्यात ती ताकद नाही म्हणून. पूर्वजांची कशाला हेटाळणी करता ? बदलत्या संदर्भातून इतिहासाकडे का पहाता ? त्या काळी माइक नव्हता. गाण्याची ओळ पिटातल्या प्रेक्षकाना पण समजायला हवी. पहिली ओळ समजल्याशिवाय, तिचा अर्थ समजल्याशिवाय पुढची ओळ घ्यायची नाही. साहजिकच गाणं रजिस्टर करायला कमीत कमी वीस मिनीटं लागायची.ती माणसं सिन्सीअर होती. जाणीवपूर्वक, जबाबदारीनं ती गाणं म्हणायची. त्यात काय चुकलं ? उगीच त्याना दोष देण्यात काय अर्थ आहे ? एक पाऊल पूर्वजांच्या उरावर ठेवून दुसरं पाऊल कुठं ठेवायचं याची जागा शोधा दोन्ही पाय उचलले तर हवेत राहाल आणि शेवटी पडाल. तुम्हाला सांगतो खरे, पूर्वीचे गायक नट मूर्ख नव्हते. 'मधुकर वनवन'ची एक तान सहा महिने पिसत परिश्रम करणारी सर्व माणसं मोठी झाली सिनिसिरिटीमुळे. नटसम्राट हल्ली होतात.

: वसंतराव तुम्ही सिनेमामध्ये पण कामं केलीत ना ?

: हो, 'कालीयामर्दन' मध्ये कृष्णाचं, १९३३ साली. पुढे 'गंगावतरणा'मध्ये ब्रह्मदेवाचं.

: मग सिनेमाची लाईन नाही धरावीशी वाटली ?

: मुळात मी हडकुळा,उंची बेताची, शिवाय घरची माणसं नाउमेद करीत; पण सिनेमा कंपनीत मी नोकरी मात्र केली.

: म्युझिक डिपार्टमेंटला ?

: नाही; प्रथम एडिटिंग खात्यात. पगार रोख रुपये पंचवीस. पुढे म्युझिक डिपार्टमेंटला मला ट्रान्स्फर केलं. प्ले-बॅक्स पण खूप दिले. त्यानंतर माहीतच आहे तुला. एक दिवस मिलिटरी अकौन्टसमध्ये चिकटलो. एकीकडे संगीतसाधना चालूच होती.

: किती वर्षं केलीत नोकरी ?

: २४ वर्षे ७ महिने.

: ती का सोडली ?

: 'मन रमत नव्हतंच. बेगम अख्तरसारखी नोकरी सोडायला सांगत होती. वाटेल तिथं पोस्टिंग व्हायचं.त्या वेळेला नेफात पोस्टींग झालं होतं. आई अतिशय आजारी पडली. तिला भेटायला घरी आलो. तिनं पाहिलं आणि विचारलं, 'नाही ना रे जाणार आता ?' ते शब्द ऐकले आणि त्याच क्षणी नोकरी सोडायचा निर्णय घेतला. पुन्हा तिकडे फिरकलो नाही !

: मग पुढं काय ?

: नाटकं ... गाण्याच्या शिकवण्या.

: नाटकं कोणती ?

: 'एकदा गाऊ दे', 'मी जिंकलो मी हरलो', 'मेघमल्हार' आणि पुढं 'कट्यार'.

: वसंतराव 'कट्यार' चे पाचशे प्रयोग झाले. एखाद्या नाटकाचे एवढे प्रयोग करायचे म्हणजे निर्मात्याला इतक्या ॲडजस्टमेंट्स कराव्या लागतात. तुम्हाला कसं काय जमलं ?

: जमवलं. नाटकाची हौस म्हणून आणि आपल्यामुळं एक चालणारं नाटक बंद पडू नये म्हणून.

: वसंतराव हे नाटक का चाललं ?

: कुठचं नाटक का चालतं, हे शोधायचा प्रयत्न करू नये. ते सांगता येत नाही.

: पण त्यानं संगीत रंगभूमी पुन्हा एकदा टवटवीत झाली. संगीत रंगभूमीचं भवितव्य काय वाटतं तुम्हाला ?

: खरं सांगू ? संगीत रंगभूमीचं भवितव्य शून्य आहे. जुनी नाटकं मोडतोड करून ज्या नवीन पेहेरावात, नवीन भाषेत, रंगावृत्तीच्या नावाखाली संपादित करून गाणी गाळून सादर करणं म्हणजे पारंपारिक संगीत रंगभूमी टिकवणं नव्हे. हा अत्यंत तिरस्करणीय प्रकार आहे. अशा प्रकारे नाटकं सादर करून संगीत रंगभूमी आम्ही टिकवली, अशी प्रौढी मिरवणारी माणसं केवळ स्वतःचीच फसवणूक करीत नाहीत, तर प्रेक्षकांची आणि नाट्यकलेची ही फसवणूक करत आहेत.

: पण वसंतराव बदलत्या काळाची गरज म्हणून ...

: तुम्ही जुन्या नाटकांची मोडतोड करणार ? अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल तुमच्या बोडक्यावर बसले आहेत, का तुमच्याकडे भीक मागताहेत की, आम्हाला टिकवा .. आमचा उद्धार करा ? तुम्हाला हा अधिकार कुणी दिला ? टिकवणं म्हणजे आपली (नसलेली) अक्कल लढवून त्याच्यावर संस्कार करणं नाही; तर ते जसं होतं तसं टिकवायला पाहिजे. किर्लोस्करांचं 'सौभद्र' सादर करायचं असेल तर शंभर वर्षांपूर्वी मराठी जसं बोललं जात होतं तसंच त्या नाटकात बोललं गेलं पाहिजे. तुम्ही एक सांगा, ऐतिहासिक नाटकात शिवाजीचं वाक्य आहे, "मासाहेब, आम्ही असा मनसुबा रचिला होता" या वाक्याऐवजी ते नाटक हल्ली करायच म्हणून 'ममी; माझ्या डोक्यात अशी आयडिया होती' असं वाक्य चालेल का ? का तर ऐतिहासिक नाटक प्रेक्षकांना जवळचं वाटावं म्हणून ?

: मग तुमची काय कल्पना आहे संगीत रंगभूमी टिकवायची ?

: सांगतो. ती टिकवली पाहिजे 'अर्काइव्ह' सारखी. शंभर वर्षांपूर्वीचं 'सौभद्र', 'शाकुंतल' सादर करायचं असेल तर कोणताही शब्द न वगळता, कोणतंही गाणं न वगळता, त्या वेळची मराठी बोलण्याची पद्धत आत्मसात करून,त्या वेळी त्या नाटकात जशी वेषभूषा, केशभूषा करत तशी करून संपूर्ण नाटक सादर करायचं. जाहिरातीत हे सर्व स्वच्छ लिहायचं.

: आणि अशा प्रयोगाला प्रेक्षक प्रतिसाद देतील ?

: का नाही देणार ? स्ट्रेटफोर्डला शेक्सपिअरची नाटकं अत्यंत निष्ठेनं, दिमाखानं शेक्सपिअरिअन प्रयोगाच्या कल्पनेप्रमाणे,कुठचाही बदल न करता सादर केली जातात आणि ती पहायला जगाच्याकानाकोपऱ्यातून प्रेक्षक येतात. मी जो मघाशी अर्काइव्हचा उल्लेख केला तो सिनेमाला जसा अटळ होतो तसा नाटकाला हवा. जुना 'शेजारी' किंवा 'माणूस' आपल्याला अजून आवडतो. त्या निगेटिव्हज पुसून आपण पोशाख बदलू शकतो ? फुग्याचे झंपर, केसाचे फुगे बदलू शकतो ? का, संवाद बोलण्याची पद्धत आता खूप बदलली आहे म्हणून संवाद 'डब' करतो ? ते जसं होतं तसं आपण टिकवतो आणि ते आपल्याला अजूनही आवडतं. जुनी रंगभूमी टिकायला हवी; टिकवायला हवी ती अशी.

: पण एखाद्या दिग्दर्शकानं नवीन इंटरप्रिटेशन, नवीन कल्पना वापरून ते सादर केलं तर ?

: तो शुद्ध अन्याय ठरेल. आणि त्याला जुनी रंगभूमी टिकवणं असं निदान मी तरी म्हणणार नाही. मोडतोड करून, विकृत अवस्थेत सादर करणाऱ्यांनी निदान आम्ही जुनी रंगभूमी टिकवली, अशी शेखी तरी मिरवू नये.

: ही झाली जुनी नाटकं. आता हल्लीच्या संगीत नाटकांविषयी...

: मुळात 'संगीत नाटक' हा शब्दप्रयोगच चुकीचा आहे. नाटक हे निव्वळ नाटक असते. संगीतिका हा एक प्रकार असू शकतो; तो इथं कधी रुजला जात नाही. पण संगीत नाटक नसतं. आता नाटकात गाणं असतं कशासाठी ? गाणं नाटकात दोन ठिकाणी आलं — संवादाचा भाग म्हणून किंवा स्वगत म्हणून ! संवादाचा भाग म्हणजे, शेकडो उदाहरण देता येतील — 'मानिनी आपुली तुजसी मी एकदा' हे 'संशयकल्लोळा'मध्ये किंवा स्वगत म्हणून 'नाही झाले षण्मास मला राज्य सोडुनी' 'सौभद्र'मध्ये. अशी शेकडो उदाहरणं देता येतील. त्यामुळं गाणं कधी वेगळं पडलं नाही. अर्थ—भाव, वातावरण यात फुलवलेलं गाणं संवादाच्याऐवजी जेव्हा येतं तेव्हा ते आपोआपच नाटकाचा भाग बनतं

: नाट्यसंमेलनात अध्यक्षीय भाषणात तुम्ही असं म्हणालात की, 'कट्यार काळजात घुसली' हे संगीत नाटक नाही.

: अजूनही तेच म्हणतो. नाटकातली पात्रं गाणी गातात किंवा नाटकातील पात्रांना गायकाची पार्श्वभूमी दिली की ते 'संगीत नाटक'

होत नाही. म्हणून मी मधाशी म्हणालो की, 'संगीत नाटक' हा शब्दप्रयोग चुकीचा वापरला जातो.

: मग तुमच्या म्हणण्याप्रमाणे खरंखुर 'संगीत नाटक' कोणतं ?

: ज्या नाटकात माध्यम म्हणून संगीताचा उपयोग केला जातो ते खरंखुरं 'संगीत नाटक !' खरं म्हणजे आता वेगळ्या फॉर्ममधून संगीत नाटकं लिहिली गेली पाहिजेत.

: वसंतराव, जवळजवळ पंचवीस वर्षं नोकरीच्या जाचात अडकल्यामुळं तुमच्यातला गायक उशीरा प्रकाशझोतात आला, आम्हा रसिकांच्या आयुष्यातले काही क्षण हिरावले गेले, याची आम्हाला खंत आहे. तुम्हाला आहे तशी खंत ?

: नोकरीत असताना नव्हती. कारण तेव्हा खूप गाणं शिकायचं, खूप गाणं ऐकायचं, एवढंच डोक्यात होतं; पण आता मात्र जरूर वाटतं की, आपली आयुष्यातली काही वर्षं वाया गेली; पण त्याला इलाज नव्हता. नोकरी करणं भाग होतं, पोटाकरता.

: का ? कलेवरती जगू शकला नसता ? तेवढा आत्मविश्वास नव्हता, की आपल्या प्रतिभेची झेप किती आहे ह्याचा अंदाज नव्हता?

: *आत्मविश्वास* निश्चित होता; पण नोकरी सोडण्याचं डोक्यात आलं नाही. पैशाचा मोह नव्हता. आजही नाही. कलेच्या आनंदाच्या धुंदीत होतो.

: वसतराव कलात्मक आनंदाचा क्षण कोणता ?

: गाताना सुराच्या पाठोपाठ मी जात असतो, ते माझ्याबरोबर असतात. *कलात्मक निर्मिती करत असताना अचानक एक क्षण असा* येतो की, आपण ज्याच्या पाठीमागे आहोत जे विश्व निर्माण करायचा प्रयत्न केला ते मिळालं असं वाटतं. 'जितं मया' म्हणून कलावंत खूष होतो, तो कलात्मक निर्मितीचा आनंद ! मग एक गोंधळाची अवस्था निर्माण होते. आपण चाचपडायला लागतो. मग आपल्यातलंच एक तिऱ्हाइत मन बाहेर येतं आणि सांगतं अलिप्तपणानं, अरे वेड्या, ज्याला तू श्रेष्ठ निर्मितो समजत होतास त्यात हे असं व असं चुकतय, या त्रुटी आहेत. आपल्याला ते जाणवतं; आणि आपण ते सुधारतो; आणि ते जाणीवपूर्वक संस्कार करून पेश करतो. तिथं कला संपते आणि कारागिरी सुरू होते.

: सुंदर !

: वसंतराव एक विचारू का ?

: काय हवं ते विचारा.

: तुम्ही या वर्षी नाट्यपरिषदेचे अध्यक्ष झाला ?

: बर मग...

: नाट्यपरिषदेचा अध्यक्ष व्हायला काही गोष्टी आवश्यक असतात. कर्तृत्व...ते तुमच्याकडे आहे, तो वादाचा मुद्दा नाही. पण...

: पण काय ?

: नुसतं कर्तृत्व असून भागत नाही. मधाळ बोलणं, तडजोडीची वृत्ती, डिप्लोमसी, सगळ्यांना सांभाळून घ्यायचं, सगळ्यांना खुष ठेवायचा प्रयत्न करायचा. यशस्वी होण्याकरता हे सगळं लागतं. तुमच्या अंगी हे गुण आहेत ? तुमच्या स्वभावधर्माशी या गोष्टी जुळतात ?

: नाही.

: तरीही तुम्ही अध्यक्ष झालात.

: यशस्वी व्हायचं म्हणजे काय ? नाट्यपरिषदेची परिस्थिती सध्या अशी आहे, नाही तिला न्युसन्स व्हॅल्यू, नाही पॉझिटिव्ह व्हॅल्यू. अशा परिस्थितीला वर्षाच्या अवधीत अध्यक्ष काय करू शकतो ? उत्सवमूर्तिशिवाय अध्यक्षाला काय कार्य असतं ? ते एक सन्माननीय पद झालंय; आणि ते मी स्वीकारलं. संस्था निरुपद्रवी आहे. मीही तसा उपद्रवी नाही.

: वसंतराव, कलावंताच्या जीवनात घराचं, त्याच्या कुटुंबाचं स्थान काय असतं ?

: खूप मोठं असतं. तुमच्या घरातली माणसं तुम्हाला प्रोत्साहन देत असतात. तुमच्या सुख-दुःखाची वाटेकरी होत असतात. तुमच्यातला कलाकार फुलवत असतात. जिथं घराला घरपण असतं तिथं या गोष्टी असतात; पण जिथ घराला घरपणच नसतं तिथं कलाकार 'विश्वचि माझे घर' म्हणून वावरायला लागतो. वृत्तीनं एकांडा बनतो. सर्व बाजूनी तो फुलत नाही. वैफल्यग्रस्त होतो.

: आणि बऱ्याचवेळा व्यसनांच्या आधीन होतो. वसंतराव कलावंताची व्यसनं आणि चारित्र्य याच्याशी समाजाला काही कर्तव्य असावं का ?

: सबब काय ? व्यसन किंवा चारित्र्यशून्यता याचं जस्टीफिकेशन मी देत नाही; पण व्यसन किंवा ढिलं चारित्र्य यांचा मक्ता काय कलावंतांनाच दिलाय ? आणि बाकीचा सारा समाज सत्शील आहे? कलावंत प्रकाशाच्या झोतात असतो म्हणून केवळ त्याचा गाजावाजा होतो. जोपर्यंत कलावंताचं व्यसन आणि चारित्र्यशून्यता त्याच्या कलेच्या सादरीकरणाच्या आड येत नाही, तिचा दर्जा घसरत नाही, तोपर्यंत समाजाला त्याची दखल घ्यायचं कारण नाही. हा तोल दुसऱ्यांनी सांभाळायचा नसतो. आपला आपण सांभाळायचा असतो. आपल्यातल्या कलेचा ऱ्हास होऊ न देता आपल्याला जे आणि जितकं झेपतं ते आपण करावं आणि ते आपल आपण ठरवावं.

: वसंतराव, 'प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री उभी असते' असं म्हणतात. तुम्ही अमाप यश मिळवलंत. तुमचा काय अनुभव ?

: होती. माझ्याही आयुष्यात एक स्त्री माझ्या पाठीमागे उभी होती. आज मी जो आहे, जसा आहे तो केवळ तिच्यामुळे. (क्षणभर स्तब्धता) तुला ती कोण ते समजून घ्यायचंय? तो...ती...माझी आई!

वसंतरावांच्या डोळ्याच्या कडा मला ओलावल्यासारख्या वाटतात. वेगवेगळे भाव आणि सूर नजरेत तरळायला लागतात. पुढं काही विचारायला माझ्यापाशी प्रश्नही नसतो आणि शब्दही नसतात ! □

# राहू–केतू

तुम्ही जेम्स हॅडले चेस वाचता? किंवा जेम्स बाँडचा सिनेमा पाहता? किंवा इंग्रजी भाषेचा विनयभंग करण्याची इच्छा नसल्यामुळे गुरुनाथ नाइकांची एखादी धुरंधर–कथा वा गरुड–कथा वाचता का? तर या साऱ्यांमध्ये ज्याप्रमाणे तुम्हाला विचार करायलाही अवसर मिळणार नाही, अशी चोख व्यवस्था करून धडाधड एकामागोमाग एक गोष्टींचा डोळ्यांवर आणि डोक्यावर मारा केलेला असतो, एखाद्या वाद्यवृंदात-ड्रमसेटच्या कडकडाटात मधूनच एखाद्या थाळीचा बँग वाजावा त्याप्रमाणे अनपेक्षित घटनेचा धक्का दिलेला असतो. तसेच, अगदी तस्सेच ‘रंगधारा’ निर्मित ‘राहू–केतू’ हे नाटक आहे, या मूळ गुजराथी नाटकाचे लेखक आहेत अनिल मेहता. मराठी रूपांतर केले आहे सुरेश प्रिप्रोडिया यांनी.

नाटक सुरू होते.

डॉ. फाटकांचा दवाखाना. दवाखान्याच्या मध्यभागी असलेल्या टेबल–कम–स्ट्रेचर ट्रॉलीवर एक पांढऱ्या चादरीने झाकलेला मुडदा. डॉ. फाटक (विलास राज) आधी घडलेल्या अपघातात मृत्यू पावलेल्या त्या इसमाच्या प्राथमिक तपासणीची नोंद करताना दवाखान्याबाहेर खाडखाड सॅल्यूट झडतात. पोलिस गणवेशात टाक–टाक–टाक बूट वाजवीत इन्स्पेक्टर पितळ्यांचा (विक्रम गोखले) दवाखान्यात प्रवेश. खास पोलिसी खाक्यात पितळे डॉक्टरच्या काही वेळा फिरक्या ताणत मुडदा तपासतात आणि तो त्यांना हव्या असलेल्या कुप्रसिद्ध स्मगलरचा–जॅक डॅनियलचाच (रमेश भाटकर) असल्याची खात्री करून घेतात. मुडदा करोनरकडे पाठविण्याची सूचना देऊन इन्स्पेक्टर पितळे जातात आणि मुडदा उठून बसतो. धक्का ‘क्र.’ एक.

या पहिल्या धक्यानंतर सुरू होतो तो एक जीवघेणा उंदीर-मांजराचा खेळ. फक्त हा खेळ खेळणारे दोन कोल्हे असतात–एक इन्स्पेक्टर पितळे तर दुसरा जॅक डॅनियल. जॅकने बँकेवर घातलेल्या दरोड्यात लुटलेल्या पन्नास लाखांचा माल हडप करण्यासाठी एकमेकांवर कुरघोडी करण्याचा दोघांचा प्रयत्न चालू असतो. गुरुनाथ नाइकांच्या कॅप्टन दीप–अलिबाबाप्रमाणे पितळे–जॅक डॅनियलही एकमेकांचे वंशपरंपरागत वैरी. या दोघांच्या उंदीर–मांजर खेळात सुरवातीच्या धक्क्याप्रमाणे इतरही बरेच अपेक्षित आणि अनपेक्षित धक्के बसतात.

या सर्व प्रकरणामध्ये प्रेक्षकाला आपले नाक खुपसता येणार नाही, इतका वेग लेखक अनिल मेहतांनी ठेवला आहे. सुरवातीला आपल्यावर ज्या पद्धतीने प्रतिस्पर्ध्याने मात केली असेल, तीच परिस्थिती त्याच्यावरच उलटविण्याची नाट्यमयताही लेखकाने तोलून–मापून टाकली आहे. या दोन गोष्टींच्या जोरावरच एखाद्या एकांकिकेत बसावे इतके छोटे कथाबीज तीन अंकांपर्यंत वाढवूनही कंटाळवाणे ठरत नाही.

या सगळ्यात एकच मूलभूत घोटाळा राहतो, तो इन्स्पेक्टर पितळ्यांच्या मुडदा–तपासणीचा. हा इन्स्पेक्टर आपले अर्धे आयुष्य पोलीस खात्यात काढलेला मुरब्बी अधिकारी. अनेक वेळा त्याच्या हातावर तुरी देऊन पळालेला अट्टल गुन्हेगार प्रेत बनून का होईना, समोर आल्यानंतर पितळे लीलया त्या गोष्टीवर विश्वास ठेवील, हे संभवत नाही. (अर्थात त्याबद्दल अविश्वास व्यक्त करणारे उल्लेख नाटकात पुढे पितळेच्या तोंडी वारंवार आहेत.) तर पितळेची त्या मुड्याच्या खरेपणाबद्दल खात्री पटविण्यासाठी डॉ. फाटक काही शास्त्रीय क्लृप्त्या योजतो, असे नाटकात दाखवले आहे. उदाहरणार्थ–जॅक डॅनियलच्या हाता-पायांना एथिल् क्लोरॉइड फासल्यामुळे त्याचे हातपाय नंतर सुमारे अर्धा ते पाऊण तास थंड राहतात आणि नाडीही बंद पडते. तर ही एक मोठी शेंडी आहे. माणसाच्या मरणाची खात्री होण्यासाठी मेंदू, हृदय आणि फुप्फुसे या तीन महत्त्वाच्या अवयवांची (Vital organs) क्रिया कमीत कमी सलग पाच मिनिटे बंद पडावी लागते.

जॅक डॅनियलच्या प्रेताची तपासणी करणारा इन्स्पेक्टर पितळे त्याच्या नाडीची अत्यंत जुजबी तपासणी करून अन्य गोष्टींकडे, मुख्यतः श्वसनाकडे दुर्लक्ष करील, हे पटण्यासारखे नाही. दुसरे म्हणजे एथिल् क्लोराइडमुळे शरीराचा पृष्ठभाग थंड होतो हे खरे; पण हा परिणाम फारच थोडा वेळ (दीड ते दोन मिनिटे) टिकणारा आहे; म्हणूनच त्याचा वापर छोट्या छोट्या शस्त्रक्रियांमध्ये (उदाहरणार्थ – तपासणीसाठी तुकडा तोडून घेणे, गळू फोडणे) local anaesthetic (स्थानिक बधिरीकारक) म्हणून वापरले जाते. त्यामुळे शरीर एथिल् क्लोराइडमुळे तीस–चाळीस मिनिटे बर्फासारखे गार पडते, हे संपूर्ण चूक गृहित आहे.

हे सगळे लिहिण्यामागील उद्देश नाटकातील शास्त्रीय अवास्तवता पटविण्याचा नाही. ही अवास्तवता काढून टाकतानाच इन्स्पेक्टर पितळेच्या व्यक्तिचित्रणाला एक वेगळाच रंग भरता आला असता. जॅकचे पन्नास लाख रुपये हडप करण्यासाठी पितळेच जॅकचा मृत्यू घडल्याच्या घटनेवर विश्वास बसल्याचे नाटक करतो आणि त्याच्या या नाटकामुळे बेसावध बनलेल्या जॅकच्या मागावर राहून अलगद पन्नास लाखांचे लोणी घशात घालण्याचा प्रयत्न करतो, असा बदल एथिल् क्लोराइडच्या जागी टाकला तर? अर्थात असा बदल करणे न करणे ही अखत्यारी लेखकाच्या हाती आहे; पण लेखकानेच पितळेचा त्या घटनेवर विश्वास नसल्याचा वारंवार उल्लेख पुढे केलेला असल्यामुळे हा बदल सुचवावासा वाटतो. या बदलामुळे पितळेचा धूर्तपणा अधिकच गहिरा बनतो. याहूनही मागे जायचे असल्यास पन्नास लाख रुपये हडप करण्यासाठीच पितळे बँकेच्या पहाऱ्यात कुचराई करून काही छिद्रे शिल्लक ठेवतो आणि जॅकला हा प्रचंड दरोडा घालण्याची संधी देतो, अशीही पुष्टी या बदलाला जोडता येईल.

असो. संहितेतील हा मोठा शास्त्रीय दोष वगळल्यास ती प्रेक्षकाला पुरेशी खिळवून ठेवणारी आहे, हे नक्की. या खिळेमारीमध्ये दिग्दर्शक अरविंद जोशी, संगीतकार सरोश भाभा आणि अभिनेत्यांचा वाटाही फार मोठा आहे.

विक्रम गोखल्यांनी निवृत्त होण्यापूर्वीचा इन्स्पेक्टर पितळे आणि निवृत्तीनंतरचा श्रीयुत पितळे अत्यंत आबात उभा केला. विशेषतः जॅक डॅनियलची भूमिका करणाऱ्या रमेश भाटकरांच्या आत्यंतिक नाटकी अभिनयामुळे, तर विक्रम गोखल्यांचा संयमित अभिनय फारच प्रभावी वाटतो. आपण हिंदी चित्रसृष्टीतील सुपरस्टार आहोत, ही मनातील भावना काढून टाकून भाटकरांनी अभिनय केल्यास त्यांचे काम याहूनही चांगले होईल. विलासराज यांनी सादर केलेला डॉ. फाटकही लक्षात राहण्यासारखा. नाटकातील तिसरे प्रमुख पात्र – रोझी – जुइली देऊसकरांनी आडवे केले; त्यामुळे त्यांचा अनुल्लेख केलेलाच बरा.


बाँडचा सिनेमा वा गुरुनाथ नाइकांचे पुस्तक जसे त्यातील खरेखोटेपणाचा वा शक्याशक्यतेचा विचार न करता मी पाहतो वा वाचतो, तसेच मी हे नाटक पाहिले.

—सदानंद बोरसे

## खुलासा

दि. २४ एप्रिल १९८२ च्या अंकात 'संगीत पंचनायिका' या नाटकावरील लेखात हे नाटक दूरदर्शनवर वेगळ्या स्वरूपात सादर झाल्याचा मी उल्लेख केला होता. दूरदर्शनवर श्रीमती लीला फणसळकर यांची मूळ कल्पना असलेले आणि श्री. कमलाकर नाडकर्णी यांनी शब्दांकित केलेले 'समस्या पंचक' हे ते नाटक होय; 'संगीत पंचनायिका' नाही.

---




# जंपींग जॅक कमलहासन

## पुन्हा प्रश्नचिन्ह ?

'सनम तेरी कसम' प्रदर्शित होण्याचा दिवस जसजसा जवळ येत चालला होता, तसतशी चित्रपट व्यावसायिकांच्या वर्तुळात आणि सिनेपत्रकारांच्या घोळक्यातही उत्सुकता वाढू लागली होती. दक्षिणेतून आलेला नवा हिरो कमलहासन खरोखरीच हिंदीत चालणार की नाही ?

त्याचा पहिलाच चित्रपट 'एक दूजे के लिए' चालला होता की ! हिंदीत ब्रेक तर जबरदस्त मिळाला. आता काय आणखी ? असं कुणी पटकन् म्हणेलही. सर्वसाधारणपणे पहिलाच चित्रपट चालला, तुफान चालला की, संबंधित नवा हिरो, नवी हिरॉइन, नवा निर्माता किंवा नवा दिग्दर्शक सुटकेचा निःश्वास टाकतो की बुवा, लाइन क्लियर !

पण हे समाधान फसवं असतं. कारण खरा धोका तेव्हाच निर्माण झालेला असतो. उंच शिखरावर उभे असतात नं ! एकाच चित्रपटाच्या यशानंतर एकाएकीच त्या व्यक्तीचं एक स्थान निर्माण होतं. लोकांच्या आणि त्याच्या स्वतःच्याही अपेक्षा एकाएकी उंचावतात, वाढतात. कधीकधी स्वतःविषयी गोड गैरसमजही निर्माण होतात. दुसरा चित्रपट येईपर्यंत हे तेजोवलय कायम राहतं आणि मग निर्णय देऊ लागतात एका पाठोपाठ दुसरा, तिसरा चित्रपट. त्या कलाकारानं त्या क्षेत्रात राहायचं की नाही, आधी लाभलेल्या उंचीवर तो टिकणार की नाही, हे दुसरे–तिसरे चित्रपट ठरवू लागतात.

कमलहासनच्या बाबतीत तर आणखी एक गोची. तो दक्षिणेतला एस्टॅब्लिश्ड स्टार. म्हणजे हिंदीत पदार्पण करून ते टिकवणं एक प्रकारे प्रतिष्ठेचा प्रश्न झालाच. त्यात 'एक दूजे के लिए' मध्ये त्याला सोयिस्कर अशी दक्षिण भारतीय तरुणाची भूमिका दिलेली. भाषांचा अडसर तोडून आलेला प्रेमाचा पूर म्हणजे 'एक दूजे के लिये'.

'एक दूजे के लिए' आणि 'लव्ह स्टोरी' हे चित्रपट चालले ते त्यातल्या रोमान्सच्या ताजेपणामुळे आणि सुरेल संगीतामुळे. ढिशुम ढिशुमच्या गदारोळात अचानक बऱ्याच दिवसांनी थोडा वेगळा, हळूवार फॉर्म्यूला प्रेक्षकांना पाहायला मिळाला होता. नवे चेहरे होते आणि ते धर्मेन्द्र–अमिताभ आणि झीनत–हेमाइतके निबर नव्हते. ह्या गोष्टींचा फायदा चित्रपटाच्या ह्या नव्या कलाकारांना मिळाला. पहिलाच चित्रपट चालला. म्हणजेच 'ब्रेक जबरदस्त मिळाला!'

पण एवढंच ! कारण 'लव्ह स्टोरी'च्या विजयिताला यापलीकडे कसलाच फायदा झालेला नाहीय. कुमार गौरवला वडचा बापाचं एक परिमाण लाभलेलं होतंच. शिवाय त्यानं कामही खरोखरीच चांगलं केलं होतं. त्याला अनेक चित्रपट मिळाले.

### उंचावलेल्या अपेक्षा

रति अग्निहोत्रि आणि कमलहासन दक्षिण भारतीय चित्रपटात आधीच एस्टॅब्लिश्ड स्टार्स होते. कमलहासनचे तर शंभरावर दक्षिणी चित्रपट झालेले. तिथे आपल्या इथल्या जितेन्द्र-प्रमाणेच त्याची डान्सिंग–जंपिंग जॅकची इमेज तर होतीच, त्याच्या काही गंभीर भूमिकाही गाजल्या होत्या आणि गाजल्या त्या इतक्या की, त्याच चित्रपटांचे हिंदी रीमेक झाले 'रेड रोज' आणि 'सोलहवाँ सावन'. अर्थात हिंदीत ते चालले नाहीत. मग मुळातल्या दक्षिणी चित्रपटांशी त्यांची तुलना होऊ लागली. दक्षिणी आणि हिंदी नायकांचीही त्याबरोबर तुलना झाली. 'कमलहासन में जो बात थी वह 'रेड रोज' के राजेश में नहीं यार !' असं बोललं जाऊ लागलं. अर्थात दक्षिणी आवृत्ती चालण्याला आणि हिंदी आवृत्ती न चालण्याला त्या त्या प्रेक्षक वर्गाच्या भिन्न भिन्न अभिरूचीही कारणीभूत असतात; तसच दक्षिण भारतीय चित्रपटांच्या अभिनयाचा

एकूणच घाट हिंदीतून वेगळा असतो. ह्या गोष्टी आपण सोयिस्करपणे विसरतो. तर ह्या सर्व पार्श्वभूमीवर कमलहासनविषयीच्या अपेक्षा उंचावतच गेल्या.

त्यातून कमलहासन हा चागला नर्तक आहे. नुसता जांपिंग जॅक नाही, तर भरतनाट्यमचं शास्त्रीय ज्ञान असलेला, नृत्याचा रियाज केलेला असा आहे. दक्षिण भारतीय चित्रपटातून बालकलाकार म्हणून सुरुवात केल्यानतर त्यानं नृत्य-दिग्दर्शक म्हणूनही कामगिरी बजावलेली आहे. एम. जी. रामचंद्रन्, शिवाजी गणेशन्, जेमिनी गणेशन्सारख्या वर्षानुवर्षं लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ असलेल्या नायकांना नृत्य-दिग्दर्शन केलेलं आहे. 'एक दूजे के लिए' मधल्या त्याच्या नृत्यलीला पाहून साहजिकच सवाल खडा ठाकला की, हिंदीत हा जितेंद्रचा स्पर्धक म्हणून उभा राहणार काय? जितेंद्रचं कसं होणार? गंमत म्हणजे मधला काही काळ रिकामा गेल्यानंतर जितेंद्र याच सुमाराला पुन्हा आपले पदन्यास करीत अवतरला होता, एवढंच नव्हे तर कमलहासनच्या दक्षिणी भूमीवर-मद्रासच्या हिंदी चित्रपटांचा हुकमी हीरो म्हणून-स्थिरावला होता. इकडे कमलहासनचे दोन्ही नवे चित्रपट त्याच्या डान्सिंग इमेजचा वापर करून घेणारे होते-बरखा रायचा 'सनम तेरी कसम' आणि राजकुमार कोहलीचा 'राजतिलक'.

तेव्हा ह्या साऱ्या उलट-सुलट चर्चांच्या -आणि हो, चर्चेत राहाणं हे महत्त्वाचं-फायदेशीर वातावरणात कमलहासन अवतरला. आता मात्र प्रश्न इथे टिकण्याचा आणि कमलहासनच्या बाबतीत नव्या चित्रपटातून चागलं हिंदी बोलण्याचा. कारण प्रत्येक चित्रपटात तामिळ बोलणाऱ्या वासूचीच भूमिका असेल असं नाही काही!

## संवादाचा टॅपो हवा

'सनम तेरी कसम' च्याच एका डिस्कोच्या सेटवर त्याच्याशी गाठ पडली असता, मुद्दाम हा भाषेचा विषय काढला.

त्यावर त्याचं म्हणणं, 'दक्षिण भारतातल्या चारही भाषांच्या चित्रपटांतून मी कामं केली आहेत तामिळ, कन्नड, तेलगू आणि मल्याळम्. मल्याळम् भाषा तर बोलायला फार अवघड असते. तीही मी आत्मसात केली, मग हिंदी तर त्या मानानं खूपच सोपी आहे."

अर्थात हे सगळं कमलहासन इंग्रजीतूनच बोलत होता. ह्या सुमाराला त्याच्या दोन्ही हिंदी चित्रपटाचं चित्रीकरण चालू होतं; पण हिंदीत बोलायचा सराव करण्याची चांगली संधी मात्र हे महाशय चक्क वाया दवडीत होते!

'वाजीनं तुम्हाला हिंदी शिकवलं की *नाही?' त्याची पत्नी वाजी* गणपती तामिळी असली तरी मुबईत वाढलेली आहे. ह्यावर गमतीने पुन्हा इंग्रजीत त्यानं जबाब दिला, 'वाणीला मी तामीळ शिकवलं. त्यामुळं माझी शिकवणी तशीच राहून गेली.'

आता 'सनम तेरी कसम' मध्येच त्याच्या हिंदीची कसोटी लागणार होती. ह्या चित्रपटात नायकाचं नाव आहे सुनील शर्मा. एका दृश्यात तर नायक-नायिका आपलं मनोगत पंजाबीत (म्हणजे त्याच्या मातृभाषेत) बोलतात आणि मग अशा ह्या हिंदी बोलणाऱ्या पंजाबी तरुणाच्या भूमिकेत कमलहासनचे उच्चार, त्याच्या संवादाचा टेंपो खटकल्याशिवाय राहात नाही. इथे कमलहासनच्याकडे अपेक्षेनं पाहणाऱ्या प्रेक्षकाला पहिला धक्का बसतो.

तसच भावदर्शनाच्या बाबतीतही तो अजून दक्षिण भारतीय अभिनयाच्या पठडीतून बाहेर आलेला दिसत नाही. प्रादेशिक चित्रपटात 'स्टारडम'ला पोहोचला म्हणजेच एखादा हीरो हिंदी चित्रपटात कायमचा चमकत राहीलच असं नाही. इतिहासाची साक्षच काढायची झाली तर उत्तम उदाहरण आहे बंगालच्या उत्तमकुमारचं. बंगाली चित्रसृष्टीचा हा अनभिषिक्त बादशहा जेव्हा जेव्हा हिंदी चित्रसृष्टीत आला, तेव्हा तेव्हा त्याला निराश होऊन परतावं लागलं. सदोष हिंदी उच्चारांवर त्याला विजय मिळवता *आला नाही. हिंदी चित्रसृष्टीतला त्याचा* पहिला पराभव त्याच्या ह्या उच्चारांमुळेच झाला. कदाचित ह्या सततच्या जाणिवेमुळे भावदर्शनावरही तो एकाग्र होऊ शकला नाही. उत्पल दत्त ह्या चरित्रअभिनेत्याप्रमाणे तो आपल्या बंगाली हिंदी उच्चारांनी गंमतही निर्माण करू शकला नाही.


आणि आजच्या पंजाबी बहुल हिंदी चित्रपटसृष्टीत पंजाबी घाटाचं हिंदी बोलणारे नायक जरी खपवून घेतले जात असले तरी बंगाली, मराठी किंवा दक्षिण भारतीय थाटाचं हिंदी नेहमीच आणि प्रत्येक भूमिकेत खपवून घेतले जात नाही. कटु असलं तरी हे सत्य आहे.

## भरतनाट्यम्चं नवं रूप

'सनम तेरी कसम'च्याच सेटवर एक गोष्ट लक्षात आली होती. नृत्यदिग्दर्शक सुरेशने दाखविलेली नृत्याची प्रत्येक हालचाल कमलहासन तत्काळ विनासायास आत्मसात करीत होता. रीटेक झालाच तर तो इतर कारणांमुळे — रीना, ज्यूनियर आर्टिस्टस्, लायटिंग वगैरेंमुळे होत होता. नृत्यातला त्याचा स्टॅमिनाही आश्चर्यकारक होता. अर्थात त्याच्या नृत्यनैपुण्याबद्दल प्रश्नच नाही. 'एक दूजे के लिए' मधली त्याची पहिली भूमिका ही नृत्यप्रधान होती, त्यात भरतनाट्यम्ही होतं आणि अत्यानंदाच्या भरात नृत्याच्या सीमा ओलाडून केलेली सर्कसही होती. आता तर 'सनम तेरी कसम'ची श्रेयनामावलीदेखील कमलहासनच्याच लवलवणाऱ्या कट-आउट्सवर येत राहते.

*पण प्रथम 'एक दूजे के लिए' आणि* नंतर 'सनम तेरी कसम' पाहताना जाणवलं ते असं की, लोकांना डिस्कोचा धांगडधिंगा आवडतो, त्याच्या वेगवान हालचालीची नशा चढतेय, हे पाहून कमलहासननं नृत्याच्या कमनीय मर्यादा चक्क ओलाडल्या आहेत. तो नृत्यदिग्दर्शक होता, की सर्कसपटू, असा संशय मनात दाटू लागला आहे. 'सनम तेरी कसम'मध्ये तर 'जाना ओ मेरी जाना' डिस्को नृत्यात मध्येच रंगमचावर लाल मखमलीनं मढवलेले स्टँड आणून ठेवले जातात आणि मग कमलहासन त्यावर नादिया कोमानेच स्टाइलमध्ये जिम्नॅशियम-सॉरी, नाच-करतो. म्हणजे त्याला स्वतःला आणि त्याला नाचविणाऱ्यानाही ह्या सर्कशीची आणि जिम्नॅशियमची जाणीव आहे तर! त्याच्या ह्या दाणगट नृत्यात आणि जितेंद्र व ऋषिकपूरच्या मोहक नृत्यशैलीत हाच मुख्य फरक आहे.

'एक दूजे के लिए' मध्ये त्याच्या भरतनाटयम् नैपुण्याचा वापर करून घेण्यासाठी सिचुएशन टाकली-वासू आपली प्रेमनिराशा विसरण्यासाठी किंवा तिला आउटलेट देण्यासाठी म्हणा, भरतनाट्यम् करू लागतो.



कमल हासन : दक्षिणी उत्तमकुमार

पूर्वीच्या काही आदर्शवादी कादंबऱ्यांतून प्रेमभंग झालेले नायक, नायिका स्वतःला समाजसेवा, स्वातंत्र्यचळवळ वगैरेंमध्ये झोकून देत. त्याचाच हा कलात्मक आविष्कार का ? पूर्वीच्या चित्रपटांतून भग्न हृदयी नायक दर्दभरं गाणं म्हणायचा, व्हायोलिनवर आर्त सूर छेडायचा किंवा स्वतःला दारूमध्ये बुडवून घ्यायचा किंवा संधी असलीच तर स्वतःविषयी बेपर्वा होऊन आघाडीवर जान-कुर्बान करायला निघून जायचा. कुणा पंजाबी हिरोनं प्रेम-निराशेच्या भरात भांगडा केलेला मात्र आठवत नाही.

'सनम तेरी कसम' ची निर्मिती बरखा राय आणि दिग्दर्शक नरेंद्र बेदी ह्यांच्यावर कलम हासनच्या भरतनाटचमचं चांगलंच दडपण आलेलं दिसतंय. त्यामुळेच ओढून ताणून आणलेल्या हिजड्यांच्या जल्लोषात त्यांनी कमलहासनच्या भरतनाटचमला जागा करून दिली. हो ! डिस्कोच्या गोंधळात भरतनाटचम्च्या थोर परंपरेला आपण विसरलो, असं व्हायला नको.

### चॉकलेटी चेहरा हवा

'सनम तेरी कसम' ह्या चित्रपटाचा फॉर्म्युला आहे तो नासिर हुसेन ह्यांच्या मनोरंजनप्रधान चित्रपटांचा. डोलायला लावणाऱ्या संगीतावर थुई थुई नाचणारा, रंगी-बेरंगी फुला-फुलपाखरांच्या हिरव्यागार काश्मिरी निसर्गाच्या अंगाखांद्यावर बागडणारा गोड गोड नायक-नायिकेचा गोड गोड प्रणय. चटणीसारखे अगदी तोंडी लावण्यापुरते अडथळे. बस ! ह्या अशा गोड गोजिरवाण्या विश्वाचा नायकही कसा चॉकलेट चेहऱ्याचा हवा नं ! 'जब प्यार किसीसे होता है' चा देव आनंद ह्या आनंदी जगातला खरा आदर्श पुरुष. त्याचं प्रसन्न व्यक्तिमत्त्व, निर्विवाद सुंदर चेहरा आणि उमदेपणा, त्याच्या अदा हे ह्या चित्रपटाच्या भांडवलाचा एक भाग ठरतो. देवच्या लोभसवाण्या अदा नसल्या तरी हैदोस घालण्याची शम्मी कपूरची पेटंट अदा सुद्धा 'दिल देके देखो', 'तुमसा नहीं देखा', 'जानवर'-सारख्या चित्रपटांतून लोभसवाणी ठरली ती अजोड संगीताची जोड मिळाल्यामुळे.

कमलहासन ह्या दोन्ही बाबतीत दुर्दैवी ठरू पाहतो आहे. हिंदी चित्रपटाच्या हिरोचा चेहरा त्याच्याजवळ नाही. हा चेहरा वारंवार दक्षिण भारतीय तोंडवळ्याचीच आठवण करून देतो आहे. नृत्यकौशल्य आहे, पण त्याला साथ देणारं सुंदर संगीतही त्याला लाभलं नाही. उलट नृत्यकौशल्याचा अतिरेक आणि गैरवापरच करण्याकडे त्याचा कल दिसून येतो आहे.

नासिर हुसेन थाटाच्या त्याच्या ह्या दुसऱ्या चित्रपटाला नासिर हुसेनी थाटाचं संगीत तर लाभलेलं नाहीच, त्या संगीताबरोबर झाडा-फुलांना, झऱ्या-पाहाडानाही गायला लावणार नयनरम्य छायाचित्रणही लाभलेलं नाही. ह्या अशा कोंदणात जाऊन बसल्यामुळं, दुसऱ्या चित्रपटाच्या सहाय्यानं खुंटा हलवून बळकट जो करायचा, त्याऐवजी पुन्हा एकदा कमलहासनच्या हिंदी चित्रपटसृष्टीतल्या अस्तित्वावर आणखी एक प्रश्नचिन्ह ठळकपणे मांडलं गेलेलं आहे.

—रेखा देशपांडे

---

## मुक्काम मुंबई

पृष्ठ ३ वरून

**भारतातल्या मुसलमानांबद्दल तुमचं काय मत आहे ?**

भारतातल्या मुसलमानांना गीता म्हणजे काय हे तर सोडाच, पण इस्लाम म्हणजे नेमकं काय, हेही फारच थोड्या जणांना कळलं आहे. एक तर अरबी भाषेचं अज्ञान—यामुळं बहुतेक कुणी कुराण मुळातून वाचलेलं नाही. भारतातल्या काही मुल्ला-मौलवींची प्रवचनं मी ऐकली, तेव्हा माझ्या हे लक्षात आलं. लखनौच्या एका विद्वान मानल्या जाणाऱ्या मौलवीशी मी वाद घातला, तर त्याची साफ भंबेरी उडाली.

रावणारी दासांचे मुसलमानांबद्दलचे आक्षेप ठीक असतीलही कदाचित्; पण हिंदूंची तरी याहून वेगळी अवस्था थोडीच आहे ? संस्कृतातली गीता किंवा तिचं मातृभाषेतलं भाषांतर शेकडा किती टक्के लोकांनी वाचलं असेल ? काही असेल तर तो नीटसा समजून न घेतलेल्या परंपरेचा अभिमान, अर्थ समजून न घेता ठेवलेली धर्मावरची अंधश्रद्धा आणि जमेल तिथे कर्मठपणा. आजचे आम्ही हिंदू पूर्वीच्या पिढीइतके धार्मिक का नाही ? किंवा आमचे धर्मग्रंथ वाचायलाच हवेत, असं आम्हाला मनापासून का वाटत नाही ? याची कारणं बरीच आहेत; पण साधारण दोन शीर्षकांखाली ती जमा करता येतील. एक म्हणजे, आळस, अज्ञान, अनास्था, वेळेचा अभाव इत्यादी इत्यादी. दुसरं म्हणजे, या गोष्टी वाचून आपलं आयुष्य घडवता येईल यावरचा गाढ अविश्वास आणि त्यातून वाटणारी अशा वाचनाची अनावश्यकता. स्वतः सोडून केवळ कल्पनेत असणाऱ्या एखाद्या परमेश्वराला शरण जाणे, आपल्या स्वतःच्या कर्तृत्वापेक्षादेखील अखेर कर्ता-करविता तोच आहे, हे जग त्याच्याच इच्छेने चालतं असं मानणं, अशा प्रकारच्या विचारसरणीला निक्षून विरोध करणारा आणि केवळ स्वतःवर आत्मविश्वास आणि आपल्या मनगटाची ताकद यावर विश्वास ठेवणारा सुज्ञ विचारवंतांचा एक मोठा गट आज समाजात आहे आणि उत्तरोत्तर तो वाढीला लागतो आहे. धार्मिक रूढी आणि रिवाज, कर्मकांडे, निर्बंध यांना त्याचा विरोध आहे.

कारण कर्मकांडात गुरफटून वाट चुकलेल्या समाजाचा इतिहास आजही जिवंत आहे. म्हणूनच ज्याची तत्त्वं अथवा आचरण, माणसाची समानता, कार्यशीलता आणि आत्मविश्वास धोक्यात आणतील असा धर्म, जीवनाचा मूल-स्रोत–ड्राईव्हिंग फोर्स असावा, असं वाटत नाही.

## सगळंच वरवरचं

तशातही परकीयांनी येऊन आपल्या धर्माचा, तत्त्वज्ञानाचा उदो-उदो करावा आणि आपण विस्फारलेल्या नजरानी हुरळून जाऊन 'साहेब बाकी खरा गुणग्राहक हो!' असं म्हणावं हा तर भोळसटपणा झाला! आपल्या समाजाच्या भौतिक समृद्धीला कंटाळून, रुचि-पालट म्हणून खास 'ओरिएण्टल' नाही तर 'स्पिरिच्युअल' गोष्टीकडे वळणारे, नाही तर चरस, गांजाहूनही अधिक चढणारी अफूची गोळी म्हणून धर्माकडे वळणारे हे परकीय म्हणजे न पेलणारी समृद्धी आणि आयुष्याकडे पाहण्याची नितांत निराशावादी वृत्ती, जबाबदारी टाळण्याचा भेकडपणा या साऱ्याचं मूर्तिमंत उदाहरण. लांबलचक शेंड्या, तुळ-तुळीत गोटे आणि भगवी धोतरं, अस्ताव्यस्त साड्या नेसलेल्या गौरांगना, रस्त्यावरून देहभान हरपून भजनं म्हणत टाळ कुटत चाललेले लख्ख गोरे थवे, नाही तर गजबजत्या रस्त्यात सिग्नलच्या क्रॉसिंगला नेमकं अडवून पुस्तकं गळ्यात मारणारे हे भक्तजन. तर कधी भांगेच्या तारेत देहभान विसरून समुद्र-किनाऱ्याला सापडणारे भक्तजन. गळ्यातल्या छोट्या पिशवीत जपमाळ ठेवून येता जाता मणी ओढणारे आणि बोलताना 'नमस्ते' किंवा 'हॅलो' ऐवजी 'हरेकृष्ण' म्हणणं इत्यादी वरवरच्या आणि तथाकथित सात्त्विक गोष्टी करणारे. सात्त्विक चीड सोडून याच्याबद्दल दुसरं काय वाटणार?

अशा गणगाबद्दल असा संताप खदखदत होता, तेव्हाच इस्कॉनमधल्या दोन अधिकाऱ्यांची भेट झाली. थोडं थबकावंसं वाटलं. एक होते डॉक्टर मार्चेटी उर्फ माधवदास. दुसरे मूर्तिदास अधिकारी. यांचं मूळ नाव काय कोण जाणे. हे दुसरे सोसायटीचे आर्कि-टेक्ट. दोघंही जण उच्चविद्याविभूषित. छाप पडेल अस देखणं आणि भारदस्त, विचारानं प्रौढ झालेलं व्यक्तिमत्त्व. अगदी सात्त्विक तेज इत्यादी भारावणाऱ्या वस्तु नाहीत खऱ्या; पण विद्या, ज्ञान या साऱ्यानं वागण्या–बोलण्याला आलेलं गांभीर्य, शांत भाव आणि गहराई. एरवी या माणसांशी कौतुकानं, आदरानं बोललो असतो, त्याच्याशी वेव–लेंग्थ जुळली असती, कम्युनिकेशनही शक्य झालं असत. अशा या आपल्याच वाटणाऱ्या माणसानं शरणागती का पत्करावी? आपला देश, सगेसोयरे सोडून इथवर एकटं का यावं? जगण्याची एवढी उत्तम साधनसामुग्री जमवलेल्या या गृहस्थानं आपल्या देशातच राहून, आपल्या स्वत:च्या मनाला साक्षी ठेवून प्रामाणिकपणे इहलौकिक आणि भौतिक यशाचा पाठपुरावा का करू नये? रस्त्यावर बेभान होऊन नाचणाऱ्या हरेकृष्ण पंथीयाला मी हा प्रश्न विचारणार नाही; पण या डॉ. मार्चेटी, मूर्तिदास अधिकारी यासारख्यांना तो प्रश्न नक्कीच विचारायला हवा. त्याचं स्पष्टीकरण त्यांनी करायलाच हवं.

या दोघांच्या बोलण्यात प्रकर्षानं काय जाणवलं तर सहजपणा किंवा नॉन–चॅलन्स. त्यात ठामपणा होता, पण आविर्भाव नव्हता. आग्रह होता, पण दुराग्रह नव्हता. त्यांचा सरळपणा तर हैराण करणारा, चातुर्वर्ण्य इत्यादी गोष्टींचं त्यांनी समर्थन करायला सुरुवात केली. तेव्हा मी त्यांना अडवलं. 'माणसा–माणसामधल्या समानतेचं काय?' –मी विचारलं.

'समानता आहेच की. चातुर्वर्ण्य ही केवळ सोयिस्कर अशी समाजरचना आहे. 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्, गुणकर्मविभागश:' असं श्रीकृष्णानं म्हटलच आहे. तेव्हा सग-ळ्याच्या आवडीला आणि लायकीला रुचेल अशी ही पद्धत आत्तादेखील चालू ठेवायला हरकत नाही.'

'अहो, पण नंतर हा वर्ण केवळ जन्मानं ठरतो.त्याची 'हायरारकी' निर्माण होते. त्यात स्पृश्या स्पृश्यता, 'चोझन पयू', अधिकार आणि अन्याय, क्रौर्य असे बरेच प्रकार शिर-तात. या साऱ्याचा अगदी कडू इतिहास आजही घडतो आहे आणि तुम्ही म्हणता नव्यानं असे भेदाभेद करा?'

'हे पहा, तुमचा तो कडू इतिहास हे मूळ तत्त्व आणि सकल्पनेपासून झालेलं स्खलन होतं. माणसं स्खलनशील झाली म्हणुन मुळात कल्पनाच टाकाऊ ठरत नाही. एखाद्या समाजाची गुण-कर्माप्रमाणे विभागणी व्हावी याचा लॉजिकल परिणाम भेदाभेद आणि विग्रहात झाला; पण समाजाचा गाडा सुर-ळीत चालणं हादेखील लॉजिकल परिणामच आहे ही रचना काळजीपूर्वक राबवली तर हा दुसरा परिणाम तरी कशावरून होणारच नाही? कम्युनिस्ट राष्ट्रांनी आज कम्यु-निझमचं भलतंच काही तरी करून ठेवलं आहे; पण म्हणून काय, कम्युनिजमच वाईट म्हणाल का?'

आमचा इतिहास यांना माहीत आहे; पण आमच्यासारखा तो ते जगलेले नाहीत, त्याच्या जळत्या खुणा यांच्या रक्तात उम-टल्या नाहीत, असं मला तीव्रपणे वाटून गेलं.

'स्वत.वर भरंवसा न ठेवता कुणाला तरी अशी शरणागती का?'

'स्वत:वरच तर आहे की भरवसा. फक्त तुम्ही ज्याला स्वत: म्हणता त्याला आम्ही 'कृष्ण कॉन्शसनेस' म्हणतो. या कृष्ण कॉन्शस-नेसवर सर्व मिळून, 'कलेक्टिव्हली' विश्वास ठेवतो. हा तर फक्त तपशिलाचा फरक!'

'तेवढा विश्वास ठेवला की, जगण्याचा हेतू साध्य, असंच ना?' मी विचारलं.

डॉक्टरसाहेब एकदम ताठ झाले.

'भलतंच! कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। असं आम्हाला कृष्णानं सांगि-तलं आहे. फळाची अपेक्षा धरू नका; पण कर्म करायचं थांबा असं थोडंच आहे? खरं म्हणजे याच्या बरोबर उलटंच म्हणायला हवं.' मी धार्मिक आहे, कृष्ण–कॉन्शसनेसवर विश्वास ठेवतो याचा अर्थ माझ्या श्रमांना दिशा आली आहे. माझ्यातल्या कृष्ण कॉन्शस-नेसच्या आनंदासाठी तटस्थपणे काम कर-ण्याची दिशा मला मिळाली आहे आणि सगळ्यांच्या ठिकाणी असलेला कृष्ण कॉन्श-सनेस जगातलं दु:ख, दैन्य, अज्ञान अगदी शुद्ध इहलौकिक यातनांचा विनाश करावा, म्हणून आवाहन करतो आणि मी अधिक चांगले, अधिक सूत्रबद्ध, कठोर परिश्रम करू शकतो. कारण त्यामागचा विधायक हेतू माझ्या मनाला पक्का कळला आहे. आम्ही इथले सारे अधिकारी आपापली कामं यत्किं-चितही कसूर न करता करत असतो. इस्कॉन म्हणजे केवळ भव्य मंदिर, आंतरराष्ट्रीय अनुयायित्व, भजन–कीर्तन आणि जागोजागी चालवलेली शाकाहारी उपाहारगृहं एवढंच नव्हे आमची सोसायटी जिथे असते, तिथल्या

स्थानिक प्रश्नांत ती रस घेते, तिथल्या समाजकार्याला ती चालना देते. सुदैवानं आमच्या गाठीला पैसे आहेत. उदाहरणार्थ, या भागाच्या गरजेनुसार आम्ही कर्जतजवळ एक रूरल डेव्हलपमेंट प्रॉजेक्ट सुरू केलं आहे. शेतीसुधारणेपासून ते मद्यबंदीपर्यंतचे सगळे प्रयोग आम्ही तिथे अमलात आणतो आहोत. आमच्यापैकी प्रत्येकजण या कामात अगदी समूळ गुंतला आहे. पारलौकिक हेतूंनी प्रेरित होऊन इहलौकिक कामं करणारी अशी ही मोठी फौजच समजा !'

आणि मार्चेटींचा वेगळेपणा माझ्या लक्षात आला. अध्यात्म हा त्यांच्या लेखी जीवनाचा मार्ग होता; पण जीवनाचा संपूर्ण आशय, जीवनाचा पर्याय नव्हता. समाजसेवा हे साधन नव्हतं. ते अध्यात्मिक साध्यच होतं. किंबहुना यापलीकडे वैयक्तिक मोक्षाची अपेक्षाच नव्हती. हाच तो वेगळेपणा.

ठीक आहे. त्यांचा मार्ग आहे. त्यांना जमतो आहे. निदान पैशाच्या बळावर या धर्मातून त्या धर्मात माणसांची अफरातफर करण्यापेक्षा तरी हे निश्चितच चांगलं !

कर्जतचा रूरल डेव्हलपमेंट प्रोग्रॅमही खूपच इंटरेस्टिंग आहे; पण त्याविषयी आता परत कधी तरी !

—ललिता बर्वे

## बातम्या अशाही

### ☐ विषारी जीवन !

पाण्याला संस्कृतमधे जीवन म्हणतात आणि ते सार्थही आहे. हेच जीवन जेव्हा जीव घ्यायला उठतं तेव्हा...?

ज्या वेगात सध्या पाण्याचं प्रदूषण वाढतंय तो वेग लक्षात घेता ही वेळ फार लांब राहिलेली नाही, असं तज्ज्ञांचं मत आहे. इसवी सन २००० पर्यन्त भारतात झरे किंवा डोंगरातून बेफामपणे पडणारे धबधबे हे अगदी तुरळक होणार आहेत.

आपल्या राजधानीचीच गोष्ट घ्या. यमुना नदीचं पाणी सगळ्या दिल्ली शहरात पुरवलं जातं. हल्ली यमुनेत सांडपाणी आणि कारखान्यांमधून येणारी रसायनं यांचाच भरणा जास्त असतो. दिल्लीत एकूण ३,३२९ कारखाने आहेत. यात कापड, रबर, प्लॅस्टिक वगैरे बनवणारे कारखानेही येतात. यापैकी ३५९ कारखाने नको असलेली रसायनं किंवा न लागणारी रसायनं द्रवरूपात टाकून देतात. यामुळं यमुनेचं पाणी प्रदूषित न होईल तरच नवल ! आणि या द्रवरूपी 'वेस्ट' ची अन्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे मार्गही नाहीत. यमुनेला जुळलेली नजाफगढ ड्रेनेजव्यवस्था तर इतकी ढासळलीय की, त्यातून येणारं पाणी शेतीसाठी वापरायलाही बंदी आहे. ही व्यवस्था सांभाळायची कोणी ? प्रत्येक जबाबदार संस्था दुसऱ्यावर आरोप करते.

पाणी स्वच्छ व्हावं म्हणून त्यात क्लोरिन घालतात. क्लोरिनमुळे सूक्ष्म जंतू मरतात आणि अशा जंतूंपासून होणारे रोग टळतात. उदाहरणार्थ, डायरिया, डिसेंट्री; पण हाच क्लोरिन जर शरिरात थोडाथोडा साचत गेला तर मात्र कॅन्सरसारख्या रोगालाही एखादे वेळेस आमंत्रण मिळतं. क्लोरिनमुळं पाण्यात क्लोरोफॉर्मचं प्रमाण वाढतं. शिवाय क्लोरिन आणि ब्रोमिनमुळं तयार होणारी इतर अनेक रसायनं वाढू लागतात. अमेरिकेतील काही विहिरींमधून अशी सहा रसायनं शोधण्यात शास्त्रज्ञांना यश मिळालंय. यापैकी तीन रसायनं सरळ कॅन्सर व्हायला कारणीभूत ठरू शकतात, तर इतर तीन शरीरातल्या पेशींवर हल्ला करून त्यांच्यामार्फत पुढच्या पिढीमध्ये जन्मापासून एखादं व्यंग उत्पन्न करू शकतात.

मे १९८१ मध्ये सुरतपासून सात किलोमीटरवर असलेल्या साधारण दहा खेड्यांमधून पाण्याचं प्रदूषण प्रमाणाबाहेर वाढल्याचं निदर्शनाला आलं होतं. उधन्याला आलेलं औद्योगिक वसाहतींचं रूप, हे त्याचं मुख्य कारण. इथल्या कारखान्यांमधून बाहेर पडणारं सांडपाणी मिंधोला नदीला जाऊन मिळायचं. यात क्लोरिन आणि त्याचे कंपाउंडस् यांचं प्रमाण इतकं जास्त होतं की, गावातल्या माणसांवरच नव्हे, तर गुरा-ढोरांवरही त्याचे परिणाम दिसायला लागले. म्हाताऱ्या माणसांना सांधेदुखी सुरू झाली, तर लहान मुलांच्या दातांच्या तक्रारी वाढू लागल्या, त्यांची हाडं कमकुवत होऊ लागली. गायी-म्हशी पूर्वीइतकं दूध देईनाशा झाल्या आणि विहिरींमधले सगळे मासे गायब झाले! अजूनही तिथल्या परिस्थितीत फारसा बदल झालेला नाहीये.

समुद्रातले बरेचसे मासे समुद्रात येणाऱ्या रसायनांमुळे लगेच मरून जातात. हल्ली तर माशांमधलं मर्क्युरीचं प्रमाणही वाढलं असल्याचं संशोधकांच्या लक्षात आलंय. असे मासे खाल्ल्यामुळं माणसाच्या मेंदूवर परिणाम होण्याची दाट शक्यता असते. मर्क्युरीचं प्रमाण दर ग्रॅममागे वीस मायक्रोग्रॅम इतकं वाढलं की, दृष्टीवर, कानावर आणि स्पर्शज्ञानावर परिणाम होऊ लागतो. तीच गोष्ट लेड आणि कॉपरची. यांचं प्रमाण एका ठराविक मर्यादेबाहेर गेलं की, पाण्यातल्या रहिवाशांवर चक्क विषबाधा होते आणि असे मासे आपल्या पोटात गेले की, आपल्यावरही तोच प्रयोग होतो. सध्या मुंबईजवळच्या पाच केंद्रांमधून पाण्यातलं लेड आणि कॉपरचं प्रमाण या मर्यादेपलीकडचं आहे, अशी माहिती आलीये.

जागतिक आरोग्यसंस्थेने केलेल्या पहाणीत असं आढळून आलंय की, जगात दररोज पंचवीस हजार माणसं पाण्यावाचून किंवा पाण्यामुळं (दूषित) आपल्या जिवाला मुकताहेत. दर पाच मुलांमागे चार मुलं खराब पाणी पिण्यामुळं होणाऱ्या रोगांमुळं दगावताहेत. डिसेंट्री, कॉलरा आणि कावीळ हे रोग मुंबईसारख्या शहरांमधून किती थैमान घालतात, हे सांगायची गरज नाहीये.

माणसाच्या शरीरात ६५% पाणी असतं. ५% पाणी दर दिवशी बदलत असतं. जर सतत दूषित पाणी प्यायल्यामुळं १५% खराब पाणी शरीरात गेलं तरी माणसाचं मरण ओढवू शकतं.

याला उपायच नाही. गेल्या वर्षी आंध्र प्रदेशातल्या एका छोट्याशा गावानं एक कागदाचा कारखाना जबरदस्तीनं बंद पाडला होता. कारण या कारखान्याचं सांडपाणी ज्या विहिरीत जात होतं त्याच विहिरीतून या गावाला पाणीपुरवठा होत होता. याचा अर्थ सगळ्यांनी हाच मार्ग अवलंबला पाहिजे, असं नाही; पण कारखानदारांनी कारखाने सुरू करण्यापूर्वी आपण सांडपाण्याची काय व्यवस्था करणार आहोत, याचा काळजीपूर्वक विचार करणं अत्यंत जरुरीचं आहे. बाकी मग सरकार उपाय करतच आहे. तरीही घरी पाणी पितांना ते आधी उकळलेलं आहे की नाही, याची काळजी प्रत्येक नागरिकानं घ्यायला हवी.

## □ अपशकुनी निवडणूक !

गढवालची निवडणूक इंदिरा काँग्रेसच्या गोटात बरीच महत्त्वाची मानली जात होती. कुठल्याही परिस्थितीत हेमवतीनंदन बहुगुणांना विजयी होऊ द्यायचं नाही, असा जणू त्यांचा निश्चय होता. आता हा निश्चय सफल होऊ शकला नाही, ही गोष्ट वेगळी; पण इंदिरावाल्यांनी प्रयत्नाची शिकस्त मात्र केली. नुसत्या प्रचारसभा वगैरे घेऊन ते थाबले नाहीत, तर चंद्रमोहन सिंग नेगी (बहुगुणांच्या विरुद्ध उभे राहिलेले इंदिरा काँग्रेसचे उमेदवार) जिंकावेत यासाठी एका मांत्रिकाला आमंत्रणसुद्धा दिलं होतं !

एका अत्यंत दुर्लभ जातीचा कोंबडा या मांत्रिकानं आणला होता. हा कोंबडा शोधायला बरेच कष्ट पडले. मांत्रिकाचं नाव होतं बालती बाबा. कोंबड्याला गढवालला नेण्यापूर्वी त्याची पूजा करण्यात आली. त्याच्या अंगावरची सर्व पिसं छाटून टाकली गेली. भैसाकुड स्मशानभूमीमधून माणसाचं अर्धं कच्चं मांस आणि राख आणली गेली. एका छोट्याशा कुत्र्याच्या पिल्लाला ते खाऊ घातलं गेलं आणि नंतर त्या कुत्र्याचा बळी घेऊन त्याच्या रक्तानं कोंबड्याला न्हाऊ घातलं.

एवढे सगळे सोपस्कार केल्यानंतर कोंबड्याचा प्रवास सुरू झाला; पण बाबांच्या दुर्दैवानं तो कोंबडा वाटेतच मेला आणि अपशकुन झाल्याचं बाबाच्या लक्षात आलं.

या अपशकुनामुळं असो किंवा इतर काही कारणांमुळे असो, चंद्रमोहनसिंग नेगी पराभूत झाले, एवढं मात्र खरं !

## □ मदत हीच शिक्षा !

'आईसारखे दैवत साऱ्या जगतावर नाही' अशा शब्दात आईची महती सांगितली जाते; पण एखादी आई आपल्या मुलाच्या सुखासाठी (?) किती भयंकर प्रकार करू शकते याचा प्रत्यय देणारी एक घटना नुकतीच इंग्लंडमध्ये घडली.

ब्रिस्टोलमध्ये राहाणारी एकतीस वर्षांची मेरी वॉर्नर आपला नवरा दुसऱ्या बाईसाठी आपल्याला आणि मुलांना सोडून जाणार हे कळताच एकदम बिथरून गेली. खुद्द वडिलांनाच मुलं नको असतील तर त्यांनी जगायचं कशाला ? असा विचार मनात येताच तिने आपल्या दोन मुलींना जवळ बोलावलं. सहा वर्षांची विकी आणि चार वर्षांची जोअन. आई गोळ्या देतेय हे बघून खुश झाल्या. त्या गोळ्या झोपेच्या आहेत हे त्यांना कसं ठाऊक असणार ? गोळ्या घेतल्यानंतर गाढ झोपी गेलेल्या आपल्या मुलींच्या डोक्यावर प्लॅस्टिकच्या पिशव्या बांधून मेरीने त्यांना काळाच्या आधीन केलं.

एवढं झाल्यानंतर उरलेल्या झोपेच्या गोळ्या तिने स्वतः घेतल्या; पण या गोळ्यांनी मेरीला मात्र काही तासांचीच झोप घेऊ दिली. आपल्याच खोलीत जागी झालेली मेरी मग जास्त वैतागली. स्वतःच्या मनगटावरची नस कापून घेऊन तिने बाथरूममधल्या टबमध्ये बुडी मारली.

दोन दिवसांनी मेरीचा दीर जेव्हा त्यांच्या घरी आला तेव्हा त्याला मेरी बाथरूममध्येच सापडली. आश्चर्य म्हणजे अजूनही तिच्या शरीरात थोडी धुगधुगी होती. ताबडतोब तिची रवानगी हॉस्पिटलमध्ये केली गेली. डॉक्टरांनी प्रयत्नपूर्वक मेरीचे प्राण वाचवले.

ब्रिस्टोलच्याच कोर्टात ही केस चालली. न्यायाधिशांनी मेरीला कुठलीही शिक्षा न देता सोडून दिलं. आपल्या निकालपत्रात ते म्हणाले, 'केसमध्ये शिक्षेपेक्षा मदतीचीच जास्त गरज आहे !'

## □ बालविवाह !

भारतामध्ये पूर्वी जरठकुमारी विवाह व्हायचे. अशा बालविवाहांबद्दल नंतर बरीच बोंब होऊन आता त्यांचं प्रमाण खूपच कमी झालंय. अजूनही क्वचित लहान मुलींचं लग्न जबरदस्तीने, पैशासाठी वयाने मोठ्या असलेल्या पुरुषाशी लावल्याचं कानावर येतं

*बिहारमध्ये मात्र थोडी वेगळी घटना* घडलीय. वरसाळीगंज जिल्ह्यातल्या, सागमा गावातल्या एका दहा वर्षांच्या 'मुला'ला म्हणे साकरा गावी रहाणाऱ्या एका श्रीमंत गृहस्थाने सोळा एप्रिल रोजी पळवलं. कशासाठी ? तर, बावीस वर्षांच्या मुलीशी त्याचं जबरदस्तीने लग्न लावून देण्यासाठी.

हा आरोप कुणा सोम्यागोम्याने केलेला नाहीये. तर चक्क तिथल्या पोलिसांचाच असा संशय आहे. त्या बिचाऱ्या 'बालवराला' शोधण्यात मात्र पोलीसांना अजून यश मिळालेलं नाहीये !

## □ चोरनी !

गिल्बर्ट मॅकेन्झी हे इंग्लंडचे रहिवासी. अपंग आणि थोडेसे बहिरे. एंजिनिअरिंगच्या व्यवसायात असल्यामुळे त्यांना फुलं वगैरे फारशी आवडायचीच नाहीत

एक दिवस पाच वर्षांची एक गोड मुलगी फुलं विकायला त्यांच्या दारात आली. मॅकेन्झीनी कितीही नको म्हटलं तरी ती ऐकेचना. शेवटी कंटाळून ती छोटी त्यांना म्हणाली, 'जाऊ द्या ! फुलं नाही तर नाही, मला तुमची बाथरूम तर दाखवाल ? पाय धुवायचे होते.' याला मॅकेन्झीनी अजिबात हरकत घेतली नाही.

मुलीला बाथरूम दाखवून ते बाहेर आले आणि त्यांच्या पाठोपाठच ती मुलगी 'थँक्यू' म्हणत निघून गेली. त्या मुलीबरोबर असलेल्या एका थोड्याशा मोठ्या मुलाने तेवढ्या वेळात आपल्या खिशातले पाचशे पौंड (जवळ जवळ आठ हजार रुपये) पळवले, हे मॅकेन्झीना कळलं तेव्हा मात्र बराच उशीर झाला होता !

## □ चुकीचं यश !

'वर्षभर चुकीचा विषय शिकवून मग चूक कळल्यावर परत विद्यार्थ्याला हवा असलेला विषय शिकवायचा' हे दिल्लीमध्ये काही नवीन राहिलेलं नाहीये. कधी कधी तर परीक्षा देऊन पास झालेल्या विद्यार्थ्यांनाही, 'तुम्ही चुकीच्या विषयात पास झालात' असं सांगण्यात येतं. पुढच्या वर्षी मग एका जादा विषयाचं ओझं त्यांच्यावर पडतं.

एकोणीस एप्रिलला दिल्ली विद्यापीठाच्या कमिटीने नेमकं हेच ओझं दुसऱ्या वर्षाला असलेल्या चौदा मुलांवर टाकलं. सबंध वर्षभर त्यांना 'पॉलीटिकल सायन्स'च्या नावाखाली 'भारतीय सरकार आणि राजकारण' शिकवलं. त्याचा मूळ विषय होता, 'सरकारं आणि राजकारण याचा तुलनात्मक अभ्यास!'

आपण केलेला घोटाळा लक्षात येताच विद्यापीठाने ताबडतोब निर्णय घेतला— 'या मुलांना त्यांच्या इतर विषयांच्या मार्कांवरून पुढच्या वर्षाला प्रवेश देण्यात यावा आणि न शिकवलेल्या विषयाची परीक्षा त्यांनी तिसऱ्या वर्षी द्यावी !' □

## सर्चलाइट

**विज्ञानविषयक नवे सदर**

**अमृत पुरंदरे**

# इन्सॅट

ऑर्थर सी. क्लार्क हा सायन्स फिक्शन्स् लिहिणाऱ्यांमध्ये एक्का मानला जातो. १९४५ साली या क्लार्कमहाशयांनी एक लेख प्रसिद्ध केला. त्याच्यामध्ये त्यांनी अशी कल्पना मांडली की, 'जर का एखादे अंतराळ-यान पृथ्वीच्या भू-स्थिर कक्षेमध्ये सोडले तर त्या यानातून जगाचा १।३ भाग दिसू शकेल आणि अशा यानात जर का अँटेना आणि T. V. कॅमेरे बसवले तर असे यान एकाच वेळी T. V. आणि रेडिओचे प्रसारण पृथ्वीच्या १।३ भागात करेल. तसेच अशी तीन याने संपूर्ण जगामध्ये असे प्रसारण करू शकतील...' परंतु लेखकाच्या कल्पनेप्रमाणे अशा यानांमध्ये माणसे असणे आवश्यक होते.

या सायन्स फिक्शन्स् लिहिणाऱ्यांची डोकी नेहमीच तिरपी चालतात, असा माझा एक समज आहे. अॅसिमॉव्ह नावाचा असाच एक एक्का सायन्स फिक्शन्स् लिहितो. त्याची आणि क्लार्कची, का कोण जाणे; पण सॉलिड खुन्नस चालते. एकदा अॅसिमॉव्ह यांनी असे जाहीर केले की, त्यांचा लिखाणाचा वेग इतका आहे की, त्यांना एकाच वेळी दोन हातांनी दोन इलेक्ट्रॉनिक टाइपरायटर्स वापरायला लागतात. हा टोमणा क्लार्क साहेबांना होता. कारण थोडेच दिवस आधी त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, ते फक्त हातांनीच लिहिणं पसंत करतात. असो.

क्लार्कसाहेबांचा लेख प्रसिद्ध झाला आणि गंमत म्हणजे, लोकांनी त्यांना वेड्यात न काढता त्यांची ही कल्पना चांगलीच उचलून धरली. शास्त्रज्ञ कामाला लागले आणि १९६३ साली एक छोटासा उपग्रह (इनकॉम–१६० पाऊंड) अवकाशात भू-स्थिर कक्षेमध्ये सोडून अमेरिकेने क्लार्कसाहेबांची कल्पना प्रत्यक्षात आणली.

एक दिवस मी पेपरमध्ये वाचलं की, डॉ. काळे नावाचे कोणी गृहस्थ इन्सॅटसंबंधी माहिती पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात देणार आहेत. नाही तरी बरेच दिवस मला काही प्रश्न जरा त्रासच देत होते. उदा.–

१) सी बँड अँटेना उघडत नाही म्हणजे काय? आणि ती पृथ्वीवरून कशी उघडतात?

२) भू-स्थिर कक्षा म्हणजे काय?

३) हा उपग्रह सोडून भारताने 'मोठे पाऊल टाकले.' म्हणजे नेमके काय केले?


इत्यादी. तर म्हटले चांगला चान्स आलाय. जायला पाहिजे... गेलो.

हा कार्यक्रम मराठी विज्ञान परिषदेने आयोजित केला होता. सुरुवातीला डॉ. काळे यांची ओळख करून देण्यात आली. डॉ. काळे हे स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया-मध्ये इन्सॅट १–अ च्या प्रोजेक्टसंबंधी सर्व काम बघतात ओळख करून दिल्यावर लगेच डॉ. काळे बोलायला उभे राहिले. ते जे काय बोलले ते मी थोडक्यात सांगतो.

भू-स्थिर कक्षा म्हणजे नेमकं काय? अनेकदा एखादी गोष्ट आपण वारंवार वर्तमानपत्रात वाचतो; पण त्याचा नेमका अर्थ आपल्याला माहीत नसतो. भू-स्थिर कक्षा हा त्यातलाच एक प्रकार. आपले भास्कर किंवा रोहिणी हे उपग्रह पृथ्वीच्या अगदी जवळून म्हणजे ३०० कि. मी. वरून प्रदक्षिणा मारतात. त्यांना एका प्रदक्षिणेला ९० मिनिटे लागतात, चंद्र हा पृथ्वीचा निसर्गदत्त उपग्रह त्याला पृथ्वीभोवती फेरी मारायला जवळजवळ २८ दिवस लागतात. आपण जसजसे पृथ्वीपासून दूर जाऊ तसतसा पृथ्वी-प्रदक्षिणेचा काळ वाढत जातो. कारण प्रदक्षिणेसाठी कापायला लागणारे अंतर वाढत जाते.

आता समजा, या दोन्ही उपग्रहांच्यामध्ये एखादा उपग्रह अशा प्रकारे सोडला की या उपग्रहाच्या फिरण्याचा काळ बरोबर २४ तासांचा असेल. अशा या उपग्रहाच्या कक्षेला भू-स्थिर कक्षा म्हणतात. यातसुद्धा एक गंमत आहे. ही कक्षा विषुववृत्ताच्या बरोबर वरती आहे. तिची उंची ३५,७९४ कि. मी. आहे. म्हणजे अशी फक्त एकच कक्षा आहे. त्यामुळे हल्ली या कक्षेमध्ये एखाद्या नव्या उपग्रहाला जागा मिळणे मुश्किल होऊन बसले आहे!

इन्सॅट–१–अ हा उपग्रह भारतात बनलेला नाही. त्याचे उड्डाणसुद्धा अमेरिकेच्या डेल्टा (d) रॉकेटकडून झाले. त्याची मूळ कल्पना आणि आकृतीबंध हा मात्र भारतीय शास्त्रज्ञांचा. त्याचे वजन ६०० किलो असून तो उडतेवेळी १०"×८"×४॥" इतक्या आकाराचा होता. सध्या मात्र तो त्याचे सौर पंखे



**इन्सॅटची उंची तीन मजली घराएवढी आहे.**

व अँटेना उघडल्यामुळे ६४ फूट म्हणजे जवळजवळ एका तीन मजली घराएवढा उंच झाला आहे. भारताकडून हा उपग्रह सोडता यायला आपल्याला १९८७ सालपर्यंत वाट बघावी लागणार आहे. कारण डेल्टा, रॉकेट-सच्या तोडीची रॉकेट्स् सध्या आपल्याकडे नाहीत.

हा उपग्रह संपूर्णपणे व्यापारी तत्वावर बनवला असून याच्यातर्फे T. V. रिले, लांबवरचे फोन, तारा, हवामानाविषयी माहिती, समुद्र व ढगांचे तपमान इ. गोष्टींची माहिती देण्याचे काम केले जाईल.

अशी सर्व कार्ये करणारा हा जगातला पहिलाच व्यापारी तत्वावर चालणारा उपग्रह असून भारताची पाठ म्हणूनच थोपटली जात आहे. कारण ही योजना संपूर्णपणे भारतीय मेंदू मधून आलेली आहे. इतर देशानी सोडलेले उपग्रह हे वरीलपैकी फक्त एका एका कामासाठीच सोडले जात. भारताने ही सर्व कामे एकत्र केल्यामुळे कित्येक कोटी रुपयांची व वेळेची बचत झाली आहे.

सध्या हा उपग्रह पुण्याच्या बरोबर दक्षिणेला आहे. पुण्यात दक्षिणेला तोंड करून उभे राहिले व साधारणपणे अठरा अंशात मान केली तर हा उपग्रह कधीही तिथेच असेल. अर्थात् तो डोळयाना दिसणार नाही.

इन्सॅट-१-अची सी बॅन्ड अँन्टेना उघडत नव्हती. ही अँटेना T. V. च्या साठी वापरली जाणार होती. ती जर का उघडली गेली नसती तर प्रचंड आर्थिक नुकसान सोसायला लागले असते व उपग्रहाचे आयुष्य कमालीचे कमी झाले असते. ही अँटेना उघडण्यासाठी शास्त्रज्ञ बराच वेळ झगडत होते, असे वर्तमानपत्रात वारंवार येत होते; पण झगडत होते, म्हणजे नेमके काय करत होते ? तर काळेसाहेब सांगतात त्याप्रमाणे, या उपग्रहामध्ये दोन गणकयंत्रे (कॉम्प्युटर) बसवली आहेत. त्याना ठराविक सूचना देऊन हे काम केले गेले.

पण त्यातसुद्धा एक गमत झाली. ही अँटेना न उघडल्यामुळे त्या अँटेनाच्या खाली असलेले रॉकेटसुद्धा झाकले गेले होते. ती अँटेना उघडण्यासाठी या रॉकेटचा उपयोग करावयाचे ठरले. म्हणजे हे रॉकेट चालू केल्यामुळे जो धक्का अँटेनाला बसेल त्यामुळे ती उघडेल. पण यात अडचण अशी होती की, रॉकेट चालू केल्यामुळे ही अँटेना इतकी तापली असती की,ती निकामीच झाली असती. म्हणून हे रॉकेट अतिशय थोडा वेळ (२० मिली सेकंद ) चालू करायचे ठरले. असे प्रयत्न पाच वेळा झाले; पण काही उपयोग झाला नाही. मात्र सहाव्यांदा ही अँटेना विनासायास उघडली !

सध्या इन्सॅटच्या सौरशक्ती साठवण्याच्या (सोलर सेल्स) यंत्रणेत गडबड झाल्यामुळे (हे सेल्स नीट उघडले गेले नाहीयेत) त्याचे आयुष्य सात वर्षांवरून जवळजवळ दीड ते दोन वर्षापर्यंत कमी झाले आहे. (कालच लकडीपुलावरून जात असताना मला इन्सॅटची आकृती असलेली एक मोठी जाहिरात दिसली. जरा बारकाईने पाहिल्यावर लक्षात आले की, ती एका विमा कंपनीची जाहिरात आहे. आता मला या कंपनीचं काही खरं दिसत नाही ! )

एकूण काय, तर आपल्या शास्त्रज्ञानी अतिशय झटून ही अँटेना उघडली. संपूर्ण यानाचे नियंत्रण इतके चागले केले की, परदेशातसुद्धा भारताचे कौतुक केले जात आहे.

कार्यक्रम संपला. मी बाहेर आलो तेव्हा मला भारताचे आणि आपल्या शास्त्रज्ञाचे प्रचंड कौतुक वाटत होते. ज्याप्रमाणे अनेक भाविकजन पर्वतीचा देव दिसत नसतानासुद्धा लांबूनच मनोभावे नमस्कार करतात त्याप्रमाणे मी दक्षिणेला तोंड करून अंदाजे अठरा अंशामध्ये मान वर केली आणि कोणी बघत नाही असं बघून पटकन् एक नमस्कार करून घेतला. □

# भयंकर मुंगी

पृथ्वीवर रहाणाऱ्या सर्व प्राण्यामध्ये कीटकाच्या शरीराची रचना ही सर्वात उत्तम आहे, असेच म्हटले पाहिजे. खोल समुद्रापासून ते उच्च हिमालयापर्यंत, वाळवंटापासून ते अतिथंड ध्रुव प्रदेशापर्यंत प्राण्यांच्या शरीरावर, उष्ण अशा ज्वालामुखीच्या झऱ्यामध्ये, तेलाच्या डबक्यामध्ये, गुहांमध्ये, झाडांवर. थोडक्यात सर्व ठिकाणी वेगवेगळे कीटक आढळून येतात.

या सर्व कीटकांमधला सर्वात प्रगत कीटक म्हणजे मुंगी. जगात अनेक प्रकारच्या मुंग्या आहेत. त्यांच्या रहायच्या पद्धती वेगवेगळ्या आणि मोठ्या मजेशीर आहेत. दक्षिण अमेरिकेत पानं तोडणाऱ्या मुंग्या आहेत. त्या प्रथम झाडाची मुळं पोखरून झाड पाडतात. मग संपूर्ण झाडाचे बारीक, बारीक तुकडे करतात. हे सर्व तुकडे, त्यानी जमिनीत केलेल्या वारुळात नेतात. हे तुकडे चावून त्यांचा लगदा करतात आणि एक विशिष्ट प्रकारची बुरशी त्यावर वाढवतात. त्या बुरशीला येणाऱ्या पांढऱ्या फळावर त्या आपली गुजराण करतात.

आपल्या आशिया खंडात एका जातीची मुंगी पानांचे घरटे बनवते. प्रथम कामकरी मुंग्या दोन पानं त्यांच्या नांग्यांमध्ये आणि पायांमध्ये धरून पानांच्या कडा जुळवून घेतात. कोणताही मोठा कीटक रेशीम बनवू शकत नाही. म्हणून मोठ्या आळयानाच उचलून त्या पानांवर आणले जाते. मग काही मुंग्या त्या आळयाना 'गुदगुल्या' करतात. त्यामुळे आळया रेशीम बाहेर टाकतात. मग मुंग्या या आळयाना पानाच्या जोडावर पुढेमागे फिरवतात व सर्व सांध जोडून घेतात.

काही मुंग्या गटाने दुसऱ्या मुंग्यावर हल्ला करतात व त्या मुंग्यांच्या कामगारांना पळवून आणून गुलाम बनवतात.

सर्व मुंग्यामध्ये भयंकर अशा मानल्या गेल्या आहेत, त्या दक्षिण अमेरिकेत किंवा आफ्रिकेत सापडणाऱ्या 'सैन्य मुंग्या'. (Army Ants) त्या प्रचंड संख्येने पुढे सरकत असतात व वाटेत येईल त्याचा फडशा पाडत सुटतात. एखाद्या जागेवरून सर्व मुंग्या निघून जायला कित्येक तास लागतात. अशा या भयंकर सैन्याच्या अग्रभागी शिपाई मुंग्या असतात. त्याना अजिबात दिसत नाही. त्या आपली मान वर करून आणि मजबूत, मोठ्या नांग्या पसरून चालत असतात. वाटेत येणारे प्रत्येक झाड, सरडे, साप, विंचू, कीटक, लहान पक्षी, याच्यावर त्या हल्ला करतात. त्याना चारी बाजूनी घेरतात आणि बघता बघता त्याचे बारीक तुकडे करून तो पदार्थ फस्त करतात. याच्यापासून बचाव करायचा एकच मार्ग-रॉकेल किंवा पॅराफिन जमिनीवर ओतून आग लावणे. असे केले तरच त्या आपला मार्ग बदलतात.

*